CMYK



आज कृष्णजन्माष्टमी


# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २६ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २९६ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे...

### निवडणुकीच्या तारखेत बदल शक्य

**चंदीगड :** हरयाणामध्ये १ ऑक्टोबर रोजी प्रस्तावित विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख बदलू शकते. भाजपा आणि इंडियन नॅशनल लोक दल यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून बिश्नोई समाजाच्या सुट्या आणि धार्मिक कार्यक्रमांचा संदर्भ देऊन तारीख बदलण्याची मागणी केली होती, ज्याचा निवडणूक आयोग विचार करत आहे. निवडणूक आयोग हरयाणामध्ये १ ऑक्टोबरऐवजी ७ किंवा ८ ऑक्टोबरला मतदान घेण्याची शक्यता आहे. असे झाल्यास जम्मू-काश्मीरमधील तारीखही बदलू शकते. मात्र, यावर जो निर्णय घेतला जाईल, तो मंगळवारीच घेतला जाणार आहे.




### कॉग्निझंटकडून इन्फोसिसवर खटला

**टेक्सास :** अमेरिकी सॉफ्टवेअर कंपनी कॉग्निझंटने भारतीय टेक कंपनी इन्फोसिसविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कॉग्निझंटने टेक्सास फेडरल कोर्टात हा खटला दाखल केला आहे. कॉग्निझंटने इन्फोसिसवर हेल्थकेअर इन्शुरन्स सॉफ्टवेअरशी संबंधित ट्रेड सिक्रेट चोरल्याचा आरोप केला आहे. या माहितीच्या आधारे इन्फोसिसने नवे सॉफ्टवेअर विकसित केल्याचे कॉग्निझंटने आरोपात म्हटले आहे. इन्फोसिसने मात्र हे आरोप फेटाळून लावले आहे. कंपनी न्यायालयात आपली बाजू मांडणार असल्याचे इन्फोसिसने म्हटले आहे.

### विक्रमी संख्येत स्वीडन सोडले

**स्टॉकहोम :** अमेरिका, कॅनडा आणि युरोपीय देशांना भारतीयांची कायम पसंती असते. येथे चांगली संधी आणि उच्च शिक्षणासाठी अन्य देशांची निवड करतात. मात्र, यावर्षी युरोपातील अन्य एक देश स्वीडनमध्ये उलट ट्रेंड पाहायला मिळत आहे. स्वीडनला जाणाऱ्या भारतीयांमध्ये मोठी घसरण आली नव्हे, विक्रमी संख्येने भारतीय स्वीडन सोडत आहेत. यावर्षीच्या सुरुवातीस सहा महिन्यांमध्ये स्वीडन सोडणाऱ्या भारतीयांमध्ये १७१ टक्क्यांची वाढ झाली.

# अत्याचारी सुटायला नकोच

## लखपती दीदी कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन



जळगाव येथे रविवारी आयोजित लखपती दीदी कार्यक्रमात महिलांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

**वृत्तसंस्था, जळगाव, २५ ऑगस्ट**

महिलांवरील अत्याचार हा अक्षम्य अपराध आहे. अत्याचार करणारा सुटता कामा नये, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. येथे आयोजित लखपती दीदी कार्यक्रमानंतर एका सभेला संबोधित करताना त्यांनी कोलकात्यातील महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरची अत्याचारानंतर झालेली हत्या आणि बदलापुरात दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराचा संदर्भ दिला.

महिला अत्याचारातील गुन्हेगारांना सोडले जाऊ नये. अशा गुन्हेगारांना वाचवणाऱ्या लोकांवरही कठोर कारवाई करायला पाहिजे. रुग्णालय, शाळा, महाविद्यालय, पोलिस विभाग, जो कुणी यात सहभागी असेल, कारवाई झाली पाहिजे. सरकार येते आणि जाते, आपण महिलांची सुरक्षा केलीच पाहिजे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. महिलांच्या विरोधातील गुन्हे हे अक्षम्य पाप आहे, असे मी आज पुन्हा देशातील प्रत्येक राजकीय पक्ष आणि राज्य सरकारला सांगू इच्छितो, असे नरेंद्र मोदी म्हणाले. महिलांच्या विरोधात गुन्हे करणाऱ्यांच्या विरोधात आम्ही कठोर कायदे करीत आहोत. एफआयआर दाखल केला जात नसल्याच्या तक्रारी पूर्वी यायच्या. यासाठी आम्ही भारतीय न्याय संहिता आणली आणि त्यात कित्येक सुधारणा केल्या. महिलेला पोलिस ठाण्यात जायचे नसल्यास, ई-एफआयआर करू शकतात. ई-एफआयआरमध्ये कोणताही बदल किंवा त्यात छेडछाड केली जाऊ शकत नाही. महिलांच्या विरोधातील गुन्ह्यांसाठी केंद्र सरकार राज्यांसोबत असल्याचे मोदी म्हणाले.

यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन्, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीश महाजन आदी उपस्थित होते.

### आत्मसन्मान मिळाल्याची महिलांची भावना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील निवडक लखपती दीदींशी संवाद साधला. लखपती दीदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाबाबत त्यांनी जाणून घेतले. महिला बचतगटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो, आम्हाला आत्मसन्मान मिळाला, अशी भावना लखपती दीदींनी व्यक्त केली.

# राज्य कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे पेन्शन योजना

**वृत्तसंस्था, मुंबई, २५ ऑगस्ट**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. ही योजना मार्च २०२४ पासून अंमलात आणली जाईल. या निर्णयाचा राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे.

राष्ट्रीय पेन्शन प्रणालीतील गुंतवणूकविषयी जोखीम राज्य शासनाने स्वीकारावी, हे समितीच्या शिफारशीतील तत्त्व मान्य करून राष्ट्रीय पेन्शन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्रस्तावित सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके पेन्शन व त्यावरील महागाई वाढ तसेच पेन्शनच्या ६० टक्के इतके कुटुंब पेन्शन व त्यावरील महागाई वाढ मिळेल. राष्ट्रीय पेन्शन प्रणाली लागू असलेल्या व १ मार्च २०२४ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या तसेच निवृत्तीनंतर वार्षिकी विकत घेतलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपासून ते २९ फेब्रुवारीपर्यंतच्या कालावधीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना या पेन्शन प्रणालीअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वार्षिकीमधील लाभ लागू राहतील व १ मार्चपासून सुधारित पेन्शन योजनेचा विकल्प देणाऱ्या निवृत्तिवेतनधारकास या योजनेंतर्गत पेन्शन देण्यात येणार आहे.

### सेवा कालावधीची गणना अंशदानाशी निगडित

या योजनेंतर्गत सेवा कालावधीची गणना सभासदाने प्रत्यक्ष भरलेल्या अंशदानाशी निगडित असेल. ज्या कालावधीसाठी सभासदाने अंशदान भरले नसल्यास तो कालावधी सेवाकाळ म्हणून गणला जाणार नाही. कर्मचाऱ्यांचे ज्या कालावधीचे अंशदान त्यांच्या वेतनातून कपात करण्यात आले नाही, असे अंशदान भविष्यात कर्मचाऱ्याने व्याजासह भरल्यास तो कालावधी सेवा कालावधी म्हणून गणण्यात येईल. यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही पार पाडल्यावर तसेच ही योजना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य पात्र कर्मचाऱ्यांना लागू असल्याने या संदर्भात सर्व यंत्रणा सुसज्ज झाल्यावर जे कर्मचारी राष्ट्रीय पेन्शन प्रणालीमधून १ मार्च २०२४ पूर्वी व नंतर सेवानिवृत्त झाले किंवा होणार आहेत, अशा कर्मचाऱ्यांकडून नव्या पेन्शन प्रणालीर्तगत किंवा सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजनेंतर्गत लाभ मिळण्याबाबत आवश्यक तो विकल्प घेण्यात येईल. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला त्याच्या संचित निधीमधून प्राप्त झालेल्या ६० टक्के परताव्याची रक्कम शासनाकडे भरणे अनिवार्य असणार आहे.

# संदीप घोषच्या घरासह १५ ठिकाणी सीबीआयचे छापे

**कोलकाता :** येथील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य संदीप घोषच्या घरासह त्याच्याशी संबंधित १५ ठिकाणांवर रविवारी सीबीआयने छापेमारी केली. प्रशिक्षणार्थी डॉक्टर महिलेवर बलात्कार करून तिची हत्या केल्याप्रकरणी सीबीआय मागील सात दिवसांहून अधिक काळ संदीप घोषची चौकशी करीत आहे.

सीबीआयचे पथक सकाळी पावणेसात वाजता संदीप घोषच्या घरी पोहचले. मात्र, आठवाजेपर्यंत घोष कुटुंबीयांनी दरवाजा उघडला नाही. त्यानंतर आठपासून पुढे सलग पाच तास घोषच्या घराची सीबीआय पथकाने तपासणी केली. बंगालच्या न्यायवैद्यक विभागात काम करणाऱ्या देबाशिष सोम नावाच्या कर्मचाऱ्याच्या घरीही सीबीआयने छापा टाकला. कोलकात्यातील बेलाघाट परिसरात ही कारवाई करण्यात आली. सीबीआयने आरजी कार वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी अधीक्षक संजय वशिष्ठ आणि हावडा येथील हतगछा भागात विपालसिंहच्या परिसरावरही छापे टाकले.

# यूपीएससीच्या परीक्षांच्या तारखांमध्ये बदल

**तभा वृत्तसेवा, नवी दिल्ली, २५ ऑगस्ट**

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात् यूपीएससीने २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या तारखांमध्ये बदल केला. तसेच, काही नवीन परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने वार्षिक परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून, सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, नागरी सेवा पूर्वपरीक्षा २५ मे २०२५ रोजी होणार आहे. यासाठी २२ जानेवारी रोजी अधिसूचना जारी केली जाईल आणि अर्ज करण्याची अंतिम तारीख ११ फेब्रुवारी असेल.

भारतीय वनसेवा (प्राथमिक) परीक्षा २५ मे रोजी होणार आहे. अभियांत्रिकी सेवा (प्राथमिक) परीक्षा ९ फेब्रुवारी रोजी होणार असून, त्याची अधिसूचना १८ सप्टेंबर २०२४ रोजी जारी केली जाईल. संयुक्त भू-शास्त्रज्ञ (प्राथमिक) परीक्षा १९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. ४ सप्टेंबर २०२४ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा १३ एप्रिल रोजी होणार आहे. राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि नौदल अकादमी परीक्षा १३ एप्रिल रोजी होणार आहे. त्याची अधिसूचना ११ डिसेंबर २०२४ रोजी जारी केली जाईल.

# शेतकऱ्यांना दिवसा अखंड वीज

**वृत्तसंस्था, मुंबई, २५ ऑगस्ट**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा अखंडित व भरवशाचा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० राबविण्यात येत आहे. मिशन मोडवरील या योजनेतून २०२५ पर्यंत सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट वाढवून ९००० मेगावॅट अधिक उर्वरित ७००० मेगावॅट असे १६ हजार मेगावॅट विकेंद्रित सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा उद्देश साध्य होणार आहे.





यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत देण्यात येणारे प्रोत्साहनात्मक आर्थिक साहाय्य सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली. यात वीज उपकेंद्राची देखभाल व सुधारणा, प्रोत्साहनात्मक आर्थिक साहाय्य, ग्रामपंचायतींना आर्थिक प्रोत्साहन देण्यासाठी २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीसाठी २,८९१ कोटी इतका अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी २०२४-२५ या वर्षीच्या ७०२ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. केंद्राच्या आर्थिक साहाय्य निधीच्या धर्तीवर राज्य शासनाकडून उर्वरित क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मितीकरिता राज्य सरकार आर्थिक मदत निधी ३० टक्के देण्यास व त्यासाठी २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीसाठी एकूण १० हजार ४२ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. बळीराजा मोफत वीज योजना राज्यात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षम तेपर्यंतच्या शेती पंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाणार आहे.

# राजकीय पृष्ठभूमी नसलेल्या तरुणांनी राजकारणात यावे

## 'मन की बात' मध्ये पंतप्रधानांचे प्रतिपादन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली, २५ ऑगस्ट**

लोकशाही मजबूत करण्यासाठी कुठलीही राजकीय पृष्ठभूमी नसलेल्या तरुणांनी राजकारणात यायला हवे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. एकविसाव्या शतकात अनेक मोठ्या घडामोडी घडल्या, ज्यामुळे विकसित भारताचा पाया अधिकच मजबूत झाला असल्याचे मोदी यांनी सांगितले.

दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधानांनी देशवासीयांशी संवाद साधला. स्वातंत्र्यदिनाच्या संबोधनातून मी राजकीय पृष्ठभूमी नसलेल्या किमान एक लाख तरुणांना राजकारणात येण्याचे आवाहन केले होते. यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया आलेल्या आहेत. विकसित भारत आणि मजबूत लोकशाहीसाठी तरुणांनी राजकारणाचा पर्याय निवडावा, असे माझे आवाहन असल्याचे मोदी म्हणाले.

राजकारणाशी कुठलाही संबंध नसलेल्या हजारो नागरिकांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला होता. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. आज आपल्याला विकसित भारताचे स्वप्न साकारायचे आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपल्याला अशाच तरुणांची गरज आहे. त्यांनी समोर यावे, असे पंतप्रधानांनी सांगितले.

लाल किल्ल्यावरील माझ्या संबोधनानंतर मोठ्या संख्येत तरुणांनी राजकारणात येण्याची इच्छा व्यक्त केली. माझ्या ऑफपर्यंत असंख्य तरुणांच्या प्रतिक्रिया आल्या, अनेकांनी पत्र लिहिली. आता त्यांना योग्य संधी आणि मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, असे मोदी म्हणाले.

# युक्रेन-रशियात समझोत्याची तयारी?

**वृत्तसंस्था, दुबई, २५ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युक्रेन दौऱ्यानंतर २४ तासांत रशिया आणि युक्रेनने तोडग्याची तयारी दर्शविली आहे, असा दावा करणारे वृत्त प्रसारित झाले.

नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची काही दिवसांपूर्वी भेट घेतली होती. त्यानंतर मोदी यांनी शुक्रवारी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदोमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. या दोन्ही दौऱ्यांमध्ये मोदी यांनी शांतता आणि चर्चेच्या मार्गाने तोडगा काढण्याचा सल्ला दिला होता. युद्धभूमीवर प्रश्न सोडविले जात नसल्याचेही त्यांनी उभय राष्ट्रप्रमुखांच्या निदर्शनास आणून दिले होते.

भारत तटस्थ नसून, शांततेचा पुरस्कर्ता असल्याचे मोदी यांनी झेलेन्स्की यांना सांगितले होते. भारत प्रभावशाली देश असल्याने युद्धसमाप्तीसाठी मोदी यांनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती झेलेन्स्की यांनी केली होती. युक्रेनचा दौरा आटोपून मोदी मायदेशी परत आल्यानंतर रशिया-युक्रेनमध्ये तोडग्याच्या हालचाली सुरू झाल्याचे वृत्त आहे.

संयुक्त अरब अमिरातीतील (यूएई) उच्चपदस्थांच्या हवाल्याने हे वृत्त समोर आले आहे. दोन्ही देश चर्चेसाठी तयार असल्याचे यामध्ये म्हटले आहे. दोन्ही देशांनी कैद्यांची सुटका करण्याची तयारी दर्शविली आहे. यानुसार दोन्ही देशांकडून प्रत्येकी ११५ कैद्यांची मुक्तता करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, रशिया आणि युक्रेनमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी समझोत्यावर भाष्य करण्यास नकार दिला. दोन्ही देशांमध्ये आतापर्यंत १७८८ कैद्यांची देवाण-घेवाण करण्यात आल्याचा दावाही यूएईमधील सूत्रांनी केला आहे.

# सोमालिया, टांझानिया, सुदान येथील चित्ते भारतात आणणार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली, २५ ऑगस्ट**

भारताने दक्षिण आफ्रिका आणि नामिबियासारख्या दक्षिण गोलार्धातील देशांतून आणलेल्या चित्त्यांमध्ये निर्माण झालेली बायोरिदमची समस्या टाळण्यासाठी सोमालिया, टांझानिया, सुदान आणि विषुववृत्ताच्या जवळ किंवा उत्तर गोलार्धातील इतर श्रेणीतील देशांमधून नवीन चित्ते आणण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत.




उत्तर आणि दक्षिण गोलार्धामधील सर्केडियन रिदममधील फरकांमुळे काही चित्त्यांनी गेल्या वर्षी भारतीय उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात आफ्रिकन हिवाळ्याच्या (जून ते सप्टेंबर) अपेक्षेने हिवाळ्याचे जाड आवरण तयार केले. यातील तीन चित्ते पाठीवर आणि मानेवर जखमा झाल्यामुळे मरण पावले. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतील चित्त्यांनी पुन्हा एकदा जाड आवरण विकसित केल्याचे सूत्रांकडून समजले. असे असले तरी, नवीन चित्ते आणण्यासाठी दक्षिण गोलार्धातील देशांशी भारत सरकारने चर्चा सुरू केली आहे.

दक्षिण आफ्रिका आणि नामिबियासह सर्व देशांशी चर्चा सुरू आहे. मात्र, अद्याप औपचारिकपणे कुणाशीही संपर्क साधण्यात आला नाही. सध्या आमचे लक्ष शिकार तळ वाढवणे, बिबट्याचे व्यवस्थापन करणे आणि गांधी सागर वन्यजीव अभयारण्य तयार करणे यासारख्या समस्यांवर आहे, असे सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले. गेल्या वर्षी १० ऑगस्ट रोजी सुकाणू समितीच्या बैठकीत अध्यक्ष राजेश गोपाल यांनी सांगितले की, दक्षिण गोलार्धातील देशांतील स्थानिक वातावरण, हवामान आणि परिस्थितीनुसार समायोजित करण्यासाठी किती वेळ लागतो आणि तशी स्थिती कुणी प्रत्यक्ष अभ्यासण्यात आहे काय, हे देखील चित्त्यांच्या मृत्यूमागील कारण असू शकते.

बायोरिदमिक समायोजनाच्या अभावामुळे काही चित्ते एक्टोपॅरासिटिक संसर्गाला बळी पडले, जे त्यांच्या पूर्वीच्या निवासस्थानाच्या हवामान परिस्थितीशी समक्रमित होते. जिवंत चित्त्यांमधील तिसरी पिढी अधिक प्रतिरोधक असेल आणि कुनोतील परिस्थितीशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेतील, असे गोपाल यांनी बैठकीत सांगितले.

या समस्येमुळे आणखी काही चित्त्यांचा मृत्यू होण्याची शक्यता वर्तवताना, बायोरिदमिक समस्या टाळण्यासाठी भविष्यातील चित्ते केनिया किंवा सोमालियासारख्या उत्तर गोलार्धातील देशांमधून आणली जावी, अशी शिफारस केली.


## ऋणनिर्देश



**स्व. मोहनसा भिमरावसा गांगजी**

मृत्यू दि.२२.८.२०२४

पूज्य मोहनसा भिमरावसा गांगजी यांच्या आकस्मिक निधनाने आमच्या गांगजी परिवारावर कोसळलेल्या आघातप्रसंगी सो. स. क्षत्रिय समाजाचे ट्रस्टी, समस्त समाज बांधव, आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र परिवार, व्यापारी वर्ग यांनी आमचे सांत्वन केले, धीर दिला त्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.

शोकाकुल

श्रीमती रेखा मोहनसा गांगजी

अमित मोहनसा गांगजी | अश्विन मोहनसा गांगजी

समस्त गांगजी परिवार

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात दहीहंडी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२५ ऑगस्ट-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात दहीहंडीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

प्रारंभी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते श्री कृष्ण मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी सेमी विभागाचे दिगंबर जगताप व इतर शिक्षक उपस्थित होते. विष्णूचा आठवा अवतार असलेल्या श्रीकृष्णाचा जन्म श्रावण महिन्यातील कृष्ण अष्टमीच्या दिवशी झाला व श्रीकृष्णाला दही, दूध, लोणी खूप आवडत असे. मात्र माय यशोदा कृष्णापासून दह्याचे रक्षण करण्यासाठी हंडी उंच ठिकाणी किंवा शिंक्यावर ठेवत असे, पण श्रीकृष्ण तिथपर्यंत पोहचण्यात यशस्वी होत असे व यासाठी त्याचे मित्र त्याला मदत करत असतं. याची आठवण म्हणून श्री कृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडीचा उत्सव सर्वत्र अतिशय उत्साहात साजरा केला जातो. याक्षणी श्री कृष्ण-राधाच्या वेशभूषेतील काही मुलीनी 'कृष्ण जन्मला ग बाई', 'मैय्या यशोदा' या विशिष्ट अशा गाण्यावर सुंदर नृत्य केल्या. यानंतर या उत्सवात पाचवी ते दहावीपर्यंतच्या मुला-मुलींनी बनवलेल्या प्रत्येक संघाने मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा छान प्रयत्न केला. गोविंदा आला रे आला असा एकच जल्लोष केला. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, पूनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.

# भारतीय मजदूर संघाचे मौन दुर्दैवी

## अरुण कुलकर्णी यांची भावना; सेवानिवृत्त कामगारांचे पेन्शन वाढीवर भाष्य

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २५ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून इपीएस ९५ या पेन्शन योजनेत सुधारणा होऊन ती ७,५०० रु. करावी, या साठी वयोवृद्ध पेन्शनधारक दिल्लीमध्ये आंदोलन करत आहेत. यामध्ये न्यायालय लक्ष घालत आहे. ना सरकार अशा परिस्थितीत देशातील सर्वात मोठी कामगार संघटना म्हणून लौकिक असणारी व कामगार व देशाचे हितसमोर ठेवून काम करणारी भारतीय मजदूर संघांचे या पश्नी असणारे मौन दुदैवी असल्याची प्रतिक्रिया अरुण कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

मनमोहन सिंगांचे सरकार असताना सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ईपीएस ९५ ही पेन्शन योजना राष्ट्रपती अध्यादेशाने सुरू करण्यात आली. परंतु या योजनेबाबत सर्वच अनभिज्ञ असल्याने योजनेतील अनेक तृटीमुळे होणारे तोटे त्यावेळी कोणालाच समजले नाहीत. परंतु सेवानिवृत्तीनंतर पाचशे ते अडीच हजार यापलीकडे पेन्शन मिळत नव्हती यावर पंतप्रधान मोदींच्या काळात १ हजार रु.च्या आतील पेन्शनला १ हजारापर्यंत वाढ मिळाली. परंतु अपुऱ्या मिळणाऱ्या पेन्शनसंदर्भात नंतर अनेक संघटना न्यायालयात गेल्या तसेच दीर्घ काळापासून दिल्ली येथे पेन्शन वाढीसाठी संघर्ष चालू आहे. परंतु या पेन्शनमध्ये सुधारणा होऊन ती ७,५०० रु करावी म्हणून आजूनही सेवानिवृत्त कामगारांचा लढा चालू आहे.



भारतीय मजदूर संघाचे संस्थापक कै. दत्तोपंत ठेंगडी यांच्यासारख्या संघाच्या मुशीत घडलेल्या कार्यकर्त्याने, देशांमध्ये राष्ट्रीय विचारांची कामगार संघटना स्थापन करून त्यांच्या मनामध्ये देशहिताला प्रथम प्राधान्य दिले. त्यावेळी डाव्या विचारसरणीच्या व व इंटक प्रणित कामगार संघटना देशामध्ये आघाडीवर होत्या. अशाप्रसंगी सुद्धा त्यांच्याशी टक्कर देऊन भारतीय मजदूर संघाची वाढ केली व देशातील कामगारांच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण करून कामगार हितालाही प्राधान्य दिले. त्यामुळेच आज भारतीय मजदूर संघ ही देशातील एक मोठी देशव्यापी कामगार संघटना निर्माण झाली आहे. या विचारसरणीतूनच काम करणारे अनेक प्रामाणिक व सच्चे कार्यकर्ते आता सत्तरीच्या आसपास किंवा अनेकांनी सत्तरी पार केली आहे.

**न्याय मिळवून द्यावा**

एका राष्ट्रवादी विचारांची व कामगार हिताची जाणीव असणाऱ्या भारतीय मजदूर संघाकडून आम्ही ईपीएस ९५ चे पेन्शनधारक एक साधी अपेक्षा व्यक्त करतो की, भारतीय मजदूर संघाच्या वतीने पंतप्रधान मोदींना पेन्शनधारकांची कैफियत मांडून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी अरुण कुलकर्णी यांनी केली आहे.

माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला असे लक्षात येते की राष्ट्र विचारांच्या ध्येयाने काम करणाऱ्या अनेक संघटना मधून बऱ्याच कार्यकर्त्यांना राज्यसभा किंवा लोकसभेमध्ये काम करण्याची संधी मिळते. पण कठीण परिस्थितीमध्ये काम करून भारतीय मजदूर संघ व त्यांच्या विचाराची संघटना टिकवणाऱ्या कार्यकर्त्यांना अशा फारच कमी संधी मिळत आहेत व त्यामुळे देशातील औद्योगिक कामगारांचा आवाज, लोकसभेत किंवा राज्यसभेत फारसा उठविला जात नाही व त्याचा पाठपुरावाही होत नाही. भारत औद्योगिक विकासाच्या प्रगतीपथावर असताना कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष होते आहे काय? असे वाटते.

देशामध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणार कोट्यावधी कामगारांमुळे देशाच्या अर्थ कारणारला गती मिळाली परंतू सेवानिवृत्त कामगार आज ज्या संकटांशी सामना करत आहेत त्यांची फारशी कोणी दखल घेतलेली नाही ही बाब निश्चितच राष्ट्रहिताला हानिकारक आहे. भारतीय मजदूर संघ ही देशातील कामगारांची व सत्ताधाऱ्यांना अनुकूल असणारी बलाढ्य संघटना आहे हे मान्य, परंतु ग्राउंड लेव्हल ला पाहता सामान्य वाटणाऱ्या अंगणवाडी सेविका मध्ये सुद्धा लालबावटा ही कामगार संघटना कार्यरत दिसते. सोलापूर सारख्या बिडी कामगारांना सुद्धा तीस हजार घरे देशाचे आदरणीय पंतप्रधान मोदीजी उपलब्ध करून देतात. पण त्या कामगारांच्या वर सुद्धा विरोधी कामगार संघटनेचा प्रभाव दिसून येतो, या व अशा अनेक घटनांचा भारतीय मजदूर संघाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी विचार केला पाहिजे. सेवानिवृत्तीनंतर मिळणारी प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्युटीची रक्कम आम्हाला मिळते.

**महागाईमुळे मोठी अडचण**

वाढते आयुर्मान व वाढती महागाई यामुळे उतार वयात जगण्यासाठी आवश्यक असणारी पुंजी जवळजवळ संपत येते. तसेच वाढत्या वयाबरोबरच येणाऱ्या अनेक व्याधी आम्हाला त्रस्त करतात. त्यातच मिळणारी ही ईपीएस ९५ ची तुटपुंजी पेन्शन. ती आम्हाला औषध उपचार व चहालासुद्धा पुरत नाही. त्यामुळे जगणे अवघड होते. राजकीय पक्ष व त्यांचे नेते व कामगार संघटना यांच्याकडून तसेच कौटुंबिक व सामाजिक होत असणारे दुर्लक्ष लक्षात येते. भारतासारख्या देशात एका बाजूला स्वस्त मजुरांची होणारी ससेहोलपट, औद्योगिक क्षेत्रातील सेवानिवृत्तांच्या जखमा व वेदना अधिक तीव्र व गडद होत आहेत.

# प्रतिमेचा खरा आरसा म्हणजे छायाचित्रकार

## बोधले महाराज : बार्शीत छायाचित्रकार दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ ऑगस्ट-**

आपण कसे दिसतो, यासाठी आपण आरसा बघतो परंतु आपल्या विविध संकल्पनेतून आपल्या चेहऱ्यावरची छबी वेगवेगळ्या अँगलने टिपली जाते, त्या छायाचित्रकाराचे कौशल्यच महत्त्वाचे असते. म्हणूनच आपल्या प्रतिमेचा आरसा हा छायाचित्रकारच असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ कीर्तनकार ऍड. जयवंत बोधले महाराज यांनी केले. बार्शी फोटोग्राफर असोसिएशन व थर्डआय फोटोग्राफर क्लब यांच्यावतीने काढण्यात आलेल्या कॅमेरा पालखी सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



बोधले महाराज आणि आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते पालखीचे उदघाटन भगवंत मंदिरासमोर करण्यात आले. माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, बाजार समितीचे माजी उपसभापती कुंडलिकराव गायकवाड, शिक्षण मंडळाचे माजी सदस्य भारत पवार उपस्थित होते. यावेळी बोधले महाराज म्हणाले, आपण कसे दिसतो याचे वास्तव छायाचित्रकाराच्या कॅमेरातून कळत असते. आपली उपजीविका ज्या कॅमेरावर अवलंबून आहे, त्या कॅमेरारुपी दैवताची पालखी काढणे हा खरंच कौतुकास्पद उपक्रम असल्याचेही त्यांनी सांगितले. आ. राऊत यांनी देखील छायाचित्रकारांच्या या अनोख्या उपक्रमाबद्दल कौतुक व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले, आपण ज्या कॅमेऱ्याच्या सहाय्याने कुटुंब चालवतो त्या कॅमेऱ्याची पालखीतून मिरवणूक काढणे, याचे करावे तेवढे कौतुक थोडेच असल्याचे त्यांनी सांगितले. माझेही राजकारणामुळे खूप दिवसांपासून या सगळ्यांशी संपर्क आहे. याबरोबरच त्यांनी जुन्या काळातील फोटोग्राफरचे पण आदराने उल्लेख केला. ही पालखी महाद्वार चौक, चाटे गल्ली, पटेल चौक, पानखुंट चौक, ऐनापुर मारुती रोड मार्गे, शाहीर अमर शेख चौक, पांडे चौकातून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर विसर्जित करण्यात आली.

यावेळी पालखी सोहळ्याला उपस्थित लक्ष्मीनारायण मिश्रा, बंटी काळे, अंकुश कंगले, सनी बलदोटा, राजेश वानखेडे, सचिन शहापुरे, भैया परदेशी, पप्पू बागल, विनोद गुंड, राहुल सातपुते, अमोल लुंगारे, अशोक नागरगोजे, अमोल भालेराव यांच्यासह शहर व तालुक्यातील छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बंटी काळे यांनी तर सूत्रसंचालन चरणसिंह परदेशी यांनी केले. कार्यक्रमाचे आभार अंकुश कंगले यांनी मानले.

**सिनेमॅटोग्राफीवर प्रात्यक्षिक**

पालखीनंतर छायाचित्रकारांसाठी समृद्धी लॉन्स येथे सिनेमॅटोग्राफी या कार्यक्रमात सचिन वायकुळे यांनी छायाचित्रकारांना मार्गदर्शन करताना एकजुटीने व एकसंध राहण्याचे महत्व पटवून दिले. त्याचबरोबर पॅनासॉनिक कंपनीचे किरण कुंभार यांनी फोटोग्राफीमधील सिनेमॅटोग्राफी प्रात्यक्षिकासह माहिती दिली.




# महादेव कोगनुरेंच्या जनता दरबारात जनतेचे प्रश्न निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २५ ऑगस्ट-**

एमके फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व जनसेवक महादेव कोगनुरे दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. म्हणून कोगनुरे यांनी सहा महिन्यांपासून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सोलापूर येथे दररोज जनता दरबाराचे आयोजन करतात. कोगनुरे यांनी सामान्य माणसांचे प्रश्न जागेवरच कसा मार्गी लावता येईल यासाठी अथक परिश्रम घेताना दिसतात.

जनता दरबारच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांच्या विविध समस्या जागेवरच सोडविण्यात येत असल्याने महादेव कोगनुरे यांच्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यात सामान्य शेतकरी, महिला, मजूर, शहरातील नागरिक तसेच युवकांचा मोठा प्रतिसाद या जनता दरबारला मिळत आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यातच दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील नेते आणि कार्यकर्ते सध्या ॲक्टिव्ह झाल्याचे दिसून येत आहे. महादेव कोगनुरे यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते सध्या निवडणूक हातात घेण्यासाठी सज्ज झाल्याचे बोलले जात आहे. जनता दरबार, कृषी मेळावा, मोफत आरोग्य शिबीर, जळीतग्रस्तांना मदतीचा हात तसेच शैक्षणिक, सामाजिक आदी समाजोपयोगी कार्यातून पाहिल्यास दक्षिणमध्ये कोगनुरे यांचे राजकीय वर्चस्व वाढल्याचे बोलले जात आहे. कोगनुरे यांनी जनतेचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. यामुळेच कोगनुरे यांच्या जनता दरबारला नागरिकांचा गर्दी होताना दिसून येत आहे.



# पंढरपूर नगरपरिषद कर्मचारी पतसंस्था एकच्या चेअरमनपदी दिनेश साठे

## व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय चंदनशिवे, सेक्रेटरीपदी तानाजी अधटराव यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ ऑगस्ट-**

पंढरपूर नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था नं.१ निवडणूक बिनविरोध पार पडली. यामध्ये चेअरमनपदी दिनेश साठे, व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय चंदनशिवे आणि सेक्रेटरीपदी तानाजी अधटराव यांची निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी पी. बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच सभेचं आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडली.या झालेल्या सभेमध्ये पंढरपूर नगरपरिषद कर्मचारी पतसंस्था नं.१ च्या चेअरमन पदासाठी दिनेश साठे, व्हाईस चेअरमनपदासाठी दत्तात्रय चंदनशिवे आणि सेक्रेटरीपदासाठी तानाजी अधटराव यांचा एकच अर्ज आल्याने या सर्वांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

यावेळी कामगार नेते तथा संस्थेचे माजी ज्येष्ठ संचालक ॲड. सुनील वाळुजकर, पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आदापुरे, कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे, सहकार्याध्यक्ष माजी संचालक शरद वाघमारे, प्रीतम येळे, अनिल पांडुरंग अभंगराव, आरोग्य अधिकारी नागनाथ तोडकर हे उपस्थितीत होते. यावेळी नवीन नेतृत्व माजी चेअरमन व नूतन संचालक जयंत पवार, खंबीर नेतृत्व धनाजी वाघमारे, चंद्रशेखर वेळापुरे, चिदानंद सर्वगोड, संभाजी देवकर, नवनाथ पवार, राणी गायकवाड, लक्ष्मी हुंडेकरी यांचाही सत्कार निवडणूक निर्णय अधिकारी पी. बी. सावंत यांच्या हस्ते करण्यात आला. आभार शरद वाघमारे यांनी मानले. लिपिक संजय माने यांनी सहकार्य केले.

# ४ सप्टेंबरला राष्ट्रवादीत प्रवेश करणार

## सूरज देशमुख, रावसाहेब देशमुख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २५ ऑगस्ट-**

पुरोगामी विचारधारा जपण्यासाठी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात ४ सप्टेंबर रोजी पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खा. सुप्रिया सुळे व खा. धैर्यशिलसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्ष प्रवेश करणार आहोत, अशी माहिती सूरज देशमुख व रावसाहेब देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माढा तालुक्यातील पिंपळनेर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब देशमुख व टेंभुर्णीतील तिसऱ्या आघाडीचे प्रमुख सूरज देशमुख यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. आमच्या



परिवाराने नेहमीच पुरोगामी विचारधारेला धरून काम केले आहे. आज महाराष्ट्रामध्ये शाहू-फुले-आंबेडकर विचारधारा जपणारा पक्ष म्हणून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ओळख आहे. सर्वधर्मसमभाव जपणारा, सामाजिक एकोपा जपणारा हा महाराष्ट्रातील एकमेव पक्ष आहे. यामुळे या पक्षाबरोबर काम करावे अशी कार्यकर्त्यांनी आग्रह केला आहे. ४ सप्टेंबर रोजी टेंभुर्णीत दहीहंडी महोत्सवाचे आयोजन नाना-भैय्या युवा मंचाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष जयंतराव पाटील, राज्याचे माजी मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खा. सुप्रिया सुळे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात पक्षप्रवेश होणार आहे, असे देशमुख यांनी सांगितले.

**अनेक प्रश्न प्रलंबित**

या भागातील खूप प्रश्न आहेत. काही वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहेत. सोयीसुविधेपासून नागरिक वंचित आहेत असा आरोप त्यांनी केला. मागील वर्षांपासून दहीहंडी महोत्सव सुरू केला आहे. यामध्ये मुंबई येथील आराध्या या महिलांच्या संघास सलामीचा संघ म्हणून प्रथम दहीहंडी फोडण्याची संधी देण्यात येणार आहे. तसेच विधानसभेबाबत पक्ष जी जबाबदारी देईल, ती पूर्ण ताकदीनिशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करू, असे देशमुख बंधूंनी सांगितले.

**नावात बदल**

माझे जुने नाव : **चेतना राजेश गुदलानी** असे होते ते बदलून, मी माझे नवीन नाव : **चेतना राजेंद्र गुदलानी** असे केले आहे.
तरी मला आजपासून नवीन नावाने ओळखावे.
पत्ता :- ३८, गुरुनानक नगर, सोलापूर-४१३००३

**नावात बदल**

माझे जुने नाव : **राजेश नीलराज गुदलानी** असे होते ते बदलून, मी माझे नवीन नाव : **राजेंद्र नीलराज गुदलानी** असे केले आहे. तरी मला आजपासून नवीन नावाने ओळखावे.
पत्ता :- ३८, गुरुनानक नगर, सोलापूर-४१३००३

# तामलवाडी पाझर तलावातून रोजच लाखो लिटर पाणी वाया!

## तीन वर्षांपूर्वी फुटला सांडवा; धाराशिव लघुपाटबंधारे विभाग कुंभकर्णी निद्रेत...!

### जिल्हाधिकारी ओम्बासे यांनी कानउघडणी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

सोलापूर-तुळजापूर महामार्गालगत आणि तामलवाडी गावापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या पाझर तलावाचा सांडवा फुटून रोजच लाखो लिटर पाणी वाया जात असून, याबाबत दैनिक तरूण भारतच्या माध्यमातून वारंवार आवाज उठवूनही धाराशिव लघु पाटबंधारे विभागाला कुंभकर्णी झोप लागल्याचेच दिसून येत आहे.

यामुळे आता जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांनीच या विभागातील अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी करावी आणि वाया जाणारे पाणी वाचवावे, अशी मागणी या भागातील शेतकरी बांधवांची आहे. धाराशिव जलसंपदा विभाग पाणी आडवा, पाणी जिरवा अशा शासनाच्या योजना फक्त कागदावरच राबविताना दिसून येत आहे. तुळजापूर तालुकाच नाही तर अवघ्या जिल्ह्यातील विविध ओढ्यांवरील बंधाऱ्यांची दुरावस्था आहे. काही मोठ्या साठवण तलावाकडेही त्यांचे दुर्लक्षच होत आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी या गावचा पाझर तलाव आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांपूर्वी निर्माण केलेल्या या पाझर तलावाच्या भरावाची गेल्या एक-दोन वर्षांपूर्वी डागडुजी झाली मात्र या तलावाचे काम करून घेणाऱ्या अभियंत्यांना या तलावाचा सांडवा फुटून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिसून आले नाही, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तुळजापूरचे तहसीलदार सौदागर तांदळे हे तामलवाडी येथे दौऱ्यावर आल्यावर त्यांच्याही कानावर ग्रामस्थांनी सांडवा फुटल्याचा हा प्रकार घातला होता. मात्र त्यांनीही दुर्लक्षच केले होते. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सारखा पाऊस पडत आहे. मात्र, तलावाच्या उंचीच्या मानाने या तलावात पाणी साठवण होत नाही. यामुळे जिल्हाधिकारी ओम्बासे यांनी तत्काळ या तलावातून वाया जाणाऱ्या पाण्याची दखल घेवून संबंधित यंत्रणेस कामाला लावावे, अशी मागणी तामलवाडी ग्रामस्थांसह शेतकरी बांधवांची आहे.



**तोंडी, लेखी झाले आता उपोषणाचा मार्ग**

गेल्या २ वर्षांपासून जिल्ह्याच्या पाटबंधारे विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडे गावकऱ्यांच्या वतीने तोंडी, लेखी मागणी करूनही तामलवाडीच्या पाझर तलावाच्या या फुटलेल्या सांडव्याची ते दखल घेताना दिसत नाहीत. यामुळे येत्या आठवडाभरात या सांडव्याची डागडुजी न झाल्यास आता धाराशिव येथील लघु पाटबंधारे कार्यालय किंवा अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयासमोर तुळजापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून आपण उपोषणाचा मार्ग अवलंबिणार आहोत.

**- शिवाजी सावंत**, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस
तुळजापूर विधानसभा मतदारसंघ (शरदचंद्र पवार गट)

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषत: शहर पंढरपूर, ता. पंढरपूर, जि.सोलापूर येथील व तसेच संपूर्ण सोलापूर जिल्हा परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व तालुका पंढरपूर, शहर पंढरपूर, येथील सिटी सर्व्हे नं. १३७२/५ याचे क्षेत्रफळ ४५.१० चौरस मिटर सदरहू मिळकत हि आमचे पक्षकार सुलन माधव साळुंखे यांच्या मालकी कब्जे वहीवाटीची मिळकत आहे. तरी परंतु सदरहू मिळकतीबाबतचे खरेदी दस्त नं. ५८१/१९९२ चे मूळ (ओरिजनल) दस्त दि.१५/१०/१९९२ चे मूळ (ओरिजनल) दस्त ची प्रत आमचे पक्षकाराकडून दि. २०/०८/२०२४ रोजी जिल्हा परिषद, सोलापूर परिसर येथे अनावधानाने गहाळ झालेले/हरविलेले आहेत. तसेच त्याबाबत आमचे पक्षकार यांनी सदर बझार पोलीस स्टेशन येथे ऑनलाईन पद्धतीने दि. २५/०८/२०२४ रोजी गहाळ झालेबाबत गहाळ नं. ३७१९/२०२४ अन्वये तक्रारदेखील दाखल केलेली आहे. तसेच सदरहू दस्ताशी आमचे पक्षकाराशिवाय अन्य कोणाचा कसलाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाही.

तथापी जरी कोणत्याही व्यक्तीचा रजिस्टर खरेदी दस्त नं. ५८१/१९९२ (सब रजिस्टर, पंढरपूर) या दस्ताशी कसल्याही प्रकारचा काहीही संबंध अथवा अधिकार अथवा अन्य काही संबंध असल्यास किंवा आल्यास तसेच सदरील दस्त कोणाला आढळून आल्यास किंवा मिळाल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून तीन दिवसाच्या आत अँड. प्रविण चंद्रकांत निकम, रा.अभिषेक नगर, सोलापूर मो.नं.९०२१८२१२५५ यांचेशी प्रत्यक्ष भेटून आपला आक्षेप पुराव्यानिशी नोंदवावा किवा दयावा. तसेच त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँका अथवा अन्य कोणाचाही कसलाही विचार केला जाणार नाही. तसेच त्यानंतर येणाऱ्या व्यक्तींचा सदर दस्ताशी काहीही संबंध नाही असे गृहीत धरले जाईल. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

ही जाहीर नोटीस दि. २५/०८/२०२४

सही/-
ॲड. प्रविण चंद्रकात निकम
बी.ए., एल.एल.बी.
रजि.नं.५६११/२०११
मो.नं.९०२१८२१२५५
अभिषेक नगर, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### मुंबई ते अयोध्या दोन विशेष ट्रेन चालवणार

**मुंबई, दि.२५ ऑगस्ट-**

मध्य रेल्वेने प्रवाशांच्या गरजेनुसार प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई आणि अयोध्या दरम्यान दोन विशेष ट्रेन सेवा चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-अयोध्या विशेष गाडी (०१०१९) विशेष गाडी गुरुवारी दि. २९ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून रात्री ११.२० वाजता सुटेल आणि अयोध्या छावणी तिसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता पोहोचेल. तसेच विशेष गाडी (०१०२०) शनिवारी (दि.३१) अयोध्या छावणी येथून रात्री ११.४० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे तिसऱ्या दिवशी सकाळी ८.१५ वाजता पोहोचेल. ही ट्रेन कल्याण, इगतपुरी, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, विरांगना लक्ष्मीबाई झाशी, उरई, कानपूर आणि लखनऊ येथील स्थानकावर काहीकाळ थांबेल. गाडीची संरचना: २ गार्ड्स ब्रेक व्हॅन १६ शयनयान आणि ६ जनरल सेकंड क्लास अशी असून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर विशेष शुल्कावर विशेष ट्रेन क्रमांक ०१०१९ चे बुकिंग २६ ऑगस्टला रोजी उघडेल. विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस प डाउनलोड करा. प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवांचा लाभ घ्यावा ,असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### पाकिस्तानमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांत बस दरीत कोसळून ४० जणांचा मृत्यू

**कराची, २५ ऑगस्ट-**


पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात रविवारी एक बस राष्ट्रीय महामार्गावरून घसरून दरीत कोसळल्यामुळे किमान ११ जण ठार व ३५ जण जखमी झालेत, तर पंजाब प्रांतात बस दरीत पडल्यामुळे २९ जणांचा मृत्यू झाला व एक जण जखमी झाला आहे. इराणहून ७० प्रवाशांना घेऊन बस पंजाब प्रांताकडे परत येत होती. या परतीच्या प्रवासादरम्यान बस महामार्गावरून नदीत कोसळली व हा अपघात झाला, असे एका वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. सिंध प्रांतातील कराची ते बलुचिस्तान प्रांतातील ग्वादरपर्यंत पाकिस्तानच्या अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर पसरलेला ६५३ कि. मी. चा राष्ट्रीय महामार्ग मकरन कोस्टल हायवेवर हा अपघात झाला. या अपघातातील बहुतांश प्रवासी लाहोर किंवा गुजरांवाला येथील होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. बचावकार्य सुरू असल्याचे लासबेला जिल्हा आयुक्त हुमैरा बलोच यांनी सांगितले. या घटनेत इतर ३५ जण जखमी झाले असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाझ शरीफ यांनी लासबेला दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले.



### मालिका कलाकारांनी घेतले स्वामींचे दर्शन

**अक्कलकोट, दि. २५ ऑगस्ट-**

छोट्या पडद्यावरील गणपती बाप्पा मोरया व विठू माऊली या मराठी मालिकेतील कलाकार कार्तिकेय आणि हिंदी एक महानायक डॉ. बी. आर. आंबेडकर या मालिकेतील कलाकार साक्षी महाजन या कलाकारांनी श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी कार्तिकेय व साक्षी महाजन यांचा श्री. स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, मनोज इंगुले, सागर गोडाळ, गिरीश पवार इत्यादी उपस्थित होते.



### उमरड येथे सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**करमाळा, दि. २५ ऑगस्ट-**

उमरड (ता. करमाळा) येथे माजी सरपंच संदीप मारकड यांच्या पुढाकाराने नारायणआबा पाटील सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले. या वाचनालयाचे उद्घाटन माजी आ. नारायणआबा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष चोपडे, सभापती अतुल पाटील, बहुजन संघर्ष सेनेचे राजाभाऊ कदम, रिटेवाडीचे सरपंच किशोर रिटे, अंगद गोडगे, तात्यासाहेब सरडे, माजी उपसरपंच गणेश चौधरी, महावीर गिरी, तात्यासाहेब सरडे उपस्थित होते. यावेळी महावीर गिरी, नंदकिशोर वलटे, अंगद पठाडे, सभापती अतुल पाटील, राजाभाऊ कदम यांची भाषणे झाली. नारायण पाटील यांनी वाचनालयाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण घेऊन पुढे जावे, आपले अंगभूत कौशल्य ओळखावे, असे सांगितले. सूत्रसंचालन फोजमल पाखरे यांनी केले. आभार संदीप मारकड यांनी मानले.

### सुनीता विल्यम्स फेब्रुवारीमध्ये अंतराळातून परतणार

**न्यू यॉर्क, २५ ऑगस्ट**

भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचा साथीदार बुश विल्मोर फेब्रुवारीमध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून (आयएसएस) पृथ्वीवर परततील. अमेरिकन अंतराळ संस्था नासाने ही माहिती दिली. आयएसएसवर अडकलेल्या दोन अंतराळवीरांना बोईंगच्या नवीन स्टारलाईनर कॅप्सूलमध्ये आणणे धोकादायक ठरू शकते, हे नासाने अखेर मान्य केले. दोन्ही अंतराळवीरांना ५ जून रोजी एकाच अंतराळ यानाने आयएसएसमध्ये पाठवले होते. स्टारलाईनर कॅप्सूलचे हे पहिले उड्डाण होते.

# ‘त्या’ बालिकेचा कान दुखण्याचे कारण सांगत शाळेतून पाठवले होते घरी!

## बदलापुरातील पीडितेच्या आईने वाचला शाळा अन् पोलिसांच्या बेपर्वाहीचा पाढा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**बदलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

बदलापूरातील आदर्श विद्यामंदिरात दोन चिमुरड्यावर झालेल्या लैंगिक अत्याचार आणि शाळा प्रशासन व पोलिसांच्या बेपर्वाहीपणाबाबतच्या अनेक धक्कादायकबाबी आता समोर येत आहेत. पिडित बालिका स्वच्छता कर्मचारी अक्षय शिंदेने केलेल्या अमानुष अत्याचारामुळे त्रास होत असताना शाळेतील शिक्षकांनी तिचे कान दुखत असल्याचे सांगून शाळेतून घरी घेऊन जाण्यास सांगितले होते तर पोलिसांनी मुलगी दोन तास सायकल चालवल्याने तिला त्रास झाला असेल, असे सांगत तक्रार घेण्यास टाळाटाळ विलंब लावला असल्याची लावला होता. विशेष म्हणजे त्यांच्या घरी सायकल नसतानाही पोलीस तसे सांगत होते, संबंधित पीडितेच्या आईने ही माहिती विशेष तपास पथककाच्या (एसआयडी ) अधिकाऱ्यांसमोर जबाब दिली आहे.

त्यातून संबंधित शैक्षणिक संस्थेला वाचाविण्याचा पोलिसांचा प्रयत्न उघड झाला आहे. त्यासाठी पोलिसांच्यावर कोणाचा दबाव होता ? याबाबींचा छडा लावण्याचे आव्हान एसआयडीसमोर असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.



बदलापुराततील आदर्श विद्या मंदिरात दोन मुलीवर अमानुषपणे झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांनी राज्यभरात संतापाची लाट उमटली आहे .उच्च न्यायालयाने याबाबत सु मोटो याचिका दाखल करीत राज्य सरकार व बदलापूर पोलिसांचे कान उपटले आहेत त्याबाबत सविस्तर तपास, पीडितांचे व त्यांच्या पालकांचे जवाब व कारवाईचा अहवाल संबंधित कागदपत्रासह २७ ऑगस्टला होणाऱ्या सुनावणीवेळी हजर करण्याचे आदेश दिले आहेत. एसआयटीकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. त्यामध्ये पीडीतेच्या पालकांनी दिलेल्या जबाबदातून शाळा प्रशासन व स्थानिक पोलिसांची कुर्मगती आणि संशयास्पद कारभार उघड झाली आहे.

साधारण साडेतीन व चार वर्षांच्या चिमुकल्यावर अत्याचाराची घटना १२व १३ ऑगस्टला झाली असलीतरी १४ ऑगस्टला डॉक्टरांना दाखवल्यानंतर हा प्रकार मुलीच्या आईवडिलांच्या लक्षात आला.. मात्र शाळेकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली.

१३ ऑगस्टला नेमकं काय घडलं?

नराधम शिंदेने दोन मुलीवर अत्याचार केल्याने १३ ऑगस्टला त्यातील एकीला ताप आल्याने ती जण शाळेला गेली नव्हती. दुसरी मुलीला ही त्रास होऊ लागल्याने ती रडू लागली. त्यामुळे शिक्षकांनी तिच्या आईला फोन करुन ती मुलगी खूप रडतेय, तिचा कान दुखतोय,तुम्ही तिला शाळेतून घेऊन जा, असे सांगितले. तिला नीटपणे चालता येत नव्हते . तिची पावले वाकडेतिकडे पडत होती . मात्र शाळेतील शिक्षकांनी त्याकडे दुर्लक्ष करीत घरी पाठवून दिले त्यामुळे तिच्या पालकांनी डॉक्टरांकडे नेऊन तपासणी केली असता तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले.

त्यांनी विचारणा केल्यावर तिने शाळेतला दादा, गुदगुदल्या करतो, असे सांगितले. त्यांनी दुसऱ्या मुलीच्या पालकांशी संपर्क साधला असता त्यांनी म झी मुलगी रात्री बडबडते, झोपेत हातवारे करते, असे सांगितले. पोलिसाकडे तक्रार देण्याचे त्यांना सांगितल्यावर त्यांनी शाळेत गेल्यानंतर मुख्याध्यापिकेने असे घडू शकत नाही असे सांगत उडवाउडवीचे उत्तर देत तेथून पिटाळून लावले, एवढी मोठी शाळा आहे, आपण त्यांचे काय वाकडे करणार, असे सांगितले होते.. त्यामुळे त्यांनी मनसेच्या स्थानिक कार्यकर्तीसमवेत १६ ऑगस्टला पोलीस ठाण्यात गेले.

### पोलीस ठाण्यात काय घडलं?

१६ ऑगस्टला दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पोलीस ठाण्यात जाऊन घडलेला प्रकार सांगून शाळेविरुद्ध तक्रार घ्यायला सांगितले . त्यांना खासगी डॉक्टरांचा रिपोर्टही दाखवला.मात्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितोळे यांनी तक्रार दाखल करण्याऐवजी शाळेच्या मुख्याधापकांना फोन केला. त्यानंतर शितोळे यांनी मुलीने सायकल चालवल्यामुळे प्रायव्हेट पार्टला इजा झाली असेल. शाळेतून तसे सांगितले जात असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे सायकलच नसताना मुलींना त्यामुळे इजा कशी होऊ शकते?, आमच्याकडे सायकलच नव्हती असे सांगितल्यानंतर पोलिसांनी रात्री नऊ वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात बसवून घेतले. रात्री साडेबाराला शितोळे यांनी मुलीला मेडिकल चाचणीसाठी बदलापूर ग्रामीण रुग्णालयात नेले .तिथे आवश्यक वैद्यकीय सुविधा नसल्याने रात्री पावणेदोनला पुन्हा पोलीस ठाण्यात म्हणून थोड्या वेळानंतर उल्हासनगरच्या रुग्णालयात नेले. तिथे पहाटे चार वाजेपर्यंत तपासणी केली असता तेथील डॉक्टरांनीही अत्याचार झाल्याचे अहवाल दिला त्यानंतर तक्रार नोंदविण्यात आली.



सोलापूर : शहरातील चौपाड परिसरातील श्री सदगुरू नाशिककर महाराज मठात गोकुळाष्टमीनिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेस शनिवारी भगवान परशूराम यांच्या अवतारात सजविण्यात आले होते.

## इस्त्रायलमध्ये ४८ तासांसाठी आणिबाणी घोषित

### संरक्षण मंत्री योव गॅलंट यांची घोषणा

**तेल अवीव, २५ ऑगस्ट**

इस्त्रायलने लेबनॉनसोबत देशाच्या वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर पुढील ४८ तासांसाठी आणिबाणी जाहीर केली आहे. इस्त्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलंट यांनी याबाबत घोषणा केली.

पत्रपरिषदेत आयडीएफच्या प्रवक्त्याने सांगितले, आयडीएफ इस्त्रायलमधील नागरिकांच्या संरक्षणासाठी आवश्यक ते सर्व काही करीत आहे आणि करेल. गेल्या महिन्यांत तेहरानमध्ये हम



ासचे राजकीय नेते मारले गेल्यानंतर इराणने इस्त्रायलला धडा शिकवणार असल्याची धमकी दिली आहे.

लेबनॉनने उत्तर इस्त्रायलच्या दिशेने किमान ३२० रॉकेट डागले. तथापि, आयर्न डोमने लेबनीज रॉकेट्स हवेतच रोखण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यानंतर इस्त्रायलमध्ये ४८ तासांची आणिबाणी जाहीर करण्यात आली.

इस्त्रायलचे सैन्य लेबनॉनम धील हिजबुल्लाच्या स्थानांवर वेगाने हवाई हल्ले करीत आहे आणि १०० हून अधिक स्थानांना लक्ष्य केले. लेबनॉनच्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने हे पाऊल उचलले आहे. तेल अवीवजवळील बेन गुरियन विमानतळावरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. हिजबुल्लाच्या निवेदनानुसार, इस्त्रायली लष्कराला लक्ष्य करीत अनेक स्फोटक ड्रोन डागण्यात आले. याशिवाय इस्त्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलनेही लेबनॉनवर हल्ला चढवला. इस्त्रायली लष्कराने सांगितले की, हिजबुल्लाला प्रत्युत्तर देण्यासाठी रविवारी सकाळी लष्करी विमाने तैनात करण्यात आली होती.

## महाविकास आघाडीचे मुंबईतील ९९ टक्के जागांवर सहमती : राऊत

### तयारी विधानसभा निवडणुकीची

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, २५ ऑगस्ट-**

महाविकास आघाडीने जागा वाटपात आघाडी घेतल्याचे सध्या चित्र दिसत असून शनिवारी झालेल्या बैठकीत मुंबईतील ३६ जागांबाबत आघाडीत ९९ टक्के सहमती झाली आहे, असा दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केला.

ते म्हणाले,’ मुंबईवर मराठी माणसाचे आणि शिवसेनेचे वर्चस्व राहीले आहे. ते कायम रहावे या दृष्टीने जागा वाटप करण्यात येईल. मुंबई तोडण्याचे कारस्थान सुरू आहे. त्याला शह देण्यासाठी हे जागा वाटप होईल,. त्यामुळे कोणाच्या पोटात दुखत असेल तर त्यांनी औषध घ्यावे, महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत . मुख्यमंत्री कोण असावा यावरही वाद नसल्याचे त्यांना जाहीर केले. मुंबईच्या जागा वाटपाबाबत निर्णय झाला आहे. आता उर्वरीत महाराष्ट्राबाबत निर्णय २७ ऑगस्टला होईल, त्यात समतोल पद्धतीने जागा वाटप होईल. हे बंद दाराआड होईल. बाहेर कोणीही काही बोलणार नाही किंवा सांगणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केसे.

महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण याची चर्चा महायुतीने करू नये. त्यांची युती म्हणजे मोडतोड तांबा पितळ आहे. त्यांनी त्यांची काळजी करावी. असा टोलाही राऊत यांनी यावेळी लगावला. महिलांच्या सुरक्षेसाठी सध्या महाराष्ट्रात आंदोलन सुरू आहे. त्यावर पंतप्रधान काही जळगावम ध्ये बोलणार आहेत का? असा प्रश्न राऊत यांनी यावेळी केला. ज्या जळगावमध्ये ते येत आहेत तिथे चार अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाले आहेत. असं असताना कोणाला लखपती बनवायला निघालात असा सवाल त्यांनी करत मोदींच्या दौऱ्यावर टीका केली.

राज ठाकरे हे नेहमी आपली भूमिका बदलत असतात. त्यांची एक अशी भूमिका नाही. त्यामुळे त्यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही. ते नेहमी महाराष्ट्राचा द्वेष करणाऱ्या मोदी आणि शहांना साथ देतात. त्यामुळे आम्ही त्यांच्याकडे लक्ष देत नाही असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

# अन्यथा श्रीलंका, बांग्लादेशसारखी स्थिती ओढावेल : नाना पटोले

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नवी मुंबई दि. २५ ऑगस्ट-**

राज्यातील महायुतीचे सरकार जनतेच्या मतदानाने नाही तर गुजरातच्या आशिर्वादाने आले आहे. या महाभ्रष्ट सरकारला मराठी माणसांपेक्षा गुजरातच्या भल्याची जास्त चिंता आहे. राज्याची लूट थांबवून जनहिताची कामे करा अन्यथा तुमची अवस्था श्रीलंका, बांग्लादेशच्या सत्ताधा-यांप्रमाणे होईल ,असा इशारा म हाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी राज्य सरकारला दिला आहे.

नवी मुंबई काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घघाटन प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेसच्यावतीने आयोजिलेल्या मेळाव्यात ते बोलत होते सुरुवातीला मोटारसायकल रॅली काढण्यात आली.यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, जालन्याचे खा. डॉ. कल्याण काळे, नवी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष अनिल कौशिक, अनिकेत म्हात्रे, माजी उपम हापौर रमाकांत म्हात्रे, सौ. मंदाकिनी म्हात्रे, रत्नागिरी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अविनाश लाड, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस रामचंद्र दळवी, अंकुश सोनावणे आदी उपस्थित होते.



पटोले म्हणाले की,’ सत्ताधारी पक्षाच्या जवळच्या गुंड माफियांना वाय प्लस दर्जाची सुरक्षा दिली आहे. आपल्या मूळ पक्षाशी दगा करून फुटीर झालेल्या आमदारांना मोठ्या प्रमाणात सुरक्षा दिली आहे. सगळे पोलीस यांच्या सुरक्षेत व्यस्त आहेत. आमच्या माता भगिणी मुलींचे संरक्षण कोण करणार ? मुख्यमंत्र्यांच्या स्वत:च्या जिल्ह्यात महिला सुरक्षित नाहीत. बदलापूरची अमानवी घटना, बेलापूरच्या अक्षता म्हात्रे या भगिणीवर अत्याचार करून तिच्या खूनाची घटना अशा घटना राज्याच्या विविध भागात रोज घडत आहेत. पण असंवेदनशील सरकार फक्त कमिशन खाण्यात व्यस्त आहे. नवी मुंबईच्या स्वयंघोषित शिल्पकाराकडून नवी मुंबईला ओरबाडून खाण्याचे काम सुरु आहे. इथली नैसर्गिक संपदा, खारफुटी डोंगर टेकड्या साफ करून माफिया तयार झाले आहेत. नवी मुंबईत गेल्या चार महिन्यात पन्नासहून अधिक लोकांचा डेंग्यूने मृत्यू झाला आहे. अनेक भागात पाणीपुरवठा सुरळीत नाही आरोग्यव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. काँग्रेस पक्षाचे सरकार आल्यावर नवी मुंबईत देशातील सर्वात अद्यावत रूग्णालय उभारू. राज्यात आपल्याला परिवर्तन करायचेच आहे. असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी कार्यकर्त्यांना केले.

## अग्रलेख...

# नक्षलवाद-माओवादावर शेवटचा प्रहार

नक्षलवादी कारवायांचा बीमोड करण्यात सुरक्षा दलांना यश येत असून, २०२६ पर्यंत नक्षलवादाचा, डाव्या दहशतवादाचा पूर्णपणे सफाया केला जाईल, हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे शनिवारी केलेले ठाम वक्तव्य केंद्रातील मोदी सरकारची भविष्यातील वाटचाल स्पष्ट करणारे आहे. एकीकडे विकास कामांचा आणि पायाभूत सुविधांचा वेग वाढवत असतानाच दुसरीकडे नक्षलवादी प्रतिबंधक कारवाया सुरूच राहतील व माओवाद संपुष्टात आणल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, हे गृहमंत्र्यांचे प्रतिपादन देशवासीयांना आश्वस्त करणारे आहे. नक्षलवाद, लाल माओवाद किंवा डावा दहशतवाद ही लोकशाही व्यवस्था उद्ध्वस्त करणारी, देशाला पोखरणारी वाळवीच आहे आणि ती कुठल्याही परिस्थितीत संपुष्टात आणलीच पाहिजे, याविषयी कुणाही सुबुद्ध नागरिकाचे दुमत होण्याचे कारण नाही. केंद्र सरकारने गेल्या १० वर्षांपासून अवलंबिलेल्या कठोर धोरणामुळे देशातील नक्षलवादी हल्ल्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान देशभरातील नक्षलग्रस्त भागातील प्रचारसभांत बोलताना गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद/माओवादाचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार व्यक्त केला होता. तसेच गेल्या वर्षी हैदराबाद येथे आयपीएस अधिकाऱ्यांच्या विशेष संमेलनात बोलताना अमित शाह यांनी नक्षलवाद पूर्णपणे संपविण्याची प्रतिज्ञा घेतली होती तर शनिवारी देशातील सर्वच राज्यांचे पोलिस महासंचालक आणि मुख्य सचिवांच्या बैठकीत त्यांनी याचा पुनरुच्चार करून प्रभावी व निर्णायक उपाययोजना अवलंबिण्याचा निर्धार व्यक्त केला. पोलिसांचा दबाव, प्रभावी समुपदेशन आणि नक्षलवादी चळवळीत होणारी गळचेपी व शोषण तसेच भविष्याची अनिश्चितता, असुरक्षितता अशा कारणांमुळे चळवळीतील लोक मोठ्या प्रमाणात आत्मसमर्पण करीत आहेत. त्यांना सरकार घरकूल, अन्नसुरक्षा योजनेचा लाभ तसेच आधार, मतदान कार्ड अशा सुविधा देते. गेल्या काही वर्षांत शेकडो जहाल नक्षलवाद्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. पण पुरेशा सुरक्षेअभावी मूळ प्रवाहात आलेले हे लोक कायम जहाल नक्षलवाद्यांचे लक्ष्य असतात. त्यामुळे शरणागती पत्करलेल्या व सर्वसामान्य जीवन जगू पाहणाऱ्या 'माजी' नक्षलवाद्यांच्या जीविताचे संरक्षण करणे हे केंद्र व राज्य सरकारपुढील सर्वांत मोठे आव्हान आहे. केंद्र व संबंधित राज्य सरकारने घडविलेला विकास आणि सुशासनाविषयी नक्षलग्रस्त भागातील नागरिकांमध्ये खरोखरच विश्वास निर्माण झाला असला, तरी अजून बरीच वाटचाल करणे बाकी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. बिहार, झारखंड, ओडिशा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश ही देशातील प्रमुख नक्षलग्रस्त राज्ये आहेत. वर उल्लेखित राज्यांमध्ये नक्षलवाद बहुतांश प्रमाणात आटोक्यात आला आहे. मागील चार दशकांत नक्षलवादामुळे जवळपास १७ हजार लोकांचा मृत्यू झाला, हे विदारक वास्तव आहे. मात्र, केंद्रात भाजपाप्रणीत रालोआ सरकारची सत्ता आल्यानंतर प्रथमच नक्षलवादी/माओवाद्यांविरुद्ध जबरदस्त आघाडी उघडण्यात आली. सरकारची इच्छाशक्ती तीव्र असेल, हेतू प्रामाणिक असतील आणि त्याला निर्धारपूर्वक प्रयत्नांची-कृतीची जोड असेल तर माओवाद-नक्षलवाद संपुष्टात आणता येऊ शकतो, निदान त्याची तीव्रता भरपूर प्रमाणात कमी करता येऊ शकते, हे केंद्रातील मोदी सरकारने सिद्ध केले आहे. आपल्या महाराष्ट्रातही महायुती सरकारने गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील नक्षलवाद-माओवाद उखडून टाकण्यासाठी निर्धारपूर्वक पावले टाकली आहेत. खासकरून शरणागती पत्करणाऱ्या नक्षलवाद्यांसाठी विविध योजना राबवून त्यांचे सुयोग्य पुनर्वसन करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे छत्तीसगडमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मागच्या चार-सहा महिन्यांत जवळपास १४० हून अधिक नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. माओवाद-नक्षलवाद ही केवळ भौतिक पातळीवर संपविण्याची बाब नाही. केवळ शस्त्रास्त्रांनी, सशस्त्र दलाच्या पाठबळावर नक्षलवादाविरुद्धची ही लढाई लढता येणार नाही. तर ही एक वैचारिक लढाई देखील आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. नक्षल चळवळीला सक्रिय पाठिंबा देणाऱ्या तसेच वैचारिक व बौद्धिक अधिष्ठान देणाऱ्या डाव्या-अर्बन नक्षलवाद्यांचा देखील समूळ नायनाट करणे अत्यावश्यक आहे. घनदाट अरण्यात लपलेल्या व सुरक्षा दलांवर उघड हल्ले चढविणाऱ्या नक्षलवाद्यांपेक्षा भारतात सर्वत्र पसरलेले हे अर्बन नक्षलवादी सर्वाधिक धोकादायक आहेत. शिक्षणक्षेत्रात, विद्यापीठांत, साहित्यक्षेत्रात, मोठमोठ्या सामाजिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये हे अर्बन नक्षलवादी दबा धरून बसले आहेत. नक्षलवादी चळवळीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष खतपाणी घालण्याचे, नक्षलग्रस्त तसेच शहरी भागातील महाविद्यालयीन युवक-युवतींचा बुद्धिभेद करण्याचे, त्यांना डाव्या माओवादी चळवळीत ओढण्याचे प्रयत्न हे अर्बन नक्षलवादी गेल्या कित्येक वर्षांपासून करीत आहेत. या अर्बन नक्षलवाद्यांशी काँग्रेस व समाजवादी नेत्यांनी कधीच बौद्धिक, वैचारिक संघर्ष केला नाही, त्यांचा प्रतिवाद केला नाही. कारण तेवढे सामर्थ्य, तेवढी नैतिकता काँग्रेस, समाजवाद्यांमध्ये नाही. आता तर परिस्थिती अशी आहे की खुद्द काँग्रेसमध्येच वामपंथी तसेच लिबरल मंडळींनी मोठ्या प्रमाणात शिरकाव केला आहे. त्यामुळे काँग्रेस नेते नक्षलवाद-माओवादाविरुद्ध उघडपणे भूमिका घेण्यास कचरत आहेत. काही दिवसांपूर्वी झालेल्या एका कार्यक्रमात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी तेथे उपस्थितीत वरिष्ठ काँग्रेस नेत्यांना शहरी नक्षलवादाविषयी, डाव्या माओवाद्यांविषयी पक्षाचे धोरण काय, असे विचारले असता या काँग्रेसी नेत्यांनी अतिशय गोलमाल उत्तरे देऊन कशीबशी वेळ निभावून नेली. वस्तुस्थिती ही आहे की नक्षलवाद-माओवाद कठोरपणे निखंदून काढलाच पाहिजे, अशी काँग्रेसची इच्छाशक्तीच दिसत नाही. लिबरल लोकांनी पक्षात शिरकाव केल्यामुळे काँग्रेसचा कल मोठ्या प्रमाणात 'डावीकडे' झुकला आहे. त्यामुळे नक्षलवाद-माओवाद्यांचे समूळ उच्चाटन करण्याची भाषा तर सोडाच पण त्यांच्या सरकारचे नक्षलवादी-माओवाद्यांविषयी नेहमीच मवाळ, सौम्य धोरण राहिले आहे. आंध्रप्रदेश व छत्तीसगडमध्ये काँग्रेसची राजवट असताना याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. एका गोष्टीकडे लक्ष वेधले पाहिजे आणि ती गोष्ट म्हणजे २००८ मध्ये संपुआ सरकारची राजवट असताना तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दहशतवादापेक्षा नक्षलवाद हा अंतर्गत सुरक्षेला सर्वांत मोठा धोका असल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले होते. तर 'नक्षलवादी कारवायांमुळे भारताची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था धोक्यात आलेली आहे. सीमेपलीकडून सुरू असलेल्या दहशतवादापेक्षाही नक्षलवाद/माओवादाचा धोका जास्त आहे,' असे स्पष्ट विधान तत्कालीन गृहमंत्री पी. चिदम्बरम् यांनी केले होते. डॉ. सिंग आणि पी. चिदम्बरम् यांची १६ वर्षांपूर्वीची वक्तव्ये आणि आज काँग्रेस सरकारची आणि त्यांच्या नेत्यांची भाषा व धोरण सारे काही पूर्णपणे बदलून गेले आहे. विशेषतः संपुआ-२ च्या कारकीर्दीत काँग्रेसचे माओवाद्यांविषयीचे धोरण फारच मवाळ होते. छत्तीसगडमध्ये काँग्रेसच्या भूपेश बघेल यांचे सरकार असताना माओवादी चळवळीने बऱ्याच जिल्ह्यांत डोके वर काढले होते, हे विसरता येत नाही. आंध्र प्रदेशातही असेच घडले होते. तत्कालीन काँग्रेस सरकारने पीपल्स वॉर ग्रुप या नक्षलवादी संघटनेबाबत मवाळ धोरण अवलंबल्यानंतर काही दिवसांतच नक्षलवादी कारवायांनी पुन्हा डोके वर काढले होते. त्यामुळे जेव्हा जेव्हा काँग्रेसचे अथवा काँग्रेसप्रणीत आघाडीचे सरकार सत्तेत असते तेव्हा प्रत्येकवेळी माओवादी-नक्षलवादी कारवाया वाढतात, असाच अनुभव आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाची आकडेवारी पाहिली असता, वस्तुस्थिती स्पष्ट होऊन जाते. मात्र, नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सामायिक धोरण आखून ते निर्धारपूर्वक अमलात आणले पाहिजे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# आमदार निवडणार की दहशतवादी?

अखेर जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली. राज्याचे कलम ३७० हटविणे, या भागाला केंद्रशासित करणे आणि लडाखला जम्मू-काश्मीरपासून वेगळे करणे या तीन निर्णयांनंतर राज्यात होणारी विधानसभेची ही पहिली निवडणूक ठरणार आहे. दोन-अडीच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत खोऱ्यात ५१ टक्के मतदान झाले होते; जे २०१९ च्या तुलनेत ३० टक्के जादा होते. सर्वोच्च न्यायालयाने कलम ३७० बाबत निवाडा देताना, राज्यात ३० सप्टेंबरपर्यंत विधानसभा निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. त्याचे पालन करीत निवडणूक आयोगाने या राज्यातील निवडणूक तारखा घोषित केल्या.

**पूर्वी :** जम्मू-काश्मीर राज्याचे केवळ राजकीय चित्रच बदललेले नाही तर राज्य विधानसभेचे चित्रही बदलले आहे. पूर्वी राज्य विधानसभा १०० सदस्यांची होती. काश्मीर खोऱ्यात ४८ जागा तर जम्मू भागात २४ व लडाखमध्ये ४ अशा एकूण ७६ जागांची विधानसभा अस्तित्वात येत होती तर २४ जागा व्याप्त काश्मीरसाठी राखून ठेवल्या जात होत्या. हा भाग सध्या पाकिस्तानच्या ताब्यात असल्याने तेथे निवडणुका होऊन या २४ आमदारांनी राज्य विधानसभेत बसण्याचा प्रश्नच नव्हता.

**आताचे चित्र :** राज्य विधानसभेचे संख्याबळ आता ११४ करण्यात आले आहे. काश्मीर खोऱ्यात ४८ तर जम्मू भागात ४२ अशा ९० सदस्यांची नवी विधानसभा अस्तित्वात येईल तर पूर्वीप्रमाणेच २४ जागा व्याप्त काश्मीरसाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत. लडाखसाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे होत असलेली निवडणूक ९० आमदार निवडण्यासाठी होईल.

**साधे गणित :** राजकारणात दोन अधिक दोन चार कधीच होत नसतात. वेगवेगळी समीकरणे अस्तित्वात येत असतात आणि अस्तित्वात असलेली समीकरणे मोडीत निघत असतात. सध्या अस्तित्वात असलेले समीकरण म्हणजे काश्मीर खोऱ्यात नॅशनल कॉन्फरन्स, पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी, आणखी काही स्थानिक पक्ष यांचा जोर राहण्याची शक्यता आहे तर जम्मू भागात भाजपा व काँग्रेस यांना जागा मिळण्याची शक्यता आहे. बहुमतासाठी ४६ जागांची आवश्यकता राहणार आहे. म्हणजे नॅशनल कॉन्फरन्स वा पीडीपीने खोऱ्यातील ४८ पैकी ४६ जागा जिंकल्या तर त्यांचे राज्यात सरकार येऊ शकेल. याउलट भाजपा वा काँग्रेस यांनी जम्मू भागातील सर्व ४२ जागा जिंकल्या तरी त्यांना सरकार बनविण्यासाठी खोऱ्यातील पक्षांवर अवलंबून राहावे लागेल. त्याचप्रमाणे नॅशनल कॉन्फरन्स वा पीडीपीला स्वबळावर खोऱ्यातील ४६ जागा जिंकता आल्या नाही तर त्यांना सरकार बनविण्यासाठी जम्मू भागातील पक्षांवर म्हणजे भाजपा वा काँग्रेसवर अवलंबून राहावे लागेल. याचाच विचार करून काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स यांनी विधानसभा निवडणुकीसाठी युती करण्याचा निर्णय घेतला आहे. अशी युती झाल्यास या युतीला राज्यात बहुमत मिळू शकते.

**दहशतवादी उमेदवार :** राज्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनता मोठ्या प्रमाणार सहभागी होईल, यात शंका नाही. मात्र, शंका उपस्थित करणारी बाब म्हणजे काश्मीर खोऱ्यातील जनता आमदार निवडते की दहशतवादी, हे या निवडणुकीत दिसणार आहे. लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजयी होणारे राशिद इंजिनीअर सध्या तिहारमध्ये आहेत. दहशतवादाच्या आरोपाखाली त्यांच्यावर खटला सुरू आहे. त्यांनी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार उमर अब्दुल्ला यांचा दोन लाखांवर मतांनी पराभव केला होता. विधानसभा निवडणुकीत कोणते चित्र असेल हे मतदानात दिसणार आहे. काश्मीर खोऱ्यातील पक्ष कोणाला उमेदवारी देणार, यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे. नॅशनल कॉन्फरन्स व पीडीपी यांनी आतापासूनच कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रस्ताव नव्या विधानसभेत आणण्याची घोषणा केली आहे. दोन्ही पक्षांच्या प्रचाराचा हा मुख्य मुद्दा राहण्याची चिन्हे आहेत. तसे झाल्यास आणि या पक्षांना खोऱ्यात यश मिळाल्यास त्याला कलम ३७० च्या विरोधातील जनादेश मानला जाईल काय हा प्रश्न निवडणुकीनंतर विचारला जाईल. घड्याळाचे काटे उलटे फिरविता येत नाहीत, हे या पक्षांनाही माहीत आहे, पण जनभावना भडकविण्यासाठी पुन्हा एकदा कलम ३७० चा वापर केला जाऊ शकतो. तसा प्रचारही केला जाऊ शकतो. या निवडणुकीकडे केवळ देशाचेच नाही तर जगाचे लक्ष राहणार आहे. त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या निकालांना एक वेगळा संदर्भ राहणार आहे.

**जम्मू विरुद्ध काश्मीर :** पाकिस्तान सीमेला लागून असलेल्या या राज्याचे नाव जम्मू आणि काश्मीर असले, तरी प्रत्यक्षात येथील राजकारण जम्मू विरुद्ध काश्मीर असे राहात आले आहे. राज्य विधानसभेत काश्मीर खोऱ्यातील जागांची संख्या जम्मू भागापेक्षा दुप्पट असल्याने राज्याच्या राजकारणावर आजवर काश्मीर खोऱ्याचेच राजकीय वर्चस्व राहात आले होते. आता ही स्थिती बदलणार आहे. जम्मू आणि काश्मीर दोन्ही भाग बरोबरीत आले आहेत. त्यामुळे विधानसभा निकालांचा या दोन्ही भागांवर कोणता परिणाम होतो हे निवडणुकीनंतरच्या काळात दिसणार आहे. दोन्ही भागात समतोल साधणारे सरकार स्थापन होणे देशहिताचे ठरणार आहे. अर्थात हे सारे निवडणूक निकालांवर अवलंबून राहणार आहे.

विधानसभेचे संख्याबळ वाढविण्यात आल्यानंतर होत असलेली ही पहिली निवडणूक असल्याने हे सारे प्रश्न निश्चितच महत्त्वाचे ठरणार आहेत.

**हल्ले सुरूच :** जम्मू भागात पाकिस्तानी दहशतवाद्यांचे हल्ले थांबलेले नाहीत. मागील आठवड्यात झालेल्या दोन हल्ल्यांमध्ये लष्कराचा एक कॅप्टन तर केंद्रीय राखीव पोलिस दलाचा एक इन्स्पेक्टर असे दोन अधिकारी हुतात्मा झाले. भारत सरकारने हे हल्ले रोखण्यासाठी काही उपाययोजना केली असली, तरी त्याचा अद्याप फायदा झालेला नाही. पाकिस्तान इतक्या सहजासहजी दहशतवादी हल्ले बंद करील, अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. भारताने या राज्याला विशेष दर्जा देणारे कलम ३७० हटविल्यानंतर चीन-पाकिस्तान दोन्ही देशांनी विरोध नोंदविला होता. आता राज्यात निवडणुका होणार असल्याने दोन्ही देश पुन्हा एकदा राज्यात हिंसाचार घडवून आणण्याची शक्यता आहे.

**चीनची पकड :** पाकिस्तानवर जोपर्यंत अमेरिकेची पकड होती, भारत अमेरिकेच्या माध्यमातून पाकिस्तानवर दबाव आणू शकत होता. आता हे चित्र बदलले आहे. पाकिस्तानवर चीनची पकड दिवसेंदिवस बळकट होत आहे. तो पाकिस्तानवर दबाव आणणे तर सोडा; उलट त्याला अधिक हल्ले करण्यासाठी चिथावणी देत आहे. चीनने स्वतः लडाखची आघाडी तापत ठेवली आहे. उपग्रहांमार्फत प्रसिद्ध होत असलेली छायाचित्रे तेथील परिस्थिती सांगत आहेत. भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी भारत-चीन नियंत्रण रेषेचे पावित्र्य बहाल करण्यात यावे, असे प्रतिपादन केले आहे. मुत्सद्देगिरीची हीच भाषा असते. मात्र यात दडलेला अर्थ म्हणजे चीन अद्याप नियंत्रणरेषेचे पावित्र्य बहाल करण्याच्या मन:स्थितीत नाही. अशा स्थितीत पाकिस्तान जम्मूलगतच्या भागात वारंवार हल्ले करीत भारतीय सुरक्षा दलांना अडकवून ठेवणार असेल तर चीनला तेच हवे आहे. म्हणजे येणाऱ्या काळातही जम्मू भागातील हा हिंसाचार चालू राहणार आहे. तो कमीत कमी कसा राहील एवढाच प्रयत्न करणे भारताला शक्य होणार आहे.

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# एकच उपाय राष्ट्रपती राजवट

कोलकाता येथील निर्भया-२ प्रकरणाने संपूर्ण देश हादरला. याची धग काही दिवसांनंतर शांत होईलही. समाजमन सर्वकाही विसरून आपल्या कामात दंग होईल. तरीही काही प्रश्नांची उत्तरे अनुत्तरित राहतील. ज्यांचे या घटनेने हृदय हेलावले असेल त्यांच्या मनामध्ये एक कायमची सल बोचत राहते. समाजामध्ये असे नराधम जन्माला येतातच कसे, असा त्यांचा प्रश्न असतो. ज्या देशामध्ये मातृशक्तीची आदीशक्ती म्हणून पूजा केली जाते, त्या देशामध्ये असे जघन्य अपराध जर घडत असतील तर देशातील सुसंस्कृत समूहाने याबाबीची दखल घेत अशा प्रवृत्तींना आधीच ठेचण्यासाठी सज्ज असायला हवे. समाज संस्कृतीपासून दूर गेला अन् संस्कृतीची फारकत झाली की, समाजाचे आरोग्य बिघडते. आम्ही आमच्या परंपरा आणि चालीरीती सध्या खुंटीला टांगून ठेवल्याने समाजामध्ये नको त्या गोष्टींनी शिरकाव केला आहे. त्यामुळे अशा निरपराधांना त्याची नाहक सजा भोगावी लागते. पीडितेचे संपूर्ण कुटुंब उघड्यावर येते. हृदयात झालेल्या जखमांना कुरवाळीत अख्ख आयुष्य आई-वडिलांना जगाव लागतं. आमच्या संस्कृतीला हीन समजत आम्ही पाश्चिमात्य संस्कृतीच्या मागे फरफटत गेलो. त्याची फळे आज आम्ही भोगत आहोत. या अधोगतीच्या चक्राने संपूर्ण समाज पोखरत चालला आहे. तरीही आमची कुंभकर्णी झोप अजूनही उघडत नाही. खरं तर अशा सुसंस्कृत देशामध्ये कोठेच अश्लिलतेला स्थान असायला नको. ऋषी, मुनी व गुरू परंपरेने नटलेल्या या देशामध्ये सभोवताली घडणाऱ्या घटना बघितल्या की मन विषन्न होते.




आधुनिकता ही जरी आज काळाची गरज असली तरी, ती कितपत आत्मसात करावी याचे भान असायला हवे. निव्वळ आधुनिकतेच्या मागे लागून अधोगतीशी आम्ही जुळणार असू तर ही आधुनिकता समाजाला रसातळाला नेणारी ठरू शकते. ही सजगता जोवर समाजमन ठेवणार नाही, तोवर आमच्या मनामधील प्रश्नाचे उत्तरही आम्हाला मिळणार नाही. महिला डॉक्टरच्या हत्येनंतर पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकारही वादाच्या भोवऱ्यामध्ये सापडले आहे. संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या गुंडांचे एकछत्री राज्य आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी कितीही लोकशाहीच्या गप्पा मारीत असल्या तरी त्यांच्या गुंडांनी माजवलेली अराजकता तेथील सामान्य जनतेसाठी अभिशाप ठरली आहे. महिला डॉक्टरचे हे प्रकरण ज्याप्रकारे हुकुमशाही पद्धतीने दडपण्याचा आटोकाट प्रयत्न तेथील अधिकाऱ्यांनी केला त्यावरून हेच सिद्ध होते. ममता बॅनर्जी स्वतः मुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे गृह विभाग असून आरोग्य विभागही त्या स्वतः सांभाळतात. तरीही कोलकातामध्ये ममता बॅनर्जी पदयात्रा काढून त्या महिला डॉक्टरबाबत न्यायाची मागणी करतात. केवढे हे त्या पीडिताचे, तिच्या कुटुंबाचे आणि समाजाचे दुर्दैव. जनतेला न्याय देणाऱ्या खुर्चीवर विराजमान असतानाही एक मुख्यमंत्री न्यायासाठी रस्त्यावर उतरतात, यास काय म्हणावे? हे एक निव्वळ ढोंग असून, सामान्य जनतेच्या डोळ्यांमध्ये धूळ फेकण्याचा प्रकार आहे. झालेल्या प्रकरणाबद्दल जनतेमध्ये भ्रमाचे वातावरण निर्माण करून उपरोक्त प्रकरण दडपण्याचा हेतू जनतेच्या लक्षात आला आहे. अशा गंभीर प्रकरणातही एका मुख्यमंत्र्याच्या या भूमिकेने राजकीय क्षेत्रामध्ये अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. एवढे गंभीर प्रकरण घडूनही ममता बॅनर्जी राजकारण करू पाहत आहे. सदर प्रकरणामध्ये भाजपाचा हात असल्याचा जावई शोध लावून त्यांनी यामधून हात झटकण्याचा प्रयत्न केला. अशा विभत्स आणि राक्षसी कृत्यावर जर एक मुख्यमंत्री पांघरून घालून आपल्या चेल्याचपाट्यांची पाठराखण करीत असेल तर राजकीय क्षेत्र किती बरबटलेले आहे, याचा सामान्य नागरिक कधी विचार करतील? कायदे पायदळी तुडवून आपल्या राजकीय स्वार्थासाठी सामान्य नागरिकांच्या जीवाचीही पर्वा न करणारे राजकारणी लोकशाहीचीही खुलेआम हत्या करीत असतात. हुकूमशाहीकडे वळणारे हे पश्चिम बंगालचे राजकारण भविष्यामध्ये देशासाठीही घातक ठरू शकते. याची जेव्हा जाणीव होईल, त्यावेळी कदाचित बराच वेळ झालेला असेल. त्यामुळे केंद्र सरकारने पश्चिम बंगालचे ममता बॅनर्जी यांचे सरकार तातडीने बरखास्त करून तेथे राष्ट्रपती राजवट लावणे, हाच त्यावरील एक रामबाण उपाय आहे. सामान्य जनतेच्या मनातही तेच आहे.

९८८१७१७८५६

## कानोसा

अमोल पुसदकर

# हिंदुत्व जागरणातील मैलाचा दगड

विश्व हिंदू परिषद म्हटलं की, आपल्याला राम जन्मभूमी आंदोलन आठवतं. एखादे आंदोलन एखाद्या संघटनेची ओळख व्हावी इतकं मोठं आणि यशस्वी आंदोलन विश्व हिंदू परिषदेने उभे केलेले होते. देशामध्ये अनेक आंदोलने होत असतात. परंतु काही आंदोलने तात्कालिक असतात तर काही दीर्घजीवी असतात. परंतु फार थोड्या आंदोलनांना यशस्वी होण्याचे भाग्य लाभतं. दीर्घजीवी आंदोलनांच्या नशिबी तर बरेच वेळा असे भाग्य येत नाही. परंतु राम जन्मभूमीचे आंदोलन हे मात्र याला अपवाद आहे.

१९२५ साली ज्यावेळेस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली, त्यावेळेस लोक असं म्हणायचे की, चार हिंदू एकाच दिशेने त्याच वेळेला जातील जेव्हा पाचवा त्यांच्या खांद्यावर आडवा असेल. परंतु हे चित्र ६ डिसेंबर १९९२ ला ज्यावेळेला वादग्रस्त ढाचा तुटला त्यावेळेला पूर्णतः पालटलेलं होतं. १० लाख लोकांपेक्षा अधिक संपूर्ण भारतातील लोक, ज्यांच्या भाषा वेगळ्या आहेत, ज्यांची भूषा वेगळी आहे, ज्यांची भोजन पद्धती वेगळी आहे असे सर्व लोक आपल्या जाती-पंथ, उपासना पद्धती या सर्वांना बाजूला सारून केवळ हिंदुत्वाच्या नावावर रामललासाठी एकत्र आले होते. हिंदुत्वाच्या इतिहासातील ही फार मोठी घटना आहे. एवढे मोठे आंदोलन उभे करून त्याला यशस्वी करण्याचे श्रेय निर्विवादपणे विश्व हिंदू परिषदेला द्यावे लागते.

२९ ऑगस्ट १९६४ कृष्ण जन्माष्टमी या दिवशी विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूजनीय श्री गुरुजी गोळवलकर यांच्या संकल्पनेतून, मार्गदर्शनातून विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. भारतामध्ये लाखो साधुसंत, हजारो मठ व संप्रदाय आहेत. ही खूप मोठी शक्ती भारतामध्ये आहे. या सर्व शक्तीला एकत्र करणे गरजेचे होते. अस्पृश्यता ही गोष्ट हिंदू धर्मातील कुठल्याही ग्रंथांमध्ये सांगितलेली नसून ती लोकांच्या आचरणात होती. त्यामुळे हिंदू समाजाचे विघटन वर्षांनुवर्षांपासून सुरू होते. १९६९ साली उडुपी येथे हिंदू धर्म संमेलन झाले. यामध्ये चारही पिठांचे शंकराचार्य एकत्र आले व त्यांनी सर्व हिंदू एकमेकांचे भाऊ आहेत, कोणीही अस्पृश्य नाही, अशा पद्धतीची घोषणा केली; ज्यामुळे देशामध्ये एक मोठा संदेश गेला.



कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य पूजनीय जयेंद्र सरस्वती यांनी तर तामिळनाडूतील अनुसूचित जाती-जमातीच्या वस्त्यांमध्ये जाऊन हा समानतेचा संदेश दिला. काशीमध्ये गंगेच्या घाटावर प्रेत जाळणाऱ्या चांडाळ लोकांची संख्या मोठी आहे. त्या चांडाळांचा जो राजा आहे त्याचे नाव डोमराजा. १९९४ मध्ये विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष अशोकजी सिंहल, महंत अवैद्यनाथ, पूजनीय रामचंद्र दास महाराज हे त्या डोमराजाच्या घरी गेले व त्यांनी त्याच्या घरी भोजन केले. यातून कुठलाही हिंदू अस्पृश्य नाही, अशा पद्धतीचा संदेश दिला गेला. सामाजिक समरसेच्या दृष्टिकोनातून विश्व हिंदू परिषदेने उचललेले हे एक फार मोठे पाऊल होते.

१९८१ मध्ये तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे अनुसूचित जातीच्या लोकांनी सामूहिक धर्मांतरण करून इस्लामचा स्वीकार केला. त्यामागे इतर समाजाकडून त्यांना मिळणारी अस्पृश्यतेची वागणूक हे कारण होते. त्याच तामिळनाडूमध्ये विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून सामाजिक समरसतेसाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले. ज्या समाजाला मंदिरामध्ये प्रवेश नव्हता त्या समाजातील २० हजारांपेक्षा अधिक पुजाऱ्यांना प्रशिक्षित करून विविध मंदिरांमध्ये पुजारी बनण्यासाठी पात्र करण्यात आले. सामाजिक समरसतेच्या क्षेत्रामध्ये विश्व हिंदू परिषदेने करून दाखविलेले हे एक मोठे परिवर्तन होते. कोणीही हिंदू धर्म परिवर्तन करून इतर धर्मात जाऊ नये यासाठी व ज्यांनी धर्म परिवर्तन केलेले आहे त्यांनी पुन्हा स्वधर्मात परत यावे यासाठी विश्व हिंदू परिषदेने घरवापसीचे कार्यक्रम देशभर घेतले. परधर्मात गेलेल्या लोकांना सन्मानाने स्वधर्मात आणले गेले. ज्या ज्या ठिकाणी हिंदूंवर धार्मिक अत्याचार करण्यात येत होते त्या त्या ठिकाणी विश्व हिंदू परिषदेने जशास तसे उत्तर देऊन धार्मिक कट्टरवादाचा सामना केलेला आहे. ज्या हिंदू मुलींना फूस लावून लव्ह जिहादच्या नावाखाली पळून नेले जाते अशा अनेक प्रकरणांमध्ये मुलीच्या आई-वडिलांच्या बाजूने व मुलीच्या बाजूनेसुद्धा विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी नेहमीच उभी राहते. देशभरामध्ये आजपर्यंत अशा हजारो मुलींना पुन्हा एकदा परत आणण्याचे कार्य विश्व हिंदू परिषदेने केलेले आहे.

वनवासी गिरीवासी जनतेकरिता एकल विद्यालय, शिक्षा प्रकल्प, स्वास्थ्य प्रकल्प, पीडित लोकांना आश्रय, गोरक्षण अशा पद्धतीचे कार्य संपूर्ण देशभर सुरू आहे. विश्व हिंदू परिषद असे एकमेव संघटन आहे की ज्याचे कार्यकर्ते कत्तलखान्यात जाणाऱ्या गाईंना अडवतात व त्यांची रवानगी गोरक्षणात करतात. ठिकठिकाणी चालणाऱ्या गोरक्षण कार्यासोबतच गोविज्ञान अनुसंधान हे कार्य विश्व हिंदू परिषदेतर्फे चालविले जाते. गावागावांमध्ये जी खूप मोठी युवाशक्ती आहे त्या युवाशक्तीला बजरंग दलाच्या नावाने एकत्र करून त्यांना हिंदुत्वाचे संस्कार देण्याचे कार्य बजरंग दलाने केलेले आहे. याचाच परिणाम म्हणून गोहत्या, कट्टरवाद, लव्ह जिहाद, धर्मांतरण इत्यादी सर्व स्थानिक समस्यांसाठी बजरंग दलाचे तरुण हे नेहमीच अग्रेसर होऊन समाजाची सेवा व रक्षण करण्याचे कार्य करीत असतात.

पाश्चिमात्य संकल्पना ही स्त्री मुक्तीची आहे. परंतु दुर्गा वाहिनीद्वारे स्त्री शक्तीचा प्रत्यय समाजाला येतो आहे. शौर्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुण-तरुणींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य बजरंग दल व दुर्गा वाहिनी करीत आहेत. सेक्युलॅरिझमच्या दुष्प्रचारामध्ये या देशातल्या तरुण-तरुणी केवळ भौतिकवादाचे, उपभोक्तावादाचे बळी ठरू नये, त्यांना हिंदुत्वाचे संस्कार मिळावे व हिंदू आता मार खाणार नाही, हा संदेश सर्व अहिंदू लोकांपर्यंत जावा या उद्देशाने हे कार्य सुरू आहे. हिंदू समाजाच्या बलसंपन्नतेसाठी चालणारे हे कार्य आहे. हिंदू समाज एकजूट व्हावा, संस्कारित व्हावा, सामर्थ्यसंपन्न व्हावा यासाठी चालणाऱ्या विश्व हिंदू परिषदेच्या या कार्यामध्ये आपणही सहभागी झाले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### कंत्राटी भरतीतील प्रशासकीय उदासीनता

मागील १०-१५ वर्षांपासून शासकीय योजना कंत्राटी पद्धतीने राबविण्यात येत आहेत. प्रामुख्याने आरोग्य विभागात या कंत्राटी उमेदवारांना पुनर्नियुक्ती देताना त्यांचे वार्षिक मूल्यमापन समाधानकारक असूनही नियमित आदेश न होणे किंवा ज्या इतर कर्मचाऱ्यांचा परीविक्षा कालावधी (कंत्राट) दोन किंवा तीन वर्षांचा आहे, त्यांना त्यांच्या प्रत्येक वर्षाच्या पुनर्नियुक्तीचा आदेश न मिळाल्याने त्यांच्या कायम नियुक्तीचा आदेश प्रलंबित राहतो. परिणामी कनिष्ठ कार्यालयातील अधिकारी याला जबाबदार असूनही वरिष्ठ कार्यालय याबाबत कानाडोळा केल्याने अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेठबिगारीप्रमाणे कमी मानधनावर राबविण्यात येणे याला प्रशासनिक उदासीनता कारणीभूत आहे; जे मानवाधिकाराचे हनन ठरते.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### तू रणरागिणी हो...!

सध्या आपण बघतो आहोत की, सगळीकडेच नराधमांचा अक्षरशः धुमाकूळ चालू आहे. एका घटनेची शाई वाळत नाही तोच लगेच दुसरी घटना तयार. कलियुग म्हणतात तेच खरे. नराधमांना राक्षस ही उपमादेखील कमी पडेल इतके यांचे कृत्य नीच आहे. कोलकाता आणि बदलापूर हे याचे ताजे उदाहरण आहे, पण अशा कित्येक घटना रोजच घडत असतात. यातील काहीच घटना उजेडात येतात तर कित्येक घटना भीतीपोटी किंवा दबावापोटी उजेडातच येत नाहीत आणि ज्या येतात त्यातील पीडितांना आणि त्यांच्या नातेवाईकांना वर्षानुवर्ष न्यायालयाच्या किंवा पोलिस ठाण्याच्या खस्ता खाव्या लागतात. या सगळ्यात त्यांची प्रचंड शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शक्ती खर्च होत असते. म्हणूनच सामान्य माणूस या भानगडीत न पडता निमूटपणे होणारा अन्याय सहन करतो. पण मग महिलांवर काय असेच अत्याचार होत राहणार? आणि या नराधमांचे असेच फावणार? खरं तर ही वेळच कुणा स्त्रीवर येऊ नये. इतर कुणाच्या मदतीची अपेक्षा स्त्रीने न ठेवता स्वतःच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तिने स्वतःला सक्षम करावयास हवे. राणी लक्ष्मीबाई, जिजाऊ, राणी चेन्नमा यांचा इतिहास आठवून त्यांच्यासारखे शौर्य अंगी बाळगायला हवे. नुसती शोभेची बाहुली न बनता मर्दानी बनावयास हवे, त्यासाठी तिने स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. कारण कुठलीही घटना जेव्हा घडते त्यावेळी कुणीही तिच्या मदतीला नसतो. त्यावेळी तिची लढाई तिलाच लढायची असते. म्हणूनच हे प्रशिक्षण घेऊन तिने कणखर व्हायला हवे. एकदा का ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत झाली की तिला हात लावायची कुणाची हिंमत होणार नाही. हिंदू जनजागृती समिती, दुर्गा वाहिनी अशा अनेक संस्था असे स्वसंरक्षण प्रशिक्षण देत असतात. त्यामुळे ते घेऊन असहाय्य न बनता रणरागिणी बना!



**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### ...तरच जरब बसेल!

'अन्यायाविरोधात दाद मागताना दुजाभाव' हा अग्रलेख वाचला. बदलापूरच्या अत्याचाराच्या घटनेत पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, राजकीय दबाव आल्याने ते कारवाई जलद करीत नाहीत, हे दिसून आले. एका मोठ्या पक्षाशी संबंधित असल्यामुळे उशीर करण्यात आला. हे बदलले पाहिजे. १०२३ इतकी जलदगती न्यायालये निर्माण करण्यात आली असली, तरी त्याचा परिणाम काहीच दिसून येत नाही, हे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. बलात्कारासंबंधी फाशीची शिक्षा जरी असली, तरी आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण कमीच आहे. निकालही जलतगतीने लागत नाहीत. आरोपी मोकाट सुटतात. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजेत. महिला केवळ उपभोग्य वस्तू आहे, या मानसिकतेतून बाहेर पडले पाहिजेत. ही कुणाची मुलगी, कुणाची बहीण आहे, हा विचार कधी येणार? उलट महिलांची सुरक्षितता आपण पुरवली पाहिजे. त्यासाठीच उत्तम संस्कार मुलांवर व्हायला हवेत. शाळा-महाविद्यालयांमध्ये याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजेत. ज्याप्रमाणे एखाद्या राजकीय निवाड्यासाठी न्यायालयात रात्रीची सुनावणी करून दिवस केला जातो तसाच बलात्काराबाबत निर्णय दिला तर अनेक प्रलंबित खटले पूर्ण होतील. बलात्काराच्या शिक्षेत बदल करण्यात यावा. त्याला फाशी तर द्यायचीच, पण त्याआधी त्याला समाजापुढे आणून विविध प्रकारे यातना, छळ करायचा; जेणेकरून हा छळ पाहून असा घृणास्पद प्रकार करणाऱ्याला जरब बसेल. अशा कृत्याबाबत भीती निर्माण झाली तरच असले प्रकार कोणीही करणार नाही. शिक्षा ही ताबडतोब व्हायला हवी तरच महिला, बालक सुरक्षित राहतील. न्याय मिळेल मात्र तो मिळविण्यासाठी कोणत्याही आमिषाला बळी पडता कामा नये त्यासाठी हक्काने लढलेच पाहिजेत.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

# मूल्याधिष्ठित शिक्षण महत्त्वाचे : प्रा. राजीव कुमार

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचा प्रथम वर्धापन दिन साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात आपल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण प्रदान करण्यासोबतच समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आदर्श जीवन मूल्याची रुजवात करत आहे. विद्यापीठाचे ध्येय आणि प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यात विद्यापीठ अधिक उंची गाठेल आणि समाजाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान देईल. मूल्याधिष्ठित शिक्षण महत्त्वाचे आहे असे गौरवोद्गार ऑल इंडिया काउन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन मेंबर सेक्रेटरी प्रा. राजीव कुमार यांनी काढले.

केगाव येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचा प्रथम वर्धापन दिन सोहळा रविवारी पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड - नागरे या होत्या. यावेळी व्यासपीठावर माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे बोर्ड ट्रस्टी डॉ. विनायक घैसास, आयआयएम नागपूरचे संचालक प्रा. भीमराया मेत्री, प्रिसिजन कॅमशाफ्ट्सचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, संकल्प सेमीकंडक्टर संस्थापक विवेक पवार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड-नागरे यांनी मनोगत व्यक्त केले. या विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. गोपालकृष्ण जोशी यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या उद्दिष्टे आणि प्रगतीचा आढावा घेतला. विद्यापीठ उद्दिष्ट केंद्रीत शिक्षण, उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार तयार केलेले अभ्यासक्रम आणि राष्ट्रीय शिक्षा धोरण यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमआईटी विश्वप्रयाग विद्यापीठ ,मिलर्सविले विद्यापीठ, इंडियाना युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिलविया या विदेशी विद्यापीठांशी संलग्नपणे व तसेच कोर्सेरा, इन्फोसिस, स्प्रिंगबोर्ड, सिस्को या ऑनलाईन कोर्सेस प्लॅटफॉर्मशी सहकार्य करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. विद्यापीठातील पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना अर्थ सोल्युशन, इव्या सोलेशन आणि प्पटेले (pptelay) या कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यापीठाने २.५ हेक्टर क्षेत्रफळावर मियावाकी वन तयार केले असून पुढील तीन वर्षांमध्ये ५० हजार वृक्षरोपण करण्याचा निश्चय केला आहे. विद्यापीठात डिझाईन थिंकिंग फॉर सस्टेनेबिलीटी आणि कैवल्य धाम या संस्थेच्या सहकार्याने वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत, असे सांगितले. स्वागतपर भाषणात प्रकल्प संचालिका प्रा. प्रभा कासलीवाल म्हणाल्या, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी सोलापूर येथे विद्यापीठ स्थापनेत प्रमुख भूमिका बजावली आहे. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ आता सोलापूर शहरातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिक्षण प्रदान करण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. विश्वशांती प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रा. ट्विंकल शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी आभार मानले.

### ऑपरेशन वसंता, चारचाकी फिरत्या इनोवेशन लॅबचे उद्घाटन

यावेळी अगस्त्य फाउंडेशन आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या सहकार्याने इनोवेशन लॅब, दुचाकी प्रयोगशाळा, ऑपरेशन वसंता आणि चारचाकी फिरते इनोवेशन लॅब या उपक्रमाचे ध्वज फडकावून उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, अगस्त्य फाउंडेशनचे नितीन देसाई यांनी यासंदर्भात माहिती दिली.

### देश प्रगत, विश्वगुरू होण्यासाठी कष्ट महत्वाचे : डॉ. कराड-नागरे

देशाच्या जडणघडणीमध्ये विद्यार्थी हे महत्त्वाचे आहे. महात्मा बसवेश्वर यांच्यासह महापुरुषांच्या आदर्श विचारांची कास धरून विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी. केवळ प्रगत आणि विश्वगुरू म्हणून चालणार नाही. त्यासाठी कष्ट करण्याची गरज आहे. विद्यार्थी व पालकांनी हे लक्षात घेतले पाहिजे. पालकांनी विद्यार्थ्यांचे कला व छंद जाणून घेऊन त्यांचे करिअर घडविले पाहिजे. शिक्षणाबरोबर छंदही महत्वाचे आहेत, असे आवाहन जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड-नागरे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### मंगल विहार अपार्टमेंटमध्ये वृक्षारोपण

**सोलापूर, दि.२५ ऑगस्ट-**

जुळे सोलापूर मधील मंगल विहार अपार्टमेंटच्या परिसरात मंगल विहार मधील जेष्ठ नागरिकांच्या हस्ते रविवारी सकाळी वृक्षारोपण करण्यात आले. मंगल विहारमधील सर्व जेष्ठ माता आणि वडिलधारी मंडळींच्या हस्ते हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये अशोकाची झाडे, औषधी वनस्पती, फुलझाडे शो अशी ३५ झाडे लावण्यात आली. यामध्ये राजीव घाटे, मीरा घाटे, ज्ञानेश्वर कुलकर्णी, अंजली कुलकर्णी, विशाल पाटील, मनीषा पाटील, अशोक पाटील, ध्रुवराज मणूर, शुभांगी मणूर, शारदा कुलकर्णी, डॉ. प्रिया उटगे, संतोष सावळे, विजय गोरे, अप्पाराव पांढरे, रामदास काटकर, सूर्यकांत देशपांडे, प्रकाश बऱ्हाणपुरे, अनिता बऱ्हाणपूरे, पांडुरंग गोखले, मल्लिनाथ उटगे, विजयश्री उटगे, जयवंत कुलकर्णी, महादेव भिस्ते, माधवी भिस्ते, श्रीपाद ताटे, शोभा कोळी, सुशील मोहोळकर, नीलाक्षी कुलकर्णी, पूजा संधिकर, वनिता बोन्द्रे, अनघा कुलकर्णी,दीपाली श्रीगोंदेकर, प्रिया उटगे, तसेंच झाडांची बिशी हा उपक्रम राबवणारे परशुराम लांबतुरे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीशैल कोळी, सतिश बोन्द्रे,कपिल पाटील, अनिल सूर्यवाड, बळवंत पांढरे, विक्रांत श्रीगोंदेकर यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक ॲड. आनंद कुलकर्णी यांनी केले. सिद्धेश उटगे यांनी आभार मानले.



### राजराजेश्वरी संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

राजराजेश्वरी संगीत विद्यालयाचा सहावा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, संगीत विद्यालयाचे प्रमुख संचालक प्रवीण कुंभार, तबला शिक्षक ऋतुराज सोनवणे, लिंबाजी सुतार,विश्वाराध्य मठपती आदी उपस्थित होते. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे करण्यात आले तदनंतर अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल मुंबई यांच्यावतीने घेण्यात गायन, हार्मोनियम, तबला वादन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ३० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




### पारधी आश्रमात पर्यावरणपूरक रक्षाबंधन

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य महाएनजीओ फेडरेशन व श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने पारधी आश्रमात पर्यावरणपूरक रक्षाबंधन सण तुळजापूर रोड येथील संस्कार संजीवनी फाउंडेशन हगलूर येथे साजरा करण्यात आला. यावेळी मंचावर महाएनजीओ फेडरेशन संस्थापक व महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, संचालक मुकुंद शिंदे, अमोल उंबरजे, आश्रमाच्या संचालिका अरुणा काळे, महाएनजीओ फेडरेशन सोलापूर समन्वयक महेश कासट, मनोज देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्योती कासट, विशाल काळे, रूपाली काळे, दिपक बुलबुले, संतोष अलकुंटे उपस्थित होते.

### मुख्यमंत्री वयोश्री, तीर्थदर्शन योजनेसाठी अर्ज करावेत :जिल्हाधिकारी

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

ज्या नागरिकांचे वय ६५ वर्ष व त्यावरील आहे व ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना आणि ज्यांचे वय ६० वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिक आहे व ज्यांचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजार रुपये आहे अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना राज्य सरकारकडून राबविण्यात येत आहे. मन:शांतीसह आध्यात्मिक पातळी गाठण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची जिल्हयात अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहात अर्ज करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या दोन्ही योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.ज्या ज्येष्ठ नागरिकांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साधने/उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच मनस्वास्थ केंद्र,योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे.

### रोहित म्हेत्रे यांचे निधन



**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

लष्कर विभागातील बापुजी नगर येथील रहिवासी रोहित श्रीनिवास म्हेत्रे (वय ३०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून मोदी स्मशानभूमीकडे निघणार आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. मोची समाजाचे माजी उपाध्यक्ष सिद्राम म्हेत्रे यांचे ते पुतणे होत.



## ग्रोव्हिजन शेतकरी प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे तसेच योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रेरणेतून नागपूरमध्ये दरवर्षी ग्रोव्हिजनच्या माध्यमातून कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते.

यालाच जोड म्हणून कायमस्वरूपी 'ग्रोव्हिजन शेतकरी प्रशिक्षण केंद्र' नागपूरमधील वर्धा रोडवर तयार होत आहे. याचे भूमिपूजन गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत जी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण सभागृह, कॉटन टेस्टिंग लॅब, भाजीपाला विक्रीसाठी आठवडा बाजार असणार आहे. याशिवाय येथे वर्षभर शेतीविषयक प्रशिक्षण आणि प्रकल्प राबवले जातील.

## जिल्ह्यातील लाडक्या बहिणींचे ६ लाख अर्ज निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा दि. १ किंवा २ सप्टेंबर रोजी सोलापूर शहरातील होम मैदान येथे नियोजित आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून तीस हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन करण्यात येत असून, जिल्हा प्रशासन या कार्यक्रमाच्या तयारीलाही लागले आहे. दरम्यान, आजतागायत या योजनेतून पैसे मिळण्यासाठी जिल्हाभरातील ८ लाख ९१ हजार ३१५ लाडक्या बहिणींनी अर्ज केले असून, त्यापैकी ६ लाख ३६ हजार ६९६ बहिणींना ३ हजार रूपयांचा लाभ झाला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. दरम्यान, उर्वरित महिलांनाही लवकरच पैसे मिळणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या योजनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी नुकतीच घेतली. या महिलांसाठी आयोजित केलेल्या मेळाव्यासाठी किमान २५ ते ३० हजार महिला लाभार्थी संपूर्ण जिल्हाभरातून तालुका निहाय आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या ४०० बसेसची व्यवस्था राज्य परिवहन महामंडळाने करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या मेळाव्यासाठी येणाऱ्या महिलांसाठी जेवण, पाणी व अनुषंगिक व्यवस्था जिल्हा पुरवठा अधिकारी करणार आहेत. तर सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळी परिस्थिती पाहता योग्य मंडप व अनुषंगिक व्यवस्था योग्य पद्धतीने करावी असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.



अनेक महिलांच्या खात्याला ई-केवायसी, आधार लिंक नसल्याने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे ३ हजार रूपये अजूनही अनेकांच्या नावावर बँकांत जमा झाले नाहीत. यासाठी महिलावर्ग विविध बँका, पोस्ट कार्यालयात धाव घेताना आणि गर्दी करताना दिसून येत आहेत. ग्रामीण भागातील महिलाही अंगणवाडी ताईंच्या माध्यमातून आपल्या बँक खात्यात लवकर पैसे कसे येतील, यासाठी खटाटोप करीत असल्याचे दिसून येत आहे. लाडक्या बहीण योजनेचे पैसे लवकर मिळण्यासाठी महिलावर्ग घराबाहेर पडताना दिसून येत असून, विविध बँका, महाईसेवा केंद्रांवर या महिलांची मोठी गर्दी दिसत आहे.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळेत वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

येथील नेहरू नगर मधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक आश्रम प्रशालेत १९९३ बॅचमधील माजी विद्यार्थ्यांकडून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड, पर्यवेक्षक उमेश येळसंगी यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आले.

प्रारंभी महारुद्र कत्ते यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र कांबळे यांनी रूपरेषा सांगितले. गंगाधर फुलमाळी यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी वैशाली पवार, कल्पना चव्हाण, सविता शिवशरण, अर्चना वाळवेकर, रमेश जाधव, परमेश्वर पांचाळ, सुधाकर चाबुकस्वार, सिद्धेश्वर मुळजे, संजय परदेशी, बालाजी कोकणे, दीपक पवार, सैफन सुभेदार, आलबक्ष मुल्ला, शकील बिराजदार, उमेश पवार, विजयकुमार राठोड श्रीकांत चव्हाण, दत्ता पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश चव्हाण यांनी सहकार्य केले.

## ३२ वर्षांनी एकवटले माजी विद्यार्थी

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये स्नेहमेळावा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये सन १९९२ दहावी पहिल्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, युसूफ शेख, मारुती मने, बसवराज कोरे, सविता कुलकर्णी, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले.

माजी विद्यार्थ्यांतर्फे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रशालेतर्फे मान्यवरांच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सीताराम माळी, शिवाजी कांबळे, गंगाधर केमशेट्टी, वैशाली डांगे, जयश्री उजळंबे, सुभाष हरवाळकर यांनी आठवणींना उजाळा दिला. मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवाजी कांबळे,गंगाधर केमशेट्टी,प्रशांत रेड्डी, उमाकांत हुच्चे, सुभाष हरवाळकर, प्रशांत साळुंखे, गुरुराज पाटील, राजश्री विभुते, शकुंतला कुडल, नीता साळुंखे, रत्नकला धनश्री, सुनीता क्षीरसागर,जयश्री उजळंबे, सुनीता क्षीरसागर घेतले. सूत्रसंचालन सन्मिता पाटील यांनी केले, तर सीताराम माळी आभार यांनी मानले.

## घनकचरा, मैलागाळ अन् सांडपाणी व्यवस्थापन काळाची गरज

### अतिरिक्त अभियान संचालक शेखर रौंदळ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ ऑगस्ट-**

सातारा जिल्ह्यातील मलकापूर व हजारमाची ग्रामपंचायतीमधील मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प राज्याला मार्गदर्शक आहेत. राज्यात मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे, अशी माहिती राज्याचे स्वच्छ भारत मिशनचे अभियान संचालक शेखर रौदाळ यांनी केले.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील मलकापूर नगरपरिषदेचा मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, कचरा पासून वीज निर्मिती प्रकल्प व सांडपाणी पाणी शुध्दीकरण प्रकल्प व हजार माची ग्रामपंचायतीने कमी खर्चात राबविलेले मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प व बनगरवाडी येथील गांडुळखत प्रकल्पास राज्यातील पाणी व स्वच्छतेची जबाबदारी असलेले उपमुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व जिल्हा कक्षातील सल्लागार यांनी भेट दिली राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्वच्छ भारत मिशन यांच्या वतीने राज्यातील पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता, जिल्हा स्वच्छता तज्ञ यांच्यासाठी राज्यस्तरीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आलेले होते. अभ्यास दौऱ्याचा समारोप सातारा जिल्हा परिषदेतील छत्रपती शिवाजी सभागृहामध्ये विविध विषयावर चर्चासत्र घेऊन व प्रेझेंटेशनच्या माध्यमातून मैलागाळ व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. अभ्यास दौरा यशस्वी करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक अर्चना वाघमळे व पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी क्रांती बोराटे, सोलापूरचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय लाड, लेखाधिकारी सुनिल जाधव, कराड तालुक्याचे गट विकास अधिकारी प्रताप पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी विजय विभुते, उपअभियंता जयदिप पाटील, कक्ष अधिकारी सुनिल रांजणे, जिल्हा तज्ञ धनाजी पाटील, रवींद्र सोनवणे, ऋषिकेश शीलवंत, राजेश इंगळे, गणेश चव्हाण निलिमा सन्मुख यांनी योगदान दिले. प्रास्ताविक सोलापूरचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन राजेश भोसले यांनी केले व आभार अजय राऊत यांनी मानले.

राज्यस्तरीय मैलागाळ व्यवस्थापन अभ्यास दौरा जिल्हयात पार पडला. या अभ्यास दौऱ्यामध्ये सातारा जिल्ह्यातील मलकापूर नगर पंचायत ग्रामपंचायत हजारमाची व बनवडी या गावांची मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प व प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्पांची पाहणी केली. यावेळी ३४ जिल्ह्याचे पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता, उपअभियंता व जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, स्वच्छता तज्ञ उपस्थित होते.

**- अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर**

### सोलापूर जिल्ह्यातही मैला हॉल व्यवस्थापन प्रकल्प होणार

सोलापूर जिल्ह्यात पाच हजार लोकसंख्येचे वरील ग्रामपंचायतीमध्ये मैला हॉल व्यवस्थापन प्रकल्प होणार आहेत. एकाही पाण्याचा स्त्रोत दुषित होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे. यासाठी शासन संस्था कडून आराखडे बनविणार असून, निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती सोलापूरचे पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी दिली.

## महत्त्वाचे

### गतविजेता गोवा चॅलेंजर्स अहमदाबादकडून पराभूत



**चेन्नई :** येथील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये सुरु असलेल्या अल्टीमेट टेबल टेनिस लीग स्पर्धेत गत विजेत्या गोवा चॅलेंजर्स संघाला नवोदित अहमदाबाद एसजी संघाकडून १०-५ अशा पराभवाचा सामना करावा लागला. अन्य सामन्यात यू मुम्बा टीटीने दबंग दिल्ली टीटीसीचा ९-६ असा पराभव करत इतिहास रचला. दबंग दिल्लीच्या २० वर्षीय दिया चितळेने गत दोन वर्षांत विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तब्बल १२ सुवर्ण, सहा रौप्य आणि आठ कांस्यपदके जिंकली असतील, परंतु येथे ती अनुभवी सुतीर्थ मुखर्जीच्या आक्रमक खेळीसमोर टिकाव धरू शकली नाही. सुतीर्थने दियावर ११-६, ११-७, ११-४ असा विजय नोंदवला. हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत सुतीर्थने बाल मैत्रिण अहिका मुखर्जी हिच्या मदतीने महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या चेन मेंग आणि वांग यिदीला पराभूत करून भारतासाठी ऐतिहासिक पदक निश्चित केले होते.

### मोहन बागान आयएसएलची सुरुवात मुंबईविरुद्ध करणार

**कोलकाता :** इंडियन सुपर लीग (आयएसएल) फुटबॉल हंगामात मोहन बागान सुपर जायण्ट आपल्या मोहिमेची सुरुवात १३ सप्टेंबरपासून करणार असून ते आपला सलामीचा सामना मुंबई सिटीविरुद्ध खेळणार आहे. मोहन बागान २८ सप्टेंबर रोजी बंगळुरू एफसी विरुद्ध आपला पहिला अवे सामना खेळतील. नवीन मुख्य प्रशिक्षक जोस मोलिना यांच्या नेतृत्वाखाली कोलकाता-आधारित क्लबसाठी ही पहिली मोहीम असेल. मोहन बागान सुपर जायण्टच्या काही सामन्यांचे वेळापत्रक असे- २३ सप्टेंबर, कोलकाता येथे नॉर्थईस्ट युनायटेडविरुद्ध , २८ सप्टेंबर, बंगळुरू येथे बंगळुरू एफसीविरुद्ध, ५ ऑक्टोबर, कोलकाता येथे मोहम्मडन स्पोर्टिंगविरुद्ध, १९ ऑक्टोबर, कोलकाता येथे ईस्ट बंगालविरुद्ध, ३० ऑक्टोबर, हैदराबाद येथे हैदराबाद एफसीविरुद्ध, १० नोव्हेंबर, भुवनेश्वर येथे ओडिशा एफसीविरुद्ध.

### जसपूरनने गमावले कांस्यपदक

**अम्मन :** जॉर्डनमध्ये सुरु असलेल्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत पुरुषांच्या फ्री स्टाईलमध्ये कांस्यपदकाच्या लढतीत भारताच्या जसपूरन सिंगला पराभवाचा सामना करावा लागला. जसपूरनच्या रुपाने भारताचे एकमेव आव्हान होते, परंतु तोही पराभूत झाल्यामुळे भारतीय संघाला रिकामा हाताने परतावे लागणार आहे. जसपूरनने आपली पहिली फेरीची लढत गमावली होती, परंतु त्याचा प्रतिस्पर्धी जपानच्या युकी यामामोटोने अंतिम फेरी गाठल्यामुळे जसपूरनला रिपेचेज फेरीत प्रवेश मिळाला व त्याने पदकाच्या शर्यतीत पुनरागमन केले. नंतर त्याला इराणच्या अबोलफजल मोहम्मद नेझ्ञादकडून कांस्यपदक गमवावे लागले.

# तन्वी पात्री आशियाई बॅडमिंटन विजेती

### भारताला गवसली आणखी एक सिंधू

**नवी दिल्ली, २५ ऑगस्ट**

ओडिशाच्या १३ वर्षीय बॅडमिंटनपटू तन्वी पात्री हिच्या रुपाने भारताला ऑलिम्पिक पदक जिंकण्याची क्षमता असलेली प्रतिभासंपन्न आणखी एक पी. व्ही. सिंधू गवसली आहे. चीनमधील चेंगडू येथे आयोजित आशियाई बॅडमिंटन १५ वर्षांखालील व १७ वर्षांखालील कनिष्ठ गटाच्या बॅडमिंटन स्पर्धेत तन्वी पात्रीने १५ वर्षांखालील मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकावले. तन्वीने भारतातील सर्वात आश्वासक बॅडमिंटनपटूंपैकी एक म्हणून आपला दर्जा वाढवला आहे.

तन्वीच्या कौशल्याचा गौरव करण्यात आला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय बॅडमिंटनच्या नुकत्याच झालेल्या संघर्षानंतर तिने देशाला आशेचा किरण दाखविला.

या स्पर्धेत १५ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात तन्वीने ३४ मिनिटांत व्हिएतनामच्या द्वितीय मानांकित थि थू ह्युएन गुयेनचा २२-२०, २१-११ असा पराभव केला. या उत्कृष्ट कामगिरीसह या आठवड्याचा गोड शेवट केला.

विजेतेपद पटकावल्यामुळे मला बरे वाटत आहे. मला जिंकण्याची अपेक्षा होती व मी ते साध्य करू शकली याचा मला आनंद आहे. मी गत दोन वर्षांपासून बंगळुरू येथील प्रकाश पदुकोण बॅडमिंटन अकादमी (पीपीबीए) येथे प्रशिक्षण घेत आहे, असे तन्वी पात्रीने सांगितले.




आशियाई बॅडमिंटनमध्ये तन्वी पात्रीला १५ वर्षांखालील मुलींच्या गटाचे विजेतेपद

तन्वी पात्रीने अंतिम सामन्यात आपली चपळता व कौशल्य दाखविले. प्रारंभीच्या गेममध्ये ११-१७ ने पिछाडीवर राहिल्यानंतर तन्वीने कडवी झुंज देत संपूर्ण स्पर्धेत एकही गेम न गमावता विजेतेपद पटकावले. तन्वीचे आईवडील- रबीनारायण पात्री आणि सैलाबाला पांडा हे सॉफ्टवेअर इंजीनिअर आहेत, त्यांनी पूर्वी चीनमध्ये काम केले होते व यादरम्यान तन्वी चीनमध्ये पहिल्यांदा बॅडमिंटन खेळली. कोरोना संकटानंतर २०२० मध्ये हे कुटुंब भारतात परतले. चीनमध्ये असताना तन्वी पात्रीने बॅडमिंटन प्रशिक्षण चिनी प्रशिक्षक जियांग योंग यी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले व २०१७ ते २०२१ दरम्यान चीनमध्ये नऊ विजेतेपदे जिंकली. पीपीबीएमध्ये दाखल झाली तेव्हा तन्वी ८ ते ९ वर्षांची होती. तेव्हाच अकादमीचे संचालक विमल कुमार यांना तिच्यामध्ये प्रतिभा दिसली व त्यांनी अगदी भारतातील सर्वात ख्यातनाम बॅडमिंटनपटूंपैकी एक पी. व्ही. सिंधूच्या सुरुवातीच्या दिवसांशी तुलना केली.

तन्वी मला सिंधूची लहान असतानाची आठवण करून देते. लहान वयातच सामने जिंकण्याची क्षमता हे चांगले लक्षण आहे. तिच्यात खूप क्षमता आहे व तिला अजून बराच पल्ला गाठायचा आहे. ती तिच्या वयोगटात पुढे आहे, असे विमलकुमार म्हणाले.

गत सहा महिन्यांत तिने १७ वर्षांखालील गटाच्या स्पर्धा जिंकल्या आहेत. राष्ट्रीय विजेतेपद पटकावताना तिने अनेक वरिष्ठ खेळाडूंना पराभूत केले आहे. जर तन्वीने आपली ताकद सुधारली व विकसित होत राहिल्यास ती २०२८ किंवा २०३२ ऑलिम्पिकसाठी प्रबळ दावेदार असू शकते, असे विमल कुमार म्हणाले. (वृत्तसंस्था)

# लिंडा नोस्कोव्हाने जिंकली मॉन्टेरी ओपन स्पर्धा



### मिळवले पहिले डब्ल्यूटीए टूर विजेतेपद

**मॉन्टेरी (मेक्सिको), २५ ऑगस्ट**

अमेरिकन ओपन स्पर्धेसाठी तयारी करत असताना झेक प्रजासत्ताकच्या १९ वर्षीय लिंडा नोस्कोव्हाने मॉन्टेरी ओपन टेनिस स्पर्धा जिंकली. हे तिचे पहिले डब्ल्यूटीए विजेतेपद ठरले.

या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सहाव्या मानांकित लिंडाने लुलु सुनवर ७-६(६), ६-४ असा विजय मिळविला. या विजयामुळे तिचा अमेरिकन ओपनमध्ये प्रवेश करताना आत्मविश्वास वाढला आहे.

जागतिक क्रमवारीत ३५ व्या क्रमांकावर असलेल्या लिंडाला दोन आठवड्यांपूर्वी सिनसिनाटी येथे पहिल्या फेरीत लुलु सुनकडून पराभव पत्करावा लागला होता. या पराभवाचा वचपा घेत लिंडाने विजेतेपदाचा मान मिळविला.

आगामी अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत लिंडा नोस्कोव्हाचा सामना जागतिक क्रमवारीत ३१ व्या स्थानी असलेल्या युलिया पुतिन्त्सेवाविरुद्ध होणार आहे.

जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनची उपांत्यपूर्व फेरी गाठणारी लिंडा नोस्कोव्हा आता ३० व्या मानांकित युलियाविरुद्ध कशी खेळेल, हे बघण उत्सुकतेचे ठरणार आहे.

स्वित्झर्लण्डकडून खेळल्यानंतर आता आपल्या मूळ न्यूझीलंडचे प्रतिनिधीत्व करत असलेल्या २३ वर्षीय लुलु सुनने पहिल्या दौऱ्यातील विजेतेपदाची संधी गमावली. विम्बल्डन उपांत्यपूर्व फेरीतील खेळाडू लुलु सुन ही सोमवारी अमेरिकन ओपनमध्ये लुसिया ब्रोंझेटीविरुद्धच्या सामन्याने आपल्या अभियानाला सुरुवात करणार आहे.

तत्पूर्वी. चीनच्या हान्यु गुओ व रोमानियाच्या मोनिका निकुलेस्कू या जोडीने अव्वल मानांकित मेक्सिकोच्या जिउलियाना ओल्मोस आणि रशियाच्या पॅनोव्हा या जोडीचा ३-६, ६-३, १०-४ असा पराभव करत दुहेरीचे विजेतेपद पटकावले. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचा पहिला डाव ३११ वर घोषित, दुसऱ्या दिवसाअखेर विदर्भच्या २ बाद ५४ धावा

- रणजी संभाव्य संघ दुसरा सराव सामना
- विदर्भाच्या पार्थ रेखाडेचे ४ बळी
- महाराष्ट्राच्या क्षीरसागरचे शतक २ धावांनी हुकले

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या सराव सामन्यात दुसऱ्या दिवशीचा खेळ थांबला तेंव्हा विदर्भ संघाने १९ षटकात २ बाद ५४ धावा केल्या. तत्पूर्वी महाराष्ट्राने पहिला डाव चहापानाच्या आधी ९ बाद ३११ वर घोषित केला. महाराष्ट्राकडून यश क्षीरसागरने दमदार ९८ धावा केल्या.

कालच्या ३/१५३ वरून महाराष्ट्राच्या यश क्षीरसागर आणि मंदार भंडारी यांनी सकाळी डाव पुढे सुरू केला, संघाच्या १८० धावा असताना मंदार भंडारी ३१ धावांवर बाद झाला. यशने ९९ चेंडूमध्ये अर्धशतक झळकावले. अझीम काझीने (२१) यश सोबत ४२ धावांची भागीदारी रचली. काझीनंतर लगेच ३ चेंडूत कर्णधार निखिल नाईकला शून्यावर बाद करत पार्थ रेखाडे फिरकीचे जाळे टाकले. नंतर आलेल्या अर्शिन कुलकर्णीने (२२) यशसोबत ५४ धावांची भागीदारी केली पण पुन्हा एकदा पार्थने फिरकीच्या जाळ्यात अर्शिन पाठोपाठ तरणजितसिंग धिल्लोनला (0) फसविले. तळातील फलंदाज म्हणून आलेल्या रामकृष्ण घोषने (११) यशसोबत ३५ धावा जोडल्या. संयमी आणि प्रसंगी दमदार फलंदाजी करत शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या यशला सन्मेश देशमुखने झेलबाद केले आणि महाराष्ट्राने डाव घोषित केला. विदर्भकडून पार्थ रेखाडे ६0/४, हर्ष दुबे ४१/२, दर्शन नालकांडे, ललित यादव व सन्मेश देशमुख यांनी एकेक बळी मिळवले.



यश क्षीरसागर



पार्थ रेखडे

विदर्भाच्या पहिल्या डावाची सुरुवात अथर्व तायडे व सत्यम भोयर यांनी केली आणि अथर्व तायडने (१0) पहिल्याच षटकात मुकेश चौधरीला २ खणखणीत चौकार लगावल्यानंतर शेवटच्या चेंडूवर मुकेशने पुन्हा एकदा, सलग तिसऱ्यांदा पहिल्या षटकात गडी बाद करत विदर्भाला झटका दिला. चहापानाला खेळ थांबला तेव्हा विदर्भाने १0 षटकात १ बाद २८ धावा केल्या होत्या. नंतर आलेल्या यश राठोडने ३१ धावांची भागीदारी रचली आणि सत्यम भोयरला (१५) रामकृष्ण घोषने यष्टिमागे निखिल नाईक करवी झेलबाद केले. पंचांनी दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबविला. तेव्हा २ बाद ५४ (१९ षटके) अशी स्थिती असून सामन्याच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवशी विदर्भ संघ पहिल्या डावात किती धावा करतो ते पाहता येणार असून महाराष्ट्राचे तेज गोलंदाज की फिरकीपटू यांची कामगिरी पाहता येणार आहे.

सदरचा सामना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अधिकृत यूट्यूब चॅनलवर लाईव्ह असून निवड समिती सदस्य संग्राम अतीतकर, किरण आढाव आणि रोहित जाधव हे दिवसभर स्टेडियमवर उपस्थित होते. सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बरसू यांच्या मार्गदर्शनात तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या साह्याने आयोजन समितीकडून सामन्याचे तसेच दोन्ही संघांचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. **(शब्दांकन : मिलिंद गोरे)**

# सोलापूर विद्यापीठाचा पृथ्वीराज जाधव भारतीय ज्युदो संघात

- अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाचा विद्यार्थी

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पृथ्वीराज जाधव याची आशियाई स्पर्धेसाठी भारतीय ज्युदो संघात निवड झाली आहे.

अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय साउथ व वेस्ट झोन विद्यापीठ स्पर्धेतून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये केलेल्या कामगिरीवर त्याची निवड झाली. पृथ्वीराज अकलूजच्या शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्यास प्रा. अरविंद वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. भारतीय ज्युदो फेडरेशनच्या वतीने दिल्ली येथे १0 ते २५ ऑगस्ट दरम्यान ज्युदो कॅम्पचे आयोजन केले होते. तेथे झालेल्या चाचणीतून ९0 किलो वजन गटात पृथ्वीराजची निवड झाली. या कॅम्प दरम्यान आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सेन्साई सुशील गायकवाड, सेन्साई मधुश्री देसाई, सेन्साई दाडगे यांचे म ोलाचे मार्गदर्शन लाभले. पृथ्वीराजचे शिक्षण इंदापूर येथे झाले असून तेथील ज्युदोचे मार्गदर्शक दत्ता व्यवहारे यांच्याकडे त्याने सुरुवातीचे प्रशिक्षण घेतले. सध्या तो



पृथ्वीराज जाधव | प्रशिक्षक गायकवाड

बालेवाडी पुणे येथे ज्युदो मार्गदर्शिका मधुश्री देसाई यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा अमृतसर येथे पाच ते आठ फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाल्या होत्या. तेथे सोलापूर विद्यापीठाचे निवड समिती चेअरमन व प्रशिक्षक प्रा सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्याच्या या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर, प्रो. कुलगुरु डॉ लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, प्रभारी क्रीडा संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. राजेंद्र वडजे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# सेंट जोसेफच्या शरणार्थी, मुसळे यांची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

शहरस्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात वेदांत सचिन मुसळे याने ८ पैकी ६.५ गुण मिळवित पाचवा क्रमांक तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सिद्धी सिद्धलिंग शरणार्थी हिने ७ पैकी ६ गुणांसह उपविजेतेपद पटकावले. या दोघांनी केलेल्या उत्कृष्ट खेळाच्या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या दोन्ही विजयी खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक सनी भोसले , प्रशिक्षक उदय वगरे यांचे मुख्याध्यापक रेव्हरंड फादर आनंद गायकवाड व पर्यवेक्षिका पद्मा नरविडे यांनी अभिनंदन करून पुढील होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# श्रीराम स्कूलच्या सक्षम, विनायक हुच्चे यांचा सलग सहा तास स्केटिंगचा विक्रम

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

डी. आर. श्रीराम स्कूलच्या सक्षम व विनायक अनिल हुच्चे बंधूनी सलग सहा तास स्केंटिंग करून विक्रम केला. त्यास दयानंद महाविद्यालयातील विनर्स स्केटिंग क्लबचे प्रशिक्षक सम्यक मोहोळकर, वासुदेव , क्रीडाशिक्षक जिशान शेख व नबीलाल पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, मुख्याध्यापिका अजिता पिल्लाई, उपमुख्याध्यापक शौरप्पा पुजारी यांनी अभिनंदन केले.



# नागपूर, यवतमाळ, अमरावतीची विजयी सलामी

- लोकमंगल कॉलेजमध्ये राज्य सॉफ्टबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

तिसाव्या राज्य अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धेत पुरुष गटात नागपूर, यवतमाळ व अमरावती संघाने प्रतिस्पर्धी संघावर मात करीत विजयी सलामी दिली.

सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन व लोकमंगल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने वडाळा येथे सुरु झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील व महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रदीप तळवेलकर गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सहसचिव डॉ.सुरजसिंग येवतीकर, सहसचिव गोकुळ तांदळे,लातूरचे जिल्हा सचिव डीडी पाटील, प्रा.रमाकांत बनसोडे, नागपूरचे विकास येवतीकर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक किशोर चौधरी, प्रसन्नजीत बनसोडे, पंचप्रमुख मुकुंल देशपांडे, जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी हे उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील सॉफ्टबॉल मधील सर्व शिवछत्रपती पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सोलापूर मनपा जिल्हा संघटनेचे सचिव प्रा.संतोष खेंडे, संभाजी कोकाटे, गंगाराम घोडके, मारुती घोडके, प्रशांत राणे, प्रशांत कदम, श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोलीकर, वसीम शेख, रवींद्र चव्हाण, संतोष पाटील, समर्थ आहेरवाडी हे परिश्रम घेत आहेत.

### आज झालेले निकाल :

अमरावती मनपा विजयी विरुध्द लातूर ६-0, जालना विजयी विरुध्द धुळे १0-0, सांगली विजयी विरुध्द अहमदनगर जिल्हा ११-0, नाशिक मनपा विजयी विरूध्द सोलापूर मनपा ९-0, नागपुर मनपा विजयी विरुद्ध बीड १0-0, अहमदनगर मनपा विजयी विरुध्द छ. संभाजीनगर मनपा ५-0, पुणे जिल्हा विजयी विरुध्द कोल्हापूर १-0, यवतमाळ विजयी विरुध्द जालना ४-३.



# आहेरवाडीच्या कोनापुरे प्रशालेची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री पंचलिंग शिक्षण प्रसारक मंडळ आहेरवाडी संचलित, श्री मल्लप्पा कोनापुरे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने क्रिकेट, थ्रो बॉल, शूटिंग बॉल, कबड्डी आणि व्हॉलिबॉल या स्पर्धांमध्ये तालुका आणि जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली.

या विजयी संघांना पर्यवेक्षक विश्वनाथ गावडे, क्रीडा प्रमुख बाबुराव पुजारी, सहशिक्षक धोंडप्पा बोरुटे, विश्वनाथ चडचणे, प्राध्यापक सुधाकर फुंडीपल्ले यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडू मार्गदर्शकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवानंद कोनापुरे, उपाध्यक्ष प्रभाकर दिंडोरे, सचिव गौरीशंकर बाके, खजिनदार भिमाशंकर कोनापुरे, ज्येष्ठ संचालक काशिराया बोरुटे, सिद्धाराम बावी, शिवनिंगप्पा बिराजदार, बसवराज कुंडीपल्ले, फाजल बेग, संगीता कांबळे, प्राचार्या. संध्या कुनाळे आदींनी अभिनंदन केले.

### कामगिरी

**तालुका क्रिकेट :** मुलांच्या १९ वर्षे वयोगटात उपविजयी.
**जिल्हा थ्रो बॉल :** मुलींच्या १९ वर्ष वयोगटात तृतीय.
**जिल्हा शूटिंग बॉल :** १९ वर्ष वयोगट संघाने द्वितीय.

**तालुका कबड्डी :** मुलींच्या १९ वर्ष वयोगटात विजयी.
**व्हॉलिबॉल :** १४, १७, १९ वर्षे वयोगट मुली, १७ वर्षे वयोगट मुले विजयी तर १९ वर्ष मुलांच्या वयोगट उपविजयी.

# मुंबईच्या कर्णधारपदावरून पांड्याची होणार हकालपट्टी?

**मुंबई, दि. २५ ऑगस्ट-**

आयपीएल २०२५ पूर्वी मेगा लिलाव होणार आहे. या लिलावानंतर सर्व संघ बदललेले दिसतील. मुंबई इंडियन्समध्येही अनेक बदल पाहायला मिळतील. यामध्ये सर्वात मोठा बदल कर्णधारपदाच्या बाबतीत होऊ शकतो. रिपोर्टनुसार, रोहित शर्मासह टीमचे अनेक खेळाडू हार्दिक पांड्याच्या कर्णधारपदावर खूश नाहीत. यासोबतच सचिन तेंडुलकरही सूर्याला कर्णधार बनवण्याच्या बाजूने आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, यामुळे मुंबई कॅम्पमध्ये सध्या खळबळ उडाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### कुसमोड जि. प. प्राथमिक शाळेचा रौप्य महोत्सव

**पिलीव, दि. २५ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला २५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व पालक, ग्रामस्थांनी शाळेचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा केला. यावेळी पत्रकार उमेश घोंगडे, राष्ट्रीय बाल व महिला विकास परिषदेच्या महासचिव श्रद्धा जवंजाळ, उपलाने, विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, केंद्र प्रमुख मुज्जमिल जमादार, सरपंच महावीर धायगुडे, माजी सरपंच तुषार लवटे, प्रा. नंदकुमार लोखंडे उपस्थित होते. शाळेसाठी जमीन दान करणाऱ्या तसेच शाळा सुरु झाल्यापासून असणाऱ्या शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश मदने, उपाध्यक्ष तुषार पवार यांनी स्वागत केले. शाळेसाठी उपस्थितांनी ७७ हजारांची देणगी दिली. शिक्षक सचिन गाटे यांनी लेखाजोखा मांडला. प्रा. नंदकुमार लोखंडे यांनी ११ हजारांची ठेवी ठेवण्याचे जाहीर केले. यातील व्याजातून चौथीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला बक्षीस देणयात येणार आहे. यावेळी पवारस्ती येथील शिक्षक सचिन गाटे व गाटे मॅडम यांचा सरपंच महावीर धायगुडे, माजी उपसरपंच संजय पाटील, दामोदर लोखंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सुहास उरवणे यांनी केले तर आभार बापू पवार व दादा पवार यांनी मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता करणयात आली.

### अणदूर येथील श्री नीलकंठेश्वर मठात धार्मिक कार्यक्रम

**अणदूर, दि. २५ ऑगस्ट-**



येथील श्री निलकंठेश्वर मठात लिंगैक्य प्रभुलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून मठाधिपती शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अधिपत्याखाली धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. त्याचा लाभ भक्त भाविकांनी घ्यावा असे आवाहन निलकंटेश्वर सदभक्त मंडळाने केले आहे. या कार्यक्रमास जयशांतलिंगेश्वर महास्वामीजी (हिरेनागाव), बसवलिंग महास्वामीजी(अक्कलकोट),गंगाधर महास्वामीजी (जेवळी), विरंतेश्वर महास्वामीजी (केसरजवळगा) व सुतरेश्वर महास्वामीजी, (अचलेर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोमवार (दि.२६) रोजी रात्री मठात शिवभजनाचा जागर होणार आहे तर मंगळवार (दि.२७) रोजी सकाळी संजीवन समाधीची महापूजा तसेच रूद्राभिषेक व महाप्रसाद होणार आहे. बुधवार (दि.२८) रोजी सकाळी ९ वा. मठात दिक्षा व अय्याचार दिला जाणार असून इच्छुकांनी आपली नावे नोंदवावीत असे आवाहन करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचे वैदिकत्व विवेकांनद स्वामी, बसवराज शास्त्री (तिर्थ) व नरेंद्र (विकी) स्वामी हे करणार आहेत. या धार्मिक कार्यक्रमाचा सर्व सदभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाह श्री निलकंठेश्वर सदभक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले असून कार्यक्रमाची जय्यत तयारी चालू आहे.

### करमाळा विधानसभेची निवडणूक रासप स्वबळावर लढवणार : विकास आलदर

**करमाळा, दि. २५ ऑगस्ट-**

करमाळा विधानसभा निवडणूक रासप पूर्ण ताकदीनिशी लढवणार असून सर्व रासप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी कामाला लागायला हवे. गावा-गावात, मतदारापर्यंत पोहोचून गाव बैठकीच्या नियोजनाद्वारे बुथ, गणांची बांधणी, दुबार, मयत मतदारांची यादी पडताळणी करून गाव तेथे कार्यकर्ता जोडायला हवा, असे आवाहन विधानसभा निरीक्षक विकास आलदर यांनी केले.राष्ट्रीय समाज पक्षाची करमाळा येथे बैठक झाली, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पश्चिम महाराष्ट्राचे संपर्क प्रमुख तानाजी शिंगाडे होते. यावेळी जिल्हाध्यक्ष पुणे जिल्हाध्यक्ष किरण गोफणे, जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, तालुकाध्यक्ष जीवन होगले, तालुका प्रभारी नामदेव पालवे, अल्प सं. आघाडी तालुकाध्यक्ष जहाँगिर पठाण, रासपा तालुका उपाध्यक्ष विठ्ठल भिसे, इंजि. प्रवीण होगले, सुधीर ठोंबरे, शलैश शिंदे, तात्या वायसे, भाऊ हाके, विकास मेरगळ, दीपक कडू, बंडू कुराडे, रघुवीर आडसूळ उपस्थित होते.



## शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी

### अप्पासाहेब पाटील यांच्याकडून नुकसानग्रस्त पिकांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २५ ऑगस्ट-**

मघा नक्षत्राच्या पावसामुळे मंद्रूप परिसरात शेतीसह पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाच्या पाण्यामुळे झालेल्या पिकांचे नुकसान भरपाई व पीक विमा देण्याची मागणी बाजार समितीचे माजी संचालक अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर यांनी केली आहे.

मंद्रुप परिसरातील नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, येळेगावचे सरपंच संजय लोणारी, रेवणसिध्द भिंगे आदी उपस्थित होते. मघा नक्षत्राने मंद्रुप परिसरात दमदार हजेरी लावल्यामुळे तलाव तुडुंब भरून वाहू लागले आहेत. शिवाय शेत शिवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने उडीद, मूग, तूर, भुईमूग, मका, बाजरी, सोयाबीन यासारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त पिकांचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित अनुदान देण्यात यावे, तसेच पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करून मिळावे, अशी मागणी बाजार समितीचे माजी संचालक अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर यांनी केली आहे. यावेळी पाटील यांनी मंद्रुप, भंडारकवठे, निंबर्गी, कंदलगाव, येळेगाव, वांगी, वडकबाळ, बसवनगर, मनगोळी यासह अनेक गावांतील नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली. यावेळी मल्लिनाथ म्हेत्रे, गुरूनाथ जोडमोटे, नागनाथ घाटे, सिध्दाराम काळे, राजकुमार घाटे, मारूती कोरे, दिलीप म्हेत्रे, महादेव जकुणे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

# कायद्यात दुरुस्ती करुन सशुल्क दर्शन लागू करा

### जिल्हा काँग्रेस ब्राह्मण सेलचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बडवे-शिंदे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ ऑगस्ट-**





सशुल्क दर्शनाला वारकरी सांप्रदायातील काही महाराजांनी विरोध केल्यामुळेच पैसे घेऊन दर्शन घडविणाच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे सशुल्क दर्शनाला विरोध करणारी काही महाराज मंडळीच दर्शनाच्या गैरप्रकारांना जबाबदार आहेत. त्यामुळे राज्य सरकारने मंदिर कायद्यात दुरुस्तीचा वटहुकूम काढून सशुल्क दर्शन लागू करावे तरच मंदिरातील पैसे घेऊन दर्शन घडविण्याचे प्रकार बंद होतील अशी मागणी जिल्हा काँग्रेस ब्राह्मण सेलचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बडवे-शिंदे यांनी केली आहे.

याबरोबरच मंदिरातील अनेक चुकीच्या गोष्टींचा आपल्या निवेदनात उहापोह करुन काही नवीन सूचना देखील त्यांनी केलेल्या आहेत. दरम्यान आपल्या या मागणीच्या निवेदनाची प्रत त्यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना देखील पाठविल आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या पैसे घेऊन दर्शन घडविल्याची घडलेली घटना यामुळे मंदिरासह पंढरपूरची बदनामी होत आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार मागणी केल्यानंतरही सशुल्क दर्शनाचा निर्णय मंदिर समिती घेत नाही. याला कारण आहे काही महाराज मंडळींनी केलेला विरोध. त्यामुळे सशुल्क दर्शन चालू होत नाही. त्यामुळेच असे प्रकार घडत आहेत. याला कायमचा पायबंद घालण्यासाठी श्री विठ्ठलाचे सशुल्क दर्शन सुरू करणे हाच एकमेव पर्याय आहे.

या विरोधामागे हीच महाराज मंडळी दररोज अनेक माणसे सोबत दर्शनाला घेऊन जात असतात. त्याला कोणीही विरोध करीत नाही. विठ्ठल मंदिरातील सभामंडपात सप्ताह असल्यानंतर पन्नास ते शंभर माणसे दररोज सोडली जातात. या बरोबरच श्री विठ्ठल मंदिरात अनेक उत्सवानिमित्त महाराज मंडळींचे कार्यक्रम असतात. त्यावेळेस ही त्यांची माणसे दर्शनासाठी सोडली जातात. आषाढी, कार्तिकी पालखीच्या वेळेस व विठ्ठलाच्या पौर्णिमेच्या पालखीबरोबर सुमारे दोनशेहून अधिक भाविकांना थेट दर्शनाला सोडले जाते. त्याचबरोबर सर्व पक्षाचे प्रतिनिधी, नेते मंडळी, सर्व शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक दररोज दर्शनाला सोडली जातात. चातुर्मासात येथे मुक्कामास असलेली काही महाराज मंडळी हे दररोज शेकडो शिष्य व त्यांचे अनुयायांना घेऊन थेट दर्शनाला जातात असा आरोप करीत यामुळेच काही महाराज मंडळी सशुल्क दर्शनाला विरोध करीत असल्याचे बडवे-शिंदे यांनी दिलेल्या आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

#### बडवे-शिंदे यांनी केलेल्या सूचना

मंदिराच्या उत्पन्न वाढीसाठी तोट्यातील परिवार देवतांचा लिलाव करण्यात यावा. तेथील कर्मचारी सध्या काढलेल्या टेंडरमध्ये जागा उपलब्ध आहेत त्या ठिकाणी वापरावेत. मंदिर समितीच्या अनेक खुल्या जागा आहेत. ( उदा. रिध्दी-सिद्धी गणपती, यमाई-तुकाई, खंडोबा मंदिर, महाद्वार घाट महादेव मंदिर) त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर बांधून तरुणांना रोजगार मिळेल आणि मंदिर समितीचे देखील उत्पन्न वाढेल. व्हीआयपींची मोफत तुळशीपूजा बंद करण्यात याव्यात. सत्कार सोहळ्यावरील खर्च कमी करावा. सशुल्क दर्शन सुरू केल्यास मंदिर समितीच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. त्यामुळे विकास कामांसाठी राज्य शासनाला मंदिर समितीला निधी द्यावा लागणार नाही असेही बडवे-शिंदे यांनी निवेदनाव्दारे सूचित केले आहे.

#### यांना कुणाचाही विरोध नाही

स्वत: महाराज मंडळी त्यांचे कुटुंबीयाबरोबरच मंदिरातील पहारेकरी, विणेकरी, संतांच्या पादुका घेऊन जाण्यास काही तक्रार नाही, असेही बडवे-शिंदे यांनी नमूद केल आहे. मात्र आपल्या नावाखाली इतर माणसे मंदिरात दर्शनासाठी नेण्यास त्यांनी हरकत घेतली आहे.

## श्रावणमास प्रवचनमाला - २०

# नाथांचे जीवन भक्ती, ज्ञान आणि वैराग्य या तीन गोष्टींनी युक्त आहे

### ● डॉ. जयवंत बोधले महाराज ●



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ ऑगस्ट-**

ज्ञानोबाराय आणि तुकोबाराय या दोन्ही संताचा 'मध्य म्हणजे संत एकनाथ महाराज' आहेत. संत एकनाथ महाराजांचे चरित्र हे, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच संत तुकाराम महाराजांच्या वाड्मयावर अवलंबून आहे. या दोन्ही संतांच्या वाड्मयाचा दुवा म्हणूनच संत एकनाथ महाराजांचे वाड्मय पाहिले जाते, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी चालू असलेल्या श्रावणमास प्रवचनमालेच्या २० व्या दिवशी संत एकनाथ महाराजांच्या जीवन चरित्राविषयी निरुपण करताना सांगितले.

**अभेद भक्ती वैराग्य ज्ञान।**
**स्वयें आचरोनी आपण।**
**देखी लावावे इतर जन।**
**लोकसंग्रह जाण या नांव।।**

नाथांचं जीवन भक्ती, ज्ञान आणि वैराग्य या तीन गोष्टींनी युक्त आहे. या अभंगात नाथबाबा सांगतात, 'अभेद' म्हणजे 'एक' आणि 'भेद' म्हणजे 'दोन' ! या अर्थाने भक्ती ही दोन गोष्टीमध्ये आहे; एक 'भक्त' आणि दुसरे 'देव'. भक्तीमध्ये अभेद येण्यासाठी ज्ञानाच अधिष्ठान असावं लागतं. तसेच, भक्तीला सोडून असलेलं ज्ञान हे अहंकार निर्माण करीत असते. म्हणून, भक्ती आणि ज्ञान हे एकमेकांना पूरकच आहेत. भक्ती ज्ञानावर आणि ज्ञान भक्तीवर अवलंबून असते. म्हणून, ते अभेद आहे, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज स्पष्ट करतात.

**भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान।**

भागवतामध्ये नाथ महाराज सांगतात, 'ज्ञानासाठी भक्तीच हवी!' उपनिषदांमध्ये जरी मोक्षासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे, सांगितले असले तरी भक्ती हे परमार्थ प्राप्तीचे मूळ आहे.

एखादा वृक्षच डोळ्यासमोर घ्या ना! वृक्षाला प्रथम मूळ असते. त्याला पाणी घातल्यास नंतर पुढे त्याला फुले येतील, फळे येतील. तद्वतच, परमार्थ प्राप्तीमध्ये प्रथम भक्तीचे मूळ लावल्यानंतर त्याची जोपासना करीत; त्या भक्तीचे ज्ञान स्वरुपात फूल मिळेल आणि नंतर या ज्ञानरुपी फूलापासून वैराग्य प्राप्तीचे फळ मिळेल. म्हणजेच, 'ज्ञान आणि वैराग्य हे ज्याच्या पावलावर पाऊल टाकून चालते ती भक्ती महत्त्वाची आहे', असे नाथ महाराज अभंगातून सांगतात.

जेव्हा एखाद्या झाडाचे फळ मिळवायचे असेल तर प्रथम तिथे झाड (मूळ) पाहिजे; तरच फळ मिळेल.

**भक्ती युक्त ज्ञान।**
**तेथे नाही पतन।**
**भक्ती माता करी जतन।।**

ज्ञानी माणसाला अहंकाराचा विकार जडण्याची जास्त शक्यता असते. म्हणून, त्यासाठी भक्तीचीच गरज आहे. भगवान श्रीकृष्ण हे ज्ञान स्वरुप असूनही भक्तीने युक्त आहे. यशोदा माता भक्ती आणि भगवान श्रीकृष्ण हे ज्ञान होत. अर्थात, यशोदा मातेच्या (भक्तीच्या) उदरी भगवान जन्माला आले ते ज्ञान होय.

यशोदा मातेला भगवान म्हणतात, आता मला या दोरीने बांधलेलं सोड. म्हणजेच, ज्ञानाला मोकळे करणे होय. म्हणून, डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज विशद करतात ,ज्ञानाला मुक्त करण्याचे सामर्थ्य फक्त भक्तीमध्येच आहे. जिथे शुद्ध अंत:करणाने भक्ती केली जाते. तिथे ब्रह्मज्ञान सुध्दा पाया पडत आहे.

एके दिवशी कर्नाटकातील एका गावच्या सावकाराने पंचधातूंनी बनवलेली भगवान पांडुरंगाची मूर्ती तयार केल्यानंतर त्याच्या स्वप्नात सतत ३ दिवस मला पैठणला घेऊन चल! अशी म्हणत होती. सावकाराने ती मूर्ती पैठणला येऊन नाथबाबांच्या वाड्यात दिली. नाथांनी मूर्तीला आलिंगन दिलं. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी मोठा उत्सव सोहळा केला. मग, मूर्तीला नैवेद्य म्हणून लोण्याचा गोळा मूर्तीला दाखवतात. तेव्हा, 'नवल काय साक्षात पांडुरंगाने जीभ बाहेर काढून तो लोण्याचा गोळा चाटून खाल्ला.' सर्वजण चकीत झाले. सगळीकडे नाथांचा भक्तीभाव पाहून जय जयकार होऊ लागला. आजच्या प्रवचनमालेस मंगळवेढ्याचे धनश्री पतसंस्थेचे चेअरमन प्रा.शिवाजीराव काळुंगे सर, श्री.भागवत कबीर महाराज आणि डॉ. भावार्थ देखणे महाराज यांची उपस्थितीत होते.

# पंढरपुरात ७८० रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

### कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पुण्यतिथी; शिबिरामध्ये तीन हजार २०० रुग्णांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ ऑगस्ट-**



कर्मवीर सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथी निमित्त पंढरपूर तालुक्यातील तीन हजार २०० इतक्या रुग्णांची नेत्र तपासणी तर सुमारे ७८० रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया संपन्न झाली असल्याची माहिती युवा नेते प्रणव परिचारक यांनी दिली.

पांडुरंग परिवार युवक आघाडी आणि प्रणव परिचारक युवा मंच यांच्या वतीने पंढरपूर तालुक्यातील आठह जिल्हा परिषद गटांमध्ये नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शास्त्रक्रीया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि करकम येथील ग्रामीण रुग्णालय अशा नऊ ठिकाणी हे शिबिर संपन्न झाले. पुण्यातील एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय यांच्या सहकार्यातून आणि पांडुरंग परिवाराच्या पुढाकारात ग्रामीण भागातील नागरिकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप नुकताच कासेगाव येथे झाला.

पांडुरंग परिवाराच्या माध्यमातून दृष्टी अभियान हे सुरू करण्यात आले आहे. पंढरपूर तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा संकल्प प्रणव परिचारक यांनी केला आहे. या माध्यमातूनच या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये आत्तापर्यंत बारा हजार ३०० रुग्णांची तपासणी गेल्या चार वर्षात झाली. तर चार हजार ७०० रुग्णांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर हे करण्यात आले आहे. यंदाही या शिबिरांमध्ये तब्बल तीन हजार २०० रुग्णांची तपासणी झाली. तर ७८० गुणांची पुणे येथे शस्त्रक्रिया संपन्न झाली आहे. यामध्ये डोळ्यातील मास वाढलेल्या ५६ रुग्णांची वेगळी आणि यशस्वी शस्त्रक्रिया या शिबिराच्या माध्यमातून संपन्न झाली.

आमदार प्रशांत परिचारक, युटोपियन शुगर्सचे सर्वेसर्वा उमेश परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते प्रणव परिचारक यांच्या माध्यमातून पांडुरंग परिवाराच्या वतीने या शिबिरांचे आयोजन होते आहे. पंढरपूर तालुक्यातील शंभरहून अधिक गावातील रुग्णांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. सलग चार वर्षे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रणव परिचारक घेत असलेले नेत्र शिबीर ग्रामीण भागातील रुग्णांसाठी वरदायिनी ठरत आहे.

### महिलांना सुरक्षा द्या : रुपा कुताटे

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**



शिक्षण, रोजगार, प्रवास आणि घरीसुद्धा महिला सुरक्षित नाहीत. महिलांच्या सुरक्षेसाठी शासनाने तात्काळ कायदा करावा आणि अत्याचार करणाऱ्यांना कडक शिक्षा करावी, अशी मागणी रुपा कुताटे यांनी केली आहे.

पीडित महिला अन्याय झाल्यानंतर दाद मागण्यासाठी यंत्रणेसमोर जाते, तेव्हा तात्काळ कोणीच दखल घेत नाही. यामुळे संताप अनावर होऊन कुठेही तक्रार न करता मागे फिरतात. याचा फायदा निर्दय लोक घेतात आणि सतत अत्याचार करतात. विकृत मनोवृत्तीच्या लोकांवर कारवाई करण्यासाठी तात्काळ शक्ती कायदा पारीत व्हावा आणि आरोपींना शिक्षा मिळावी, अशी मागणीही रुपा कुताटे यांनी केली आहे.

# अक्कलकोटमध्ये ४८ हजार मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी

### १२ हजार अर्जांची दोन दिवसांत छाननी; १४ ऑगस्टपासून अनेकांना लाभ मिळण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट, दि. २५ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता अक्कलकोट तालुक्यात ६२,७७८ महिला लाभार्थी अर्ज केलेल्या आहे. त्यापैकी ४८,३८५ महिला पात्र आहेत. १२ हजार लाभार्थ्यांची छाननी येत्या दोन दिवसांत पूर्ण होणार आहे.

पात्र ठरलेल्या महिलांना १४ ऑगस्टपासून प्रत्यक्ष लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यामुळे महिलावर्गात समाधानाची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाच्यावतीने प्राप्त प्रत्येक अर्जाची छाननी करण्यात आली. छाननीअंती पात्र ठरलेल्या महिलांच्या बँक खात्यात १४ ऑगस्टपासून जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून प्रत्येकी ३ हजार रुपये जमा करण्यास सुरुवात झाली आहे. यापूर्वी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ तालुक्यातील सर्व पात्र महिलांना मिळावा म्हणून त्यांच्या कुठल्याही अडचणी सोडविण्याकरीता अक्कलकोट येथे मिलिंद घाटगे यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचा ९०४९११३२८२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन निवासी नायब तहसिलदार विकास पवार यांनी केला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून, त्याव्दारे पात्र लाभार्थी महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देतात. तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही याकरीता तालुका प्रशासन अहोरात्र काम करीत आहेत. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वांवलंबीकरण, आत्मनिर्भर करण्याबरोबरच महिलांच्या सशक्तीकरणाला चालना देण्याकरीता मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेंतर्गत समाजातील सर्व घटकातील पात्र महिलांना प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचा लाभ देण्यात येणार असून त्याकरीता महिलांनी तात्काळ अर्ज ई-केवायसी करणे गरजेचे आहे.

> ज्या महिलेकडे केशरी आणि पिवळा रेशन कार्ड आहे, त्यांना उत्पन्न दाखल्याची गरज नाही. मात्र ज्यांच्याकडे शुभ्र रेशन कार्ड आहे. अशा महिलांना तहसीलदारांचा उत्पन्न दाखला अर्जासोबत जोडणे गरजेचे आहे. जे महाराष्ट्राचे रहिवाशी नाहीत अथवा त्यांच्याकडे रेशन कार्ड नाही अशा महिलांची अर्ज पात्र होणार नाहीत. अशा शंभरच्या आसपास अर्ज तहसीलदार कार्यालयाकडे आले आहेत. ते पात्र होणार नाहीत.
>
> **- विकास पवार,** निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट

# सांगोला आगारात समस्याच समस्या

### परिसरात अंधार, पाण्याचे दुभिक्ष्य; दूरवस्था, गैरसोयी दूर करण्यासाठी शहीद अशोक कामटे संघटनेचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २५ ऑगस्ट-**



सांगोला आगारातील एसटी बस व भौतिक सुविधा अभावाच्या समस्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभागाचे विभागीय नियंत्रक सुनील भोकरे यांना शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे, अशी माहिती संघटनेने दिली.

सांगोला बसस्थानक हे सोलापूर-कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गावरील वर्दळीचे, महत्त्वाचे बसस्थानक असल्याने दररोज हजारो प्रवाशांची आवक-जावक आहे. या ठिकाणी उत्तम दर्जाची बसव्यवस्था व भौतिक सुविधा असणे गरजेचे आहे. सांगोला आगाराची स्वच्छतेअभावी दुरावस्था झाली आहे. दररोज बसस्थानक साफसफाई होत नाही. त्यामुळे अस्वच्छता व कचऱ्याचे ढीग लागलेले असतात. सायंकाळच्या वेळी फक्त एकच एलईडी (मरकुरी) सुरू असलेने रात्रीच्या वेळी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून मर्क्युरी बंद अवस्थेत आहे. बसस्थानक परिसर पाहता अजून किमान चार भागात मोठे एलईडी सुरू ठेवणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याच्या पाण्याच्या टाकीची नियमितपणे साफसफाई होत नसल्याने प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर वर आला आहे. नियमित या टाकीची साफसफाई करावी.

सांगोला आगारात असणाऱ्या बसेसमधून बसच्या छतातून पाणी गळणे, काचा नसणे, सुस्थितीत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.सांगोला-स्वारगेट या प्रवासास किमान नऊ तासाचा वेळ लागत आहे. त्यामुळे प्रवासी वर्गातून तीव्र नाराजी आहे. बसेस या सहा तासात पुणे येथे पोहोचणे अपेक्षित आहे. त्यामुळे हा प्रवास कंटाळवाणा होत आहे.सांगोला आगारास किमान नवीन २५ बसेस द्यावेत. गेल्या ९-१० वर्षात सांगोला आगारास एकही नवीन बस मिळालेले नाही तरी ती मिळावी. बसस्थानकाच्या आवारात मोठे खड्डे पडले असून तरी स्टॅन्ड परिसर पूर्णपणे डांबरीकरण करण्यात यावा. सांगोला-स्वारगेट बस टेंभुर्णी व अकलूज, इंदापूरमार्गे प्रत्येकी २ सकाळ व दुपार सत्रात सुरू कराव्यात. आपण संबंधित विभागास आदेश देऊन सर्व प्रवाशांना चांगल्या सुविधा व सेवा देण्याविषयी कार्यवाही करावी अशी मागणी संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रतिमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आ. शहाजीबापू पाटील, सांगोला आगार व्यवस्थापक विकास पोफळे यांनाही देण्यात आल्या आहेत.

> अशोक कामटे संघटनेच्या निवेदनाद्वारे सांगोला आगारातील समस्यांची माहिती मिळाली.तात्काळ संबंधितांना आदेश देऊन एसटी बसची वेग मर्यादा, अपेक्षित वेळेत बस पोहोचणे, नवीन बस सुरू करणे व भौतिक सुविधा निर्माण करण्याकरता तात्काळ कार्यवाही करून अंमलबजावणी करणार आहे. तसेच सांगोला आगारास नवीन बसेस मिळण्याकरिता वरिष्ठांकडे पाठपुरावा करण्यात येईल.
>
> **- सुनील भोकरे,** विभागीय व्यवस्थापक, सोलापूर

## संक्षिप्त वृत्त




### लोकमान्य गणेशोत्सव महामंडळच्या उत्सव अध्यक्षपदी डॉ. किरण देशमुख

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट -**

लोकमान्य संयुक्त गणेशोत्सव महामंडळ उत्सव अध्यक्षपदी डॉ. किरण विजयकुमार देशमुख यांची निवड झाली. म हामंडळाची बैठक पत्रा तालीम येथे संपन्न झाली. यावेळी याबैठकीला महामंडळाचे सल्लागार दत्तात्रय कोल्हारकर, दिलीप कोल्हे, श्रीकांत घाडगे, राजन जाधव आदी उपस्थित होते. नूतन उत्सव अध्यक्ष डॉ.किरण देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना यंदाचा गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करू तसेच लोकमान्य महामंडळाच्या वतीने कोणत्याही मंडळाला कोणतीही अडचण येऊ देणार नाही असे आश्वासन दिले. यावेळी बापू धगेकर, महादेव गवळी, बापू जाधव, लहू गायकवाड, नवनाथ बनने, बाळासाहेब गायकवाड, पिंटू चव्हाण, उमाकांत घाडगे, शेखर फंड, भैय्या बनसोडे, राहुल बनसोडे, देवीदास घुले, ओंकार भुरले, किरण पवार आदी आदी पदाधिकारी कार्यकर्ते आणि गणेशभक्त उपस्थित होते. **अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष : रणजीत चौगुले आणि सज्जन वडणे, सचिव : विनोद मोटे , मोहन मुन्ना, खजिनदार : दत्ता भोसले, मिरवणूक प्रमुख : गिरीश शेगर, कार्याध्यक्ष : आदित्य घाडगे, सहकार्याध्यक्ष : आशिष शेळके, प्रसिद्धी प्रमुखः अर्जुन सोनवणे.



### भावसार नागरी सहकारी पतसंस्थेस ५१ लाखांचा नफा : चेअरमन क्षीरसागर

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

पूर्व भागातील सहकार क्षेत्रात अग्रगणी असलेल्या भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेस चालू आर्थिक वर्षात विक्रमी रू. ५१ लाख ६० हजार ७२० इतका नफा झाला असून सभासदांना १४ टक्के प्रमाणे लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन किरण चं. क्षीरसागर यांनी दिली. श्री हिगुलांबिका सांस्कृतीक भवन येथे झालेल्या संस्थेच्या ४५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आले असल्याचे श्री क्षीरसागर यांनी सांगितले. उपस्थीत सभासदांचे स्वागत मुख्यकार्यकारी अधिकारी शशिकांत पुकाळे यांनी केले. श्री हिंगुलांबिका देविच्या प्रतिमेचे पुजन चेअरमन व संचालक यांच्या उपस्थीतीत करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा संचालक शशिकांत रंगदळ यांनी घेतला. संस्थेचे अहवाल वाचन शशिकांत पुकाळे यांनी केले. संस्थेच्या एकुण ठेवीत २ कोटी ५५लाख वाढ होवून मार्च २०२४ अखेर रु.२३ कोटी ८९ लाख इतके ठेवी आहेत. एकुण कर्ज रु.१८ कोटी ८६ लाख आहे. एकुण निधी रु.७ कोटी ५५ लाख आहेत. संस्थेने केलेली गुंतवणूक एकुण रु. १४ कोटी ८६ लाख इतके आहे. संस्थेचा एकुण निव्वळ एन.पी.ए शुन्य टक्का असल्याचे तसेच सन २०२३-२४ या वर्षात संस्थेस ऑडीट वर्ग अ मिळाले असे सांगण्यात आले. यावेळी व्हा. चेअरमन नितीन अंबुरे, संचालक श्रीकांत अंबुरे, संतोष हंचाटे, सुखदेव सग्गम, सुधिर सोनकवडे, वैशाली चिंचूरे, सुषमा हिबारे आदी उपस्थीत होते. संचालक राजकुमार हंचाटे यांनी आभार मानले.


# पर्यटन विकास आराखडा मंजुरीने उजाडली 'नवी पहाट'

## जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधींनीही घेतले मनावर

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

हरितक्रांती झालेल्या आपल्या सोलापूर जिल्ह्यात अनेक वर्षानंतर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याद्वारे उच्चाधिकार समितीकडून तब्बल २८२.७५ कोटीची मंजुरी मिळाल्याने नवविकासाची पहाट उजाडली आहे. दरम्यान, यासाठी गेल्या वर्षापासून जिल्हाधिकारी कुम ार आशीर्वाद व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना सोबत घेवून प्रयत्न करीत होते आणि आता या सर्वांच्या प्रयत्नांना यश आले असल्याने जिल्ह्यातील हजारो युवकांना आपल्या जिल्ह्यातच रोजगार निर्मिती होणार आहे.

या एकात्मिक विकास आराखड्यातून उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख, कृषी पर्यटन १९ कोटी ३० लाख, विनयार्ड पर्यटन ४८ कोटी २६ लाख, धार्मिक पर्यटन २५ कोटी असा एकूण २८२.७५ कोटीचा जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा बघता-बघता तयार झाला अन् जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीकडून मंजूरही करून आणला आहे.




पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेला हा आराखडा उच्चाधिकार समितीकडे पाठवण्यात आला होता. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी या विकास आराखड्याचे उच्चाधिकार समितीसमोर पीपीटीद्वारे जोरदार सादरीकरण केले. हा आराखडा मंजूर झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था वेगाने वाढण्यास मदत होईल. तसेच, येथून होणारे स्थलांतर रोखले जाईल यासाठी हा प्रकल्प खूप महत्त्वाचा असल्याचे समितीला जिल्हाधिकाऱ्यांनी पटवून दिले. यामुळे उच्च शिक्षणानंतर आता बऱ्याचशा युवकांना सोलापूर जिल्ह्यातच रोजगार मिळणार आहे. अनेक युवकांना उद्योग करण्याचीही संधी लाभणार आहे. यामुळे पुणे, मुंबई व इतर शहराकडे जात असलेले युवकांचे लोंढे काही प्रमाणात तरी थांबणार आहेत. टूर गाइड, हॉटेल आणि रिसॉर्ट कर्मचारी, अन्न आणि पेय सेवा कर्मचारी, ट्रॅव्हल एजंट, वाहतूक सेवा (बस, कार, टॅक्सी) सुविधा देणारे, विविध कार्यक्रमांचे नियोजन करणारे, मनोरंजनाचे कार्यक्रम करणारे कलाकार / लोक कलाकार, दुकानदार व किरकोळ वस्तू विक्रेते, संग्रहालय आणि वारसा साइट कर्मचारी, संवर्धन कामगार, ग्राहक सेवा प्रतिनिधी, बांधकाम व देखभाल दुरुस्ती कामगार, स्पा आणि वेलनेस कर्मचारी, स्वच्छता सेवा सुविधा देणारे कामगार यांचेसाठीही रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी आपल्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत.

### पर्यटनचा आता सूक्ष्म आराखडा करणार

एकाच ठिकाणी जल, कृषी व विनयार्ड, धार्मिक पर्यटनाचे अनोखे मिश्रण असल्याने सोलापूर जिल्ह्याकडे पर्यटक मोठ्या प्रम ाणात आकर्षित होतील. स्थानिक पातळीवर थेट रोजगार निर्मितीस तसेच स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळेल. मॅपिंगद्वारे सध्या ठोबळ आराखडा आराखडा तयार करण्यात आला असून, याचा सूक्ष्म आराखडा पुन्हा तयार करून या कामाला अंतिम स्वरूप आणणार आहोत आणि यानंतर लगेच कामाला आरंभ होईल.

**-शमा पवार,**
**पर्यटन उपसंचालक, पुणे विभाग**

### उजनी जलपर्यटन राहणार मुख्य आकर्षण

एकात्मिक पर्यटन सर्किटमध्ये उजनी धरणातील जल पर्यटन हे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण असेल. पर्यटकांना यासोबतच येथे धरणाच्या जलाशयाचा भाग, सभोवतालील निसर्गरम्य परिसर, जल क्रीडा उपक्रम, विविध देशी तसेच विदेशी पक्षी आदींचे नैसर्गिक सौंदर्य न्याहाळता येईल. पुढे सर्किट मध्ये परिसरातील कृषी पर्यटन केंद्रे, धार्मिक स्थळे, विनयार्ड पर्यटन, तलाव, किल्ले, वारसा स्थळे यांना भेटी देता येतील. पर्यटकांना साधारणतः आठवडाभर पर्यटन सर्किटमध्ये असलेल्या विविध स्थळांना (जल, धार्मिक, कृषी, नैसर्गिक विनयार्ड पर्यटन स्थळांना) भेटी देऊन पर्यटनाचा आस्वाद घेता येणार आहे.

### विनयार्ड, धार्मिक पर्यटनाला चालना

खुडूस ता. माळशिरस येथे विनयार्ड प्रकल्प उभारणे. पारंपारिक घरे, ट्री हाऊस, वैदिक घरे, साहसी उद्यान, लाकडी शैलीचे घरे, ग्लॅम्पिंग पॉड्स, रेस्टॉरंट, कॉंफरन्स, रूम आदींसह श्री कमलादेवी मंदिर- करमाळा, श्री सिद्धेश्वर मंदिर-सोलापूर, श्री शिवपार्वती मंदिर व शिवसृष्टी, अकलूज, श्री नागनाथ मंदिर, वडवळ, ता. मोहोळ आणि श्री सिद्धेश्वर मंदिर, माचणूर, ता. मंगळवेढा येथे खालील पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, माहिती फलक, स्वच्छतागृह व विश्रांतीगृह, बैठक व्यवस्था, निवारा शेड, पदपथ, पेव्हर ब्लॉक, कचराकूंडी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आदी प्रस्तावित करण्यात आले असल्याने विनयार्ड, धार्मिक पर्यटनाला नक्कीच चालना मिळणार आहे.

### शहरांसह ग्रामीण अर्थव्यवस्थाही सुधारेल

समूह पातळीवर शेती, शेतीपूरक व इतर व्यवसाय उभारणीसाठी मदत होईल. जिल्ह्यातील विशिष्ट उत्पादनांना उदा: मालदांडी ज्वारी, डाळिंब, सोलापुरी टेरी टॉवेल आणि चादर, शेंगदाणा चटणी, घोंगड्या, बेदाणे, रोस्टेड हुरडा, कडक भाकरी थेट बाजारपेठ उपलब्ध होईल. शहरी पर्यटकांशी ग्रामस्थांचा संपर्क आणि ग्रामीण जीवनशैली, लोककला, संस्कृती ई. प्रसार व संवर्धन होण्यासाठी सहाय्य होईल. जिल्ह्यात विनयार्ड पर्यटनास चालना मिळेल.

**-दिलीप पवार, जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर**

### जागतिक पर्यटनाच्या नकाशावर सोलापूर

जिल्ह्यातील उद्योजकांना पर्यटन क्षेत्रातील विविध संधी दर्शवतील व यासारखे उपक्रम एक व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रेरणा देतील. यामुळे जिल्ह्यात पुढील ८-१० वर्षात पर्यटन उद्योगात मोठी आर्थिक गुंतवणूक होऊन विकासाची प्रकिया वेग धरेल व एकंदरीत स्थानिक व जिल्ह्यावासियांचे जीवनमान उंचावेल.



## श्री समर्थ सद्गुरु नागनाथ अल्ली महाराज यांची पालखी मिरवणूक उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

श्री समर्थ सद्गुरु नागनाथ अल्ली महाराज यांच्या ७५व्या जयंतीनिमित्त भव्य पालखी मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. श्रीराम मंदिर शास्त्रीनगर येथून सकाळी दहा वाजता याची सुरवात झाली. प्रारंभी खासदार प्रणिती शिंदे यांनी पालखीचे पूजन केले. ही पालखी मिरवणूक अशोक पोलीस चौकी, पोलीस हेडक्वार्टर, दत्त नगर, बालाजी मंदिर, श्री मार्कंडेय रुग्णालय, भद्रावती पेठ, अक्कलकोट पाणी टाकी, गांधीनगर, गोंधळी वस्ती, सागर चौक, लक्ष्मी चौकमार्गे श्री समर्थ सद्गुरु नागनाथ अल्ली महाराज सत्संग भवन जुना विडी घरकुल येथे समाप्त झाली. पालखीचे व मूळ मूर्तीचे महाआरती झाल्यानंतर सर्व भक्तगणांना पादुका दर्शन व महाप्रसादची व्यवस्था केली होती. या कार्यक्रमास सुमारे तीन हजार भक्तगण मिरवणुकीत सहभागी होते. पालखी मिरवणूक प्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार नरसय्या आडम, माजी नगरसेवक विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळी पादुका पूजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विधानसभा निवडणुकीतील पराभवाचा वचपा काढा : खा. धनंजय महाडिक

### दक्षिण विधानसभा मतदारसंघाची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ ऑगस्ट-**

लोकसभा निवडणुकीत आलेले अपयश पदाधिकाऱ्यांनी विसरून जावे. आता दोन महिन्यात विधानसभा निवडणूक आहे. यासाठी पदाधिकाऱ्यांनी सज्ज रहावे, जनतेत मिसळून त्यांची कामे करावीत आणि लोकसभेतील पराभवाचा वचपा काढावा, असे प्रतिपादन दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे प्रभारी (प्रवासी नेता) खासदार धनंजय महाडिक यांनी केले.




आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक खा. महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली नेहरू नगर येथे पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती आमदार सुभाष देशमुख यांची होती. यावेळी व्यासपीठावर शहराध्यक्ष नरेंद्र काळे, हणमंत कुलकर्णी, राम जाधव, अर्जुन जाधव, आनंद बिराजदार आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी खा. धनंजय महाडिक यांनी विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली. तसेच आगामी निवडणुकीची रणनीती काय असेल, याबाबत मार्गदर्शन केले. राज्य सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ यासह अनेक हिताच्या योजना सुरू केल्या आहेत. त्याची माहिती तळागाळापर्यंत पोहचवावी. खास करून महिला पदाधिकाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचा जास्तीत जास्त प्रचार करावा. विरोधक खोटा प्रचार करत आहेत, हे जनतेला सांगावे. आगामी निवडणुकीत राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आणण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी आ. देशमुख म्हणाले, केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. त्याची माहिती जनतेला करून द्यावी. दक्षिण मतदारसंघातून जास्तीत जास्त मतदान कसे होईल याबाबत रणनिती आखावी. बुथ प्रमुख, पन्नाप्रमुखांनी याची जबाबदारी घ्यावी. सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास निश्चित पुन्हा राज्यात महायुतीचे सरकार येईल. यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी रामप्पा चिवडशेट्टी, जगन्नाथ गायकवाड, विशाल गायकवाड, शिवराज सरतापे आदी उपस्थित होते.

## उत्सव दहीहंडीचा....



सोलापूर : शहरातील कुंभार 'गोविंदा'च्या स्वागतासाठी व्यस्त आहेत. मटकी नक्षीकाम करताना भामाबाई कुंभार. (छायाचित्र : केवल तिवारी)

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा कलाशिक्षक संघ

### दैनिक 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने यांचे प्रतिपादन

### शासकीय रेखाकला परीक्षा व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघ हा नेहमी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन करणारा संघ आहे. विद्यार्थी व कला शिक्षकांच्या हिताचा विचार करून अडचणीवर मात करण्यासाठी आवाज उठवण्याचे काम देखील या संघामार्फत होत असते. सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघासोबत दैनिक तरुण भारत सदैव राहील, असे आश्वासन दैनिक 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी दिले.



सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघ आयोजित शासकीय रेखाकला परीक्षा (ग्रेड परीक्षा) व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संभाजीराव शिंदे डीएड, बीएड कॉलेजमध्ये रविवारी २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत शासकीय रेखाकला परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देण्यात आले.

सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विद्यानंद स्वामी, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते कला देवता नटराजाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नूतन शहर अध्यक्ष विद्यानंद स्वामी म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी झटणारा हा कला शिक्षक संघ एकमेव आहे. विद्यार्थ्यांना सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या ग्रेड परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर प्राध्यापक गोपाळराव लोंढे यांच्या चित्रकलेमुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेची वाढ होते.

विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन राज्य अध्यक्ष शेरशहा डोंगरी, जिल्हाअध्यक्ष शशिकांत सदाफुले, ज्ञानेश्वर कांबळे, विजयश्री बिराजदार, सिद्धाराम नालवार, आकाश नंदुर यांनी केले.

राज्य सहसचिव शांतप्पा काळे, मदगोंडा बिराजदार, संदिप पोतदार, नागनाथ गावडे, मोहन कांबळे, देशपांडे, सागर साळुंखे उपस्थित होते. सूत्रसंचालन संघटनेचे सचिव श्री संतोष धारेराव यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ. प्राचार्य विणा कणबसकर यांचे सहकार्य लाभले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नू.म.वि. शाळेत गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

नू.म.वि. शाळेत राज्यस्तरीय ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षा, टिळक विद्यापीठ, भारती विद्यापीठ आणि महाराष्ट्र ज्ञानपीठ परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देवून गौविण्यात आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जि.प.सोलापूरचे विस्तार अधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी होते. मीनाक्षी कुलकर्णी यांच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी पालकांमधून यादव यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार रोहिणी चौधरी यांनी केले तर यादी वाचन आळसंदे यांनी केले.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### पद्मशाली पुरोहित संघमच्या अध्यक्षपदी देविदास कुरापाटी

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**



अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघमचे अध्यक्षपदी पंडित देविदास कुरापाटी (पंतुलू) यांची एकमताने निवड करण्यात आली. अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघमचे अधिवेशन नुकतेच गाणगापूर येथे झाली. त्याप्रसंगी एका बैठकीमध्ये ही निवड करण्यात आली. यावेळी आस्थान गुरु डॉ. आमंची आजंनेय गुरुस्वामी, प्रभुलिंग स्वामी, डॉ. कटकम वेंकटराव, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष महेश कोठे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, सत्यनारायण मादास, रायेशम ताटीपामूल, भास्कर कोकुला, यांच्याउपस्थितीत निवड करण्यात आली. **इतर पदाधिकारी याप्रमाणे :** गौरव अध्यक्ष पं. वेणुगोपाल जिल्ला पंतुलू, अध्यक्ष पं.देविदास कुरापाटील, कार्याध्यक्ष श्रीदत्त नरसिंह स्वरूपानंद गिरी, उपाध्यक्ष राजेंद्र येमूल, अरविंद आकेन, मधुकर ताटीपामूल, प्रधान कार्यदर्शी चंद्रशेखर गाजूल, चंद्रशेखर सरगम, सहकार्यदर्शी- वेणुगोपाल मालपुरी, शंकरराव मिठ्ठापल्ली, कोषाधिकारी नागराज रासकोंडा. महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष मोहन वल्लाल, प्रांत उपाध्यक्ष विजय दासरी, प्रांत सेक्रेटरी संतोष चन्ना, सहसेक्रेटरी दत्तात्रय तलकोकूल, प्रांत कार्यदर्शी अशोक जन्नू, मुरली सिरसिल्ला, राज्य आध्यात्मिक संघम अध्यक्ष देविदास यंगलदास, सनातन हिंदु महिला संस्कृती मंचा राज्य प्रांत अध्यक्ष माधवी अंदे, अखिल भारत पद्मशाली वास्तु ज्योतिष संघम निरंजन कुडक्याल, अखिल भारत पद्मशाली यत्र विभाग अध्यक्ष आनंद तुम्मा.

### पाथरूड चौकातून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

पाथरूड चौक येथे सुशील टी हाऊस समोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीवाय.३७४५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी असिफ अब्दुल रजाक नाईकवाडी (वय-२४, रा.नवीन विडी घरकुल कुंभारी) याने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गंगावणे हे करीत आहेत.

### दुचाकीची पादचाऱ्याला धडक; अज्ञात इसमावर गुन्हा

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

पादचाऱ्याला ठोकर देऊन पलायन करणाऱ्या अनोळखी स्वाराविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २३ ऑगस्ट रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास होम मैदान येथे घडली. याप्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल सागर सरतापे (नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बेघर अनोळखी वयोवृद्ध इसम हा होम मैदान वरील सेल्फी पॉईंटच्या ठिकाणी पायी जात असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने चालवून त्या बेघर इसमास जोरात धडक देऊन डोक्यास गंभीर दुखापत करून अपघाताची खबर न देता व जखमी इसमास उपचाराकरिता रुग्णालयात दाखल न करता निघून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास मपोसई.व्हट्टे या करीत आहे.

### 'नेता-गीता' चित्रपटाचा ट्रेलर लाँच

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

कॉलेजमधलं राजकारणाचा मसाला आणि त्याला असलेला प्रेमाचा तडका नेता गीता या चित्रपटातून अनुभवायला मिळणार आहे.३० ऑगस्टला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला असून, पुरेपूर मनोरंजन करणारा हा चित्रपट असल्याचा अंदाज ट्रेलरवरून बांधता येतो. सिम्बारिया फिल्म्सतर्फे नेता गीता या चित्रपटाची प्रस्तुती करण्यात येत आहे. सुधांशु बुडूख यांनी चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन केलं आहे.चित्रपटात शिवानी बावकर,सुधांशु बुडूख, रोहित कोकाटे, अनिल नगरकर,विठ्ठल काळे, अजय तपकिरे,विराज अवचिते, सुहास जोशी आदी कलाकार या चित्रपटात आहेत. रोशन मारोडकर यांनी छायांकन, निरंजन पेडगावकर यांनी संगीत, सौमित्र धारासूरकर यांनी संकलन, तर संजीव हवालदार, धीरज भालेराव यांनी नृत्य दिग्दर्शनाची जबाबदारी निभावली आहे.

# साखर नियंत्रण कायद्यात ५८ वर्षांनी होणार बदल

## संभाव्य बदलांचा मसुदा प्रसिद्ध; सोलापूर जिल्ह्यात उसाचे क्षेत्र तबबल ६० हजार हेक्टरने घटले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ ऑगस्ट-**

साखरेच्या अनियंत्रित दरामुळे साखर उद्योगाला मागच्या काही वर्षात अनिश्चितता आली होती. यावर केंद्र सरकारकडून दिलासा देण्यासाठी साखर नियंत्रण कायद्यात बदल करणार असून संभाव्य बदलांचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यावर साखर उद्योगांकडून २३ सप्टेंबरपर्यंत हरकती मागवण्यात आल्या आहेत. यात साखरेचा दर ठरवणे, अन्य उपपदार्थांचा समावेश, खांडसरी उद्योगातील बदल, साखर पॅकिंग या संदर्भातील बदलांचा समावेश असणार आहे.



साखर उत्पादनातील अलीकडील तांत्रिक प्रगतीचा विचार करून हे बदल करण्यात येणार आहेत. त्यासाठी या मसुद्याच्या आधारे साखर नियंत्रण कायदा १९६६ मध्ये काही बदल सुचवण्यात आले आहेत. केंद्र सरकारने या संदर्भातील अधिसूचना जारी केली. 'मसुदा साखर (नियंत्रण) आदेश २०२४' या नावाने हा मसुदा प्रसिद्ध केला आहे. साखर (नियंत्रण) ऑर्डर साखर उद्योगाच्या विविध पैलूंवर लक्ष ठेवते, ज्यात साखरेचे उत्पादन, विक्री, पॅकेजिंग आणि साखरेचे आंतरराष्ट्रीय व्यापार, विक्रीसाठी कोटा सोडणे, साखरेची हालचाल आणि निर्यात-आयात, ऊस व साखर दर आदी बाबींचा समावेश आहे. नव्याने बदल करण्यात येणाऱ्या बाबींमध्ये साखरेचा दर ठरवताना काय होणार, पूर्वी उपपदार्थांत फक्त बगॅस आणि मोलॅसिस यांचा समावेश होता. आता नव्या मसुद्यात सहवीज प्रकल्प, इथेनॉल उत्पादनाचा समावेश होणार आहे.

साखर विक्रीचा दर ठरवणे, साखरेच्या पॅकिंगसाठी ज्युट बॅगेचा वापर करायचा का नाही याविषयी सूचना हरकती सरकारने मागवल्या आहेत. पूर्वी साखर विक्रीचे सर्वाधिक अधिकार केंद्र सरकारला होते. केंद्राच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने ठरवून दिलेल्या कोट्यानुसार साखर विक्रीचे निर्बंध होते.यातही आता बदल होणार असून ज्या बँकांनी किंवा वित्तीय संस्थांनी कारखान्यांना कर्ज दिले आणि ज्या संस्थांना रिझर्व्ह बँकेची मान्यता आहे, अशा वित्तीय संस्थांना तारण असलेली साखर दिलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी संबंधित संस्थांना विक्री करण्याची महत्त्वाची तरतुद नव्या मसुद्यात करण्यात आली आहे.

यंदाच्या गाळप हंगामासाठी सोलापूर जिल्ह्यात दीड लाख हेक्टर क्षेत्रातील ऊस गाळपासाठी उपलब्ध होण्याचा अंदाज असून गतवर्षीच्या तुलनेत यंदा जिल्ह्यातील ६० हजार हेक्टर उसाचे क्षेत्र घटले आहे. राज्यात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ऊस क्षेत्रात घट झाल्याचे दिसून येते. त्यामुळे येणाऱ्या गळीत हंगामात साखर कारखान्यांची ऊस गाळपासाठी कसोटी लागणार आहे.मागील वर्षी पाऊस कमी झाल्याने यंदाच्या उन्हाळ्यात उसासाठी पाण्याची मोठी कमतरता जाणवली. त्यामुळे उसाची म्हणावी तशी वाढ झाली नाही.त्यामुळे ऊस उत्पादनात मोठी घट होणार आहे. सोलापूर जिल्ह्यात मागच्या वर्षी २ लाख १० हजार ९७० हेक्टर उसाचे क्षेत्र होते, यंदा ते १ लाख ५० हजार ५८६ हेक्टरवर आले आहे. साधारण ६० हजार ३७१ हेक्टरने क्षेत्रात घट झाली आहे.

सोलापूर विभागात (सोलापूर व धाराशिव जिल्हे मिळून) सर्वाधिक एक लाख तीन हजार ४६५ हेक्टर उसाचे क्षेत्र घट झाली आहे. गतवर्षीचे राज्यातील हेक्टरी टनेज गृहीत धरले तर राज्यात या वर्षी १८३ लाख टन ऊस उत्पादन कमी होण्याचा अंदाज आहे. त्या टनेजनुसार सोलापूर जिल्ह्यात ४६ लाख टन, तर धाराशिव जिल्ह्यात ३३ लाख टन ऊस उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे.

### काही महत्त्वाचे बदल

- उपपदार्थात आता मोलॅसिस, बगॅसबरोबरच इथेनॉल आणि सहवीज प्रकल्पाचा समावेश
- यातून मिळणारे उत्पन्न कारखान्याचे उत्पन्न समजले जाणार
- साखरेचा हमीभाव त्यावर्षीची एफआरपी, सरासरी उत्पादन खर्च व उपपदार्थांपासून मिळणारे सरासरी उत्पन्न याचा विचार करून ठरणार
- साखरेच्या पॅकिंगसाठी सध्या एकूण वापराच्या दहा टक्के ज्युट बॅगेचा वापर होतो, त्याच्यात वाढ करण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे
- साखरेची वाहतूक किंवा विक्री करण्यास परवान्याशिवाय मनाई
- साखरेची खरेदी ज्या कारणांसाठी केली आहे, उदाहरणार्थ व्यावसायिक तर त्याचा वापर त्यासाठीच केला पाहिजे. त्याची माहिती राज्याच्या साखर संचालकांना देणे बंधनकारक

जुना आदेश व नवीन सुधारित आदेश यांतील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास करून याबाबत केंद्र शासनाकडे एकूणच साखर उद्योगाचे दृष्टीने ज्या काही सूचना असतील त्या सांघिकदृष्ट्या विचार मंथन करून कळविणे योग्य होईल.

**-पी. जी. मेढे,**
**साखर उद्योग अभ्यासक**

# फेरीवाला धोरण अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडू



### फेरीवाल्यांचा मेळाव्यात आडम मास्तरांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

सरकारच्या नविन औद्योगिक धोरणामुळे शहरातील सर्व सूत गिरण्या व कापड गिरण्या बंद पडल्या. त्यामुळे प्रचंड बेरोजगारी वाढली, बेरोजगार कामगार आपले उदरनिर्वाह करण्याकरीता भाजीपाला व फळ-फळावळ इतर साहित्य स्टेशनरी विक्री चार चाकी हातगाडी फेरीने व्यवसाय व रस्त्याच्या कडेला बसून साहित्य विक्री करणे व फूटपाथ वर खोके घालून खोक्यामध्ये व्यवसाय करीत आहे. खोकेधारक व फेरीवाल्यांच्या सरंक्षणासाठी फेरीवाले व खोकेधारकांच्या आर्थिक व सामाजिक स्थैर्य देण्यासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडू, असा निर्धार ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी केले.

रविवार, दि. २५ ऑगस्ट रोजी दत्त नगर येथे सर्व खोके धारक, फेरीवाले चार चाकिवाले, फळ भाजी विक्रेते, व लहान व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचा मेळावा सिटूचे राज्य सचिव युसुफ शेख मेजर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी महापालिकेकडून ५० हजार हफ्ता परतफेड केल्यानंतर एक लाख रुपये कर्ज मंजूर करणे. फेरीवाला परवाना फी ५ हजार रुपये असून ती कमीत कमी पाजचशे रुपये झाली पाहिजे. फेरीवाला हॉकर्स झोन निश्चित होत नाही. तोपर्यंत अतिक्रमण कार्यवाही थांबविण्यात यावी. या मागण्या धसास लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी सिटूचे राज्य महासचिव ॲड. एम.एच.शेख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर ॲड. एम. एच. शेख, युसुफ मेजर, खाजाभाई शेख, जावेद सागरी, म.हनीफ सातखेड, सलीम नमाजी, इसबार खान पठान, अनवर रंगरेज, इरफान शेख, वुडन बागवान, इमाम दर्जी, रामबाबू माने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेश दुगाणे, दाऊद शेख, इस्माइल भगवान, मजीद बागवान, अखिल शेख, आसिफ पठाण, दीपक निकंबे, शाम आडम, शहाबुद्दीन शेख, अमोल काशिद, बजरंग गायकवाड, अबूहुरैरा शेख,मुन्ना कलबुर्गी अमीन शेख, फिरोज शेख, हरीश पावर, सिद्राम गायकवाड, राजेश काशिद, रफीक काजी, नितिन गुंजे, नितिन कोडकर, शांत चौगुले, रहीम नदाफ, सुजीत जादव, गंगाराम निंबड़ाकर, अमीन शेख, अरबाज सगरी, जुबेर सागरी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार खाजाभाई शेख यांनी मानले.

### सनातन हिंदू संस्कृती मंचच्या प्रांत अध्यक्षपदी माधवी अंदे

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**



अखिल भारतीय सनातन हिंदु महिला संस्कृती मंचच्या महाराष्ट्र प्रांत अध्यक्षपदी माधवी अंदे यांची नुकतीच निवड करण्यात आली. अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघमचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच पार पडले. त्याप्रसंगी एका बैठकीमध्ये ही निवड करण्यात आली. यावेळी साध्वी कमलेश भारती, पं. वेणुगोपाल जिल्ला (पंतुलु), ज्योती वाघमारे, आमंची आंजनेय्या गुरुस्वामी, मालती व्यास, सरोजनी जाधव, शैलजा जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली. **इतर पदाधिकारी याप्रमाणे :** सरचिटणीस वनिता येमुल (पुणे), सहचिटणीस पल्लवी येदूर, उपाध्यक्षा विणा कंदीकटला, सदस्य म्हणून कविता साळुंके, सत्यक्का रव्वा, अश्विनी महाले, पद्मावती श्रीमल, मिनाक्षी चव्हाण, विजयालक्ष्मी चव्हाण, वीणा कंदीकटला, प्रभावती म्याकल, सुरेखा दंडी, रुपा गुर्रम, श्वेता मंचाल, सरोजा चिंता, मनिषा लोमटे, रजनी जिल्ला, ममता रासकोंडा, सावित्रा पल्लाटी, सपना चव्हाण.

# महापालिका शिकाऊ उमेदवारांच्या ४० जागा भरणार

## अर्ज करण्यासाठी आज शेवटची तारीख

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या अंतर्गत शिकाऊ उमेदवार/ अप्रेंटिस पदांच्या रिक्त असलेल्या एकूण ४० जागा भरण्यास सुरुवात झाली आहे. विविध पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे.

विविध पदांवर अप्रेंटीस पदावर काम करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २६ ऑगस्ट २०२४ आहे. विविध पदभरतीसाठी लागणारी शैक्षणिक पात्रता, परीक्षा शुल्क, वयोमर्यादा, मिळणारी वेतनश्रेणी इत्यादी बाबींची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उमेदवारांनी अर्ज करण्याआधी खाली दिलेली भरतीची माहिती व भरतीची अधिकृत जाहिरात काळजीपूर्वक वाचावी आणि अर्ज करावा , असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. इच्छुकांनी महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ solapurcorporation.gov.in वर जाऊन माहिती घेऊन अर्ज करायचा आहे.

### ही आहे शैक्षणिक पात्रता

**पदाचे नाव** - शिकाऊ उमेदवार/ अप्रेंटिस,
**पदसंख्या** - ४० जागा,
**शैक्षणिक पात्रता** - १० वी, १२वी तसेच संबंधित ट्रेडमध्ये आयटीआय पास ,
**वयोमर्यादा** - किमान १८ ते कमाल ३० वर्षे,
**वेतन श्रेणी** - ११७०० /- ते १०४०० प्रति महिना
**अर्ज पद्धती** - ऑनलाईन
**अर्ज करण्याची शेवटची तारीख** - २६ ऑगस्ट २०२४

# अघोरी नृत्य अन् 'गारुडी गोंबे' ने आणली रंगत

### अतिरुद्र स्वाहाकारानिमित्त शोभायात्रा उत्साहात : हजारो भाविकांचा सहभाग





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर , दि. २५ ऑगस्ट-**

हलगीच्या तालावर नाचणारे घोडे, दिल्लीहून आलेल्या अघोरी नृत्य पथकाचे सादरीकरण अन् विजयपूर येथील कर्नाटकी 'गारुडी गोंबे' ने रंगत आणली. निमित्त होते श्रीश्रीश्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्ट आयोजित अतिरुद्र स्वाहाकारानिमित्त निघालेल्या शोभायात्रेचे.

श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजींच्या समाधी सुवर्ण महोत्सवानिमित्त विमानतळा पाठीमागे असलेल्या कस्तुरबा नगरातील श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात सोमवार २६ ऑगस्ट ते रविवार १ सप्टेंबर दरम्यान अतिरूद्र स्वाहाकार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त रविवारी सायंकाळी शोभायात्रा काढण्यात आली. बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिरात मठाचे संस्थापक प. पू. सद्गुरु श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी आणि मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्या हस्ते पूजन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. प्रारंभी शोभायात्रेत ठेवण्यात आलेल्या भगवान श्री शंकरांच्या मूर्तीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शोभायात्रेच्या अग्रभागी दिल्ली येथून आलेले महाकाल अघोरी नृत्य सादरीकरण पथक होते. यावेळी आगीची थरारक प्रात्यक्षिके सादर केली.

फुलांच्या माळांनी सजवलेल्या पालखीमध्ये श्रीसिद्धारूढ महास्वामीजी आणि श्री बसवारूढ महास्वामीजी यांच्या प्रतिमा ठेवल्या होत्या. तर सजवलेल्या बग्गीत मठाचे संस्थापक प. पू. सद्गुरु श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी आणि मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी आणि प. पू. श्रो. ब्र. श्री जडेसिध्देश्वर महास्वामीजी बसले होते. तर दुसऱ्या बग्गीत सिद्धरूढ मठाच्या प. पू. श्रो. ब्र. श्री. सुशांता देवी होत्या. शोभायात्रेत ठेवण्यात आलेली भगवान शंकरांची सहा फुटी मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. विजयपूर येथील कर्नाटकी 'गारुडी गोंबे' चे सादरीकरण शोभायात्रेचे वैशिष्ट्य ठरले. यावेळी सोलापूरकरांनी या नृत्याची छबी आपल्या भ्रमणध्वनीमध्ये कैद केली. तसेच अनेक जणांनी या बाहुल्यांसोबत सेल्फी घेतली. होटगी येथील ११ हलगी अन् तुतारीच्या पथकाने वातावरणात जोश भरला. मिरवणूक मार्गावर भाविकांनी फटाक्यांची आतिषबाजी करुन शोभायात्रेचे स्वागत केले.

श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून सुरुवात झालेली शोभायात्रा श्री कसबा गणपती, टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौकमार्गे श्री आजोबा गणपती मंदिराजवळ आली. येथे पूजन करुन मिरवणूक श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाकडे मार्गस्थ झाली.

या शोभायात्रेत ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेचे मुख्य मानकरी राजशेखर हिरेहब्बू, मनोज हिरेहब्बू, माजी महापौर शोभा बनशेट्टी, अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुदीप चाकोते, ट्रस्टचे विश्वस्त सतीश कुलकर्णी, लिंगायत असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष ॲड. संतोष होसमनी आदी सहभागी झाले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८६८

**तुका म्हणे वाचा वाहिली अनंता ।**
**बोलायचे आतां काम नाहीं ।।**

वाचा ही मानवाला मिळालेली फार मोठी नैसर्गिक देणगी आहे. या देणगीच्या आधारेच माणूस एकमेकांशी विचाराचे, भावनांचे आदान-प्रदान करतो. विचाराच्या, भावनांच्या आदान-प्रदानासाठी मिळालेल्या या वाचेचा उपयोग माणूस समोरच्यांच्या भावनांना, हृदयांना जोडण्याऐवजी कधी-कधी समोरच्यांच्या भावनांचे, हृदयाचे तुकडे करण्यासाठी करतो. ईर्षा, द्वेष, अहंकार, मत्सर फोफावला म्हणजे ही वाचा शस्त्रांच्या घावापेक्षाही भयानक घाव करून जाते. शस्त्राच्या जखमा कालांतराने बुझू तरी शकतात, पण शाब्दिक जखमा म्हणजेच मनावरील जखमा कधीही बुझत नाहीत. मी कोणीतरी विशेष आहे, असे मानत गेल्याने माणूस ईर्षा, मोह, काम, क्रोध, अहंकार, मत्सर आदीमध्ये अडकतो आणि नैसर्गिक देण असलेली ही वाचा शस्त्राचे रुप धारण करते. आम्ही स्वत:ला खऱ्या अर्थाने ओळखले असल्याने आता आमच्याकडे ईर्षा, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार यांपैकी कांहीही शिल्लक राहिले नाही. त्यामुळे आम्हाला चोहीकडे समत्व जाणवत आहे. सर्व जीव एका ईश्वराचेच अंश असल्याचे जाणवत असल्याने आमची वाचा समत्व, बंधुत्व, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्य जोपासणाऱ्या अनंताच्या चरणी एकरूप झाली आहे. त्यामुळे मानवतेशिवाय आमची वाचा कांहीच बोलत नाही. खरे म्हणजे आमचे वर्तनच समत्व झाल्याने आम च्या वाचेला आता बोलण्याचे कामच राहिले नाही. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे वाचा वाहिली अनंता ।**
**बोलायचे आतां काम नाही ।।**

संसारात अडकलेल्या जीवाची वाचा न बोलता थांबणे अत्यंत कठीण असते. कारण मीपणा दाखविण्याचे वाचा हे एक अत्यंत महत्वपूर्ण माध्यम आहे. या माध्यमाचा माणूस पुरेपुर उपयोग करून घेत असतो. इतरवेळी तर सोडाच पण जेव्हा पूजा पाठ चालला आहे किंवा भगवंताचे नामस्मरण चालले आहे, तेव्हा सुध्दा बऱ्याचवेळा माणूस ही वाचा शिव्या देण्याकडे, चिडचिड करण्याकडे वळवतो. सून बोलली तर फार तोंड सुटले का? आणि नाही बोलली तर तोंडात माती गेली का? असे काही सासूची वाचा बोलते. अर्थात, सासू-सूनेचे किंवा मीपणाचे असे नाते काही वरिष्ठ-कनिष्ठात, मालक-नोकरात, गरीब-श्रीमंतात चालू असते. आपण कांही तरी आहोत हे दाखविण्यासाठी अनेकांची वाचा नकारात्मक भूमिका बजावत असते. व्यर्थ बडबड करण्याने किंवा इतरांची टिंगल-टवाळी करण्याने किंवा स्वत:चे मोठेपण सांगत फिरण्याने आपण इतरांच्या नजरेतून उतरत आहोत, हे जोपर्यंत लक्षात येत नाही, तोपर्यत ही वाचा तिचे असे कार्य चालूच ठेवेल. ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांची वाचा नियंत्रित असते. तरीही ज्यांची वाचा बेलगाम आहे, असे लोक ज्ञानोबा- तुकाराम महाराजांच्या साहित्याकडे वळले तर त्यांच्या बेलगाम वाचेला नियंत्रणात ठेवण्यासाठी वेगळे शिकवावे लागेल असे वाटत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : सोमवार** | **सूर्यास्त - १८.५६** |
| **दि. २६ ऑगस्ट २०२४** | **दिनविशेष - कालाष्टमी श्रीकृष्ण जन्माष्टमी** |
| **विक्रम संवत् २०८०,** | **....राहू काल....** |
| **शके - १९४६** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **मास - श्रावण** | **मंगळवार : दु. ३ ते ४.३०** |
| **कृ. अष्टमी (२६.१९)** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **ऋतु - शरद** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **नक्षत्र- कृत्तिका (१५.५४)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **योग - व्याघात (२२.१६)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **करण - बालव (१४.५५)** | |
| **सुर्योदय - ०६.२५** | |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने सम ाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षम ता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन काम ाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विराधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मि ळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# 'लाडक्या बहिणी'ला आधार सिडिंगची अडचण

## बॅंकखाते सिडिंग नसल्याने खात्यावर जमा होईना निधी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लागू झाली. खरी परंतु अनेक महिलांना आधार अपडेटनंतर आता आधार सिडींगचे ग्रहण लागले आहे. लाभार्थी महिलांचे आधारकार्ड बँक खात्याशी सिडींग नसल्याने अनेक महिलांना वेळेवर निधी जमा होत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

अंगणवाडी सेविकांना सदर योजनेचे अर्ज भरून घेण्याचे कामकाज देण्यात आले. सेविकांनी सर्व अर्ज विहित नमुन्यात आणि वेळेत नारीशक्ती दूत ॲपद्वारे महिलांची नोंदणी केली. त्यानंतर नवीन वेबसाईट सुरू करून त्याद्वारे अर्ज ऑनलाईन अपलोड केला गेला. अर्जातील त्रुटी आढळल्यानंतर त्यांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मेसेज पाठविण्यात आले. पुन्हा एकदा त्रुटींची पडताळणी करून सदरचे अर्ज अप्रूव्हल करून शासनाद्वारे निधी बॅंक खात्यात वर्ग झाले. मात्र यामध्ये ज्या महिलांचे आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न म्हणजेच सिडिंग आहे. त्यांनाच निधी उपलब्ध झाला. मात्र ज्या लाभार्थी महिलांचे आधारकार्ड सिडींग नाही अशांना निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे आता लाभार्थी महिला खडबडून जाग्या झाल्या आहेत. लागलीच त्यांनी आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न म्हणजेच सिडींग करण्यासाठी बँकेत दाखल होत आधारकार्ड सिडींग फॉर्म भरण्यासाठी गर्दी करत आहेत. ज्या लाभार्थी महिलांचे आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न म्हणजेच सिडींग झाली नाही. त्यांना अद्याप निधीसाठी वाट पाहावी लागणार आहे.

### आधार कार्ड सिडिंगनंतर मिळणार आर्थिक लाभ

लाडकी बहिण योजना अंतर्गत महिलांना सक्षमीकरणासाठी आणि सबलीकरणासाठी दर महिन्याला दीड हजार रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. राज्य शासनाने या महत्वाकांक्षी योजनेपासून असंख्य महिलांना बँक खात्याशी संलग्न केले आहे. तर उर्वरित महिलांना देखील बँक खात्याच्या प्रवाहात आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यामुळे अनेक महिलांना आर्थिक लाभ मिळणार आहे.

### आधार सीडिंग आवश्यक

ज्या महिलांचे अर्ज दाखल करण्यात आले आहेत. परंतु आधार सिडिंग नसल्याने त्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले नाहीत. त्यांनी आपल्या मूळ कागदपत्रांसह बँकेत जाऊन आधार कार्ड खात्याशी संलग्न म्हणजेच सीडींग करून घ्यावे त्यानंतर निधी खात्यात वर्ग होईल.

**- अंगणवाडी सेविका**

### बँकेत आधारकार्ड सिडिंगसाठी गर्दी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना अंतर्गत महिलांना निधी वितरीत करण्यात येत आहे. आम्हाला निधी उपलब्ध झाला नाही. आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न म्हणजेच सिडिंग नसल्याचा मेसेज आला. त्यामुळे सिडिंगचा अर्ज भरण्यासाठी बँकेत आले. पण बँकेत महिला मोठी गर्दी करत आहेत.

**- शांताबाई काळे, लाभार्थी महिला**

# शहरातील अल्पसंख्यांक शाळांची पडताळणी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

शालेय शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील १४७ अल्पसंख्यांक शाळांची पडताळणी सुरू झाली आहे.

अल्पसंख्यांक शाळांमधील विद्यार्थ्यांबाबत यापूर्वी तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार पट पडताळणी करण्यात आली होती. आता शालेय शिक्षण विभागाने अल्पसंख्याक संस्थांची सर्वच माहिती मागवली आहे. अल्पसंख्यांक संस्थांच्या सुरू असलेल्या शाळांबाबत डॉक्युमेंट फॉरमॅटमधून कागदपत्राची पडताळणी करून अहवाल पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात १४७ अल्पसंख्यांक संस्था आहेत. इतक्या संस्था असल्या तरी त्यांच्या शाळांच्या शाखा बऱ्याच आहेत.

धार्मिक व भाषिक या दर्जावर या संस्थांना अल्पसंख्यांक असा दर्जा मिळाला आहे. सन २००७ नंतर अल्पसंख्यांक दर्जा मिळालेल्या शाळांची पडताळणी करण्यात येत आहे. त्या शाळांच्या संस्थांची कमिटी अस्तित्वात आहे काय? विद्यार्थी संख्या किती आहे? असे दहा मुद्दे विचारात घेण्यात आले आहेत. बोगस संस्था काढून अनुदान लाटण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. तसेच विद्यार्थी संख्या कमी असतानाही कर्मचारी संख्या अधिक दाखवण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या सूचनेनुसार ही पडताळणी करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शाळांची पडताळणी सुरू करण्यात आली आहे अशी माहिती योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांनी दिली. यासाठी संबंधित शाळांचा कॅम्प घेऊन कोणती माहिती सादर करावयाची याचे सर्व मुद्दे मुख्याध्यापकांना पटवून सांगण्यात आले आहेत. त्यानुसार शाळांचे प्रस्ताव येत आहेत.

# श्री भगवती गौरीमाता प्रशालेत दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहिहंडी कार्यक्रम उत्साहात पार पडले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गिरमल बुगडे होते. प्रथम धोत्री गावचे सरपंच वैशाली पाटील यांच्या हस्ते दहिहंडीचे पूजन करण्यात आले. यावेळी शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य विठ्ठल रामपुरे, पोलिस पाटील श्रीमंत बिराजदार, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा श्रीदेवी सावंत्रे, सखी सावित्री समितीच्या सदस्या भाग्यश्री मठ, ललीता मठपती, पर्यवेक्षक सचिन देगांवकर आदी उपस्थित होते. श्रीकृष्णाच्या वेशभूषेतील नागराज बिराजदार तर राधेच्या वेशभूषेतील आरोही तंबाके हे विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. सहशिक्षक राजशेखर व्हनकडे यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहिहंडीचे महत्त्व समजावून सांगितले. ज्येष्ठ शिक्षक मल्लेशा व्हनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली दहिहंडी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. दहीहंडीच्या कार्यक्रमात महादेव पथक, नागनाथ महाराज पथक, भैरवनाथ पथक, प्रभुलिंग पथकाने सहभाग घेतला. या गोविंदा पथकातील विद्यार्थ्यांनी दहिहंडीचे थर बनविले. यावेळी श्रीकृष्णांवर आधारित विविध दहिहंडीचे गीत सादर करण्यात आले. शेवटी भैरवनाथ पथकाने दहिहंडी फोडली. सहशिक्षक मल्लिकार्जुन गुरव यांनी आभार मानले.

# आस्था संस्थेच्या वतीने फराळ वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

श्रावणमासानिम्मित ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगाचे दर्शन घेण्यासाठी रविवारी पदयात्रेचे आयोजन ६८ लिंग भक्त मंडळ आणि वीरशैव व्हिजन यांच्या वतीने करण्यात आले होते. ही पदयात्रा शिवानूभव मंगल कार्यालय या ठिकाणी आल्यानंतर या पदयात्रेतील पायी जाणाऱ्या ५०० भक्तांना आस्था सामाजिक संस्था व दिपक निकाळजे सामाजिक संघटनेच्या वतीने फराळाचे वाटप केले.



यावेळी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, समाजसेवक बसवराज सावळगी, सचिव शिवानंद सावळगी, सल्लागार हर्षल कोठारी उपाध्यक्ष चंद्रकांत शहा,सहसचिव सिद्धू बेऊर, योगेश कुंदुर, अनिल जमगे, डॉ महावीर शास्त्री, सोम नाथ कोळेकर, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे , पिंटू कस्तुरे, विनायक घंटे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

या भक्तांना शाबुदना, केळी,वेपर्स, शाबू चिवडा,शेंगा लाडू,दहीचटणी, चहा, पाण्याचे बोटल याचा समावेश होता भक्तांनी या प्रसादाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमासठी विशेष सहकार्य श्रीशेल बनशेट्टी, माजी महापौर शोभाताई बनशेट्टी यांनी मंगल कार्यालय देऊन सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेंदात तालिकोटी, सुरज छंचुरे, उदय छंचुरे, प्रमोद छंचुरे, महेश नागणसुरे प्रभमेश गावडे यांनी परिश्रम घेतले.

# दुष्काळी अनुदान न मिळालेल्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

दुष्काळी अनुदान न मिळालेल्या शेतकरी बांधवांनी तत्काळ ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा कुंभार यांनी दिली.

त्यामध्ये बार्शी, माढा, करम ाळा, सांगोला आणि माळशिरस या तालुक्यांचा समावेश आहे. ई केवायसी अभावी अनुदान पेंडिंग राहिलेल्यांमध्ये बार्शी तालुक्यातील २६०५३ बाधित शेतकरी आहेत. तर करमाळा तालुक्यातील ५११ बाधित शेतकरी, माढा तालुक्यातील ९३७, माळशिरस तालुक्यातील ३००५ बाधित शेतकरी तर सांगोला तालुक्यातील १०५३ इतके बाधित शेतकरी आहेत. वरील तालुक्यातील ३२५५९ इतक्या खातेदारांना त्यांची बँक व आधारकार्ड संलग्न नसलेमुळे, सामाईक खातेदारांची कोणच्या खातेवर रक्कम जमा करावी याबाबतची संमतीपत्र दिले नसल्याने, मयत खातेदारांची वारस नोंद झाली नसल्याने तसेच परगावीच्या खातेदारांचे बँक तपशील, आधारकार्ड तपशील इ. उपलब्ध न झाल्याने अनुदान वाटप करणे प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी उपरोक्त नमूद कारणामुळे अनुदान न मिळालेल्या खातेदारांना कागदपत्रांची पुर्तता करणे बाबत संबंधित तलाठी कार्यालय अथवा तहसिल कार्यालय यांचेकडे संपर्क करण्याचे आवाहन केले.

# कुमठ्यात त्यागी भवनचा लोकार्पण सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट-**

कुमठे येथील अतिशय क्षेत्र १०८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्या वतीने आयोजित केलेल्या चंद्रप्रभू भगवानच्या त्यागी भवनाचे लोकार्पण सोहळा मोठ्या मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला माजी आमदार दिलीपराव माने यांच्या हस्ते तर उद्योगपती इंदरमल जैन, सैतवाल संघाचे अध्यक्ष प्रदीप पांढरे, माजी नगरसेवक जयकुमार माने, त्यागी भवन बांधकामाचे दातार सुजाता धवल शहा, मिथुन धवल शहा, श्रद्धा मिथुन शहा, मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील, शिनगारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यागी भवन लोकर्पण सोहळाच्या कोणाशिलाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांचे सत्कार कुमठे येथील जैन समाजातील जेष्ठ महानुभव अशोक पाटील, अनिल पाटील, अमोल पाटील, चंद्रकांत कासार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी हुकूमचंद हेसे, महावीर दुरुगकर, बाबुराव तगा, अरुण धुमाळ, मनीष शहा, नंदकुमार कंगळे, नेमचंद आगरे, अभिनंदन विभूते, राजेंद्र पाटील आदींचे उपस्थिती होती. प्रास्ताविक अध्यक्ष श्याम पाटील यांनी केले. वरील बांधकामासाठी अशोक पाटील यांनी दहा हजार वीट देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमासाठी वालचंद पाटील, नितीन कासार, अमोल पाटील, शितल कासार म नोहर कासार प्रथमेश कासार, देवेंद्र कासार, चंद्रकांत कासार, संजय पानपट, महावीर पानपट, पंडित अक्षय शहा, विक्रांत पाटील, वैभव पाटील, आनंद पाटील, सागर पाटील, सचिन पाटील, ओम पाटील, यश पाटील, अजित पाटील यांनी परिश्रम घेतले. आभार वालचंद पाटील यांनी मानले.

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने मंगळवारी महिला दहीहंडी

**सोलापूर, दि. २५ ऑगस्ट -**

सालाबाद प्रमाणे यंदाही वर्षी संभाजी ब्रिगेडच्या वतीने गोपाळकाला निमित्त दि. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता हॉटेल वैष्णवी प्रांगण डी मार्ट चौक, जुळे सोलापूर येथे महिला दहीहंडीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम यांनी दिली आहे. जुळे सोलापूर भागातील महिला दहीहंडीमध्ये महिलांच्या तीन थरांची दहीहंडी असते दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने ट्रॉफी चे बक्षीस दिले जाते. यंदा हे दहावे वर्ष आहे. दहीहंडीमध्ये जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महिला शहराध्यक्ष मोनाली धुमाळ यांनी केले आहे.

# बेरोजगारी विरोधात तरुणांचा आक्रोश; लाडक्या भावाची फसवी योजना नको



## रोजगार भत्ता देण्याची केली मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ ऑगस्ट -**

महाराष्ट्रातल्या सुशिक्षित तरुणांच्या भावनांशी खेळणाऱ्या कुचकामी सरकार लाडक्या भावाची फसवी योजना घोषित करून लाभापासून वंचित ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. यानंतर राज्यातील पदभरती मध्ये आदिवासी १७ संवर्ग पेसा भरती तत्काळ करतांना कायम स्वरूपी करावी या मागणीसाठी नाशिक येथे राज्यभरातील १३ जिल्हयातील पेसा क्षेत्रातील मुल, मुली (दि.१ऑगस्ट) पासून बेमुदत उपोषणास बसले आहेत.

त्यांच्या उपोषणाचा २३ वा दिवस असुन शासन दरबारी याची कोणतीही दखल घेतली जात नसल्याने व आंदोलन कर्ते जो पर्यंत या भरती बाबत ठोस निर्णय होत नाही तो पर्यंत बेमुदत उपोषण आंदोलन सुरूच ठेवणार आहेत असा इशारा युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी यावेळी दिले. यावेळी युवा महासंघाचे अकिल शेख, इलियास सिद्दीकी, सुनील आमाटी,बजरंग गायकवाड, नरेश गुल्लापल्ली, असिफ पठाण, प्रदीप मरेड्डी, रफिक काझी,राहुल बुगले, चंद्रकांत मंजुळकर,बालाजी गुंडे,अरुण सामल,विजय मरेड्डी, युसूफ शेख आदी उपस्थित होते.

### नोकरी भरती थांबवली

महाराष्ट्रात या आधी राज्य सरकारच्या अंतर्गत २५ लाख कर्मचारी काम करीत होते. मात्र १९९० पासून अघोषित नोकरभरती बंदीमुळे ही संख्या १७ लाखावर आणली आहे. राज्य सरकारच्या विविध खात्यांमध्ये ३० टक्के हून अधिक पदे रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ४० टक्के न भरलेली पदे रिक्त आहेत. २०१६-१७ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार जाहीर केलेल्या रिक्त जागा ३ लाखांहून अधिक आहेत. मागील २५-३० वर्षांपासून सरकारने नोकरभरती थांबवली आहे. जी काही नोकरभरती केली जात आहे ती अत्यंत त्रोटक आहे. हे चित्र अत्यंत चीड निर्माण करणारी आहे.

**- ॲड. अनिल वासम,**
**केंद्रीय समिती सदस्य, युवा महासंघ**

### डीवायएफआयच्या मागण्या

- सरकारी नोकरभरती वरील बंदी उठवा!
- पद कपात करणे थांबवा!
- कायमस्वरूपी रोजगार द्या!
- सर्व बेरोजगारांना रु.५०००/- दर महिना बेरोजगारी भत्ता द्या!
- सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण बंद करा !
- आदिवासीबहुल भागांत सार्वजनिक उद्योग सुरु करा !
- अनुसुचित क्षेत्रातील पेसा १७ संवर्गाची कायम स्वरुपी पदभरती तात्काळ करण्यात यावी.
- सार्वजनिक क्षेत्रात घेण्यात आलेल्या तात्पुरत्या आणि कंत्राटी कामगारांना कायम करा!
- 'मौलाना आझाद' स्वयंरोजगार योजनेची योग्य अंमलबजावणी करा!
- एक सारख्या कामासाठी असलेली सर्व पातळ्यां वरील दुहेरी वेतन पद्धती त्वरित नष्ट करा!
- नोकर भरती केंद्रांची पुनर्रचना व आधुनिकीकरण करा!

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## बलिदान चौक गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी महांतेश हिरेमठ

**मंद्रुप, दि. २५ ऑगस्ट-**

सोलापूर येथील बलिदान चौक तरुण मंडळ दादा गणपतीच्या अध्यक्षपदी महांतेश हिरेमठ यांची तर उपाध्यक्षपदी संकेत मानवी व अमोल शिंदे यांची निवड करण्यात आली.





मंडळाचे मार्गदर्शक गिरीश अक्कलकोटे, अशोक चडचणकर, अरुण लातुरे, संतोष काटगावकर, रतन नरवडे यांच्या उपस्थितीत नूतन पदाधिकारी निवड करण्यात आली. या मंडळाचे ७७ वे वर्ष असून रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य शिबीर, तुळजापूरला पायी चालत जाणाऱ्या भक्तांसाठी चहा, बिस्कीट व अल्पोपहार वाटप कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावेळी मनोज मलकुनाईक, महेश द्यामा, मुन्ना ओझा, संजय लातुरे, संजय मुनाळे, रोहन लातुरे, अभिषेक स्वामी, सोमा स्वामी, महेश अक्कलकोटे, रवींद्र होनराव आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### अक्कलकोट विधानसभा रासपा लढविणार : तालुकाध्यक्ष माडकर

**अक्कलकोट, दि. २५ ऑगस्ट-**

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांच्या आदेशानुसार अक्कलकोट विधानसभा निवडणूक राष्ट्रीय समाज पक्ष लढवणार असल्याची माहिती अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी पत्रकार परीषदेत दिली. यावेळी सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गुत्तेदार, अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे अध्यक्ष दाजी कोळेकर, अक्कलकोट शहर युवक आघाडीचे अध्यक्ष निलेश लवटे, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष महादेव पुजारी, विलास पाटील, तालुका संघटक शिवयोगी पुजारी, तालुका युवक आघाडीचे उपाध्यक्ष संतोष शिंदे, अल्पसंख्याक आघाडीचे उपाध्यक्ष सद्दाम तासेवाले, सलगर जिल्हा परिषद गट प्रमुख रेवणसिध्द शेरी, चप्पळगाव पंचायत समिती गण प्रमुख विठोबा कोळेकर, वाहतूक आघाडीचे उपाध्यक्ष बिरप्पा मैंदर्गी, पुंडलिक पुजारी, रवी पुजारी आदी उपस्थित होते.

### अक्कलकोट शहर तालुक्यात दामिनी पथक नेमण्याची गरज

**अक्कलकोट, दि. २५ ऑगस्ट-**

सध्या राज्यासह देशभरात महिलांसह बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली असून यामुळे पालक वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शालेय विद्यार्थिनी व महिला वर्गात सुरक्षितेची भावना निर्माण होण्यासाठी अक्कलकोट दक्षिण आणि उत्तर पोलीस ठाण्याचे अंतर्गत दामिनी पथक नेमण्याची मागणी नागरिकांसह पालक वर्गातून केली जात आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे व दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळा विद्यालय महाविद्यालयाच्या परिसरात दामिनी पथकाची गस्त असणे गरजेचे आहे. राज्यभरात महिलांसह बाल लैंगिक अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. या वाढत्या लैंगिक अत्याचाराचा घटनांकडे बघता अक्कलकोट दक्षिण आणि उत्तर पोलीस ठाण्याच्या वतीने दामिनी पथक निर्माण करून शाळा विद्यालय महाविद्यालय परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांसह पालकातून वाढली आहे. शाळा व महाविद्यालय भरण्या अगोदर व सुटल्यानंतर पोलीस पथक दामिनी पथकामार्फत गस्त घातल्यास शालेय विद्यार्थिनी व महिला वर्गात सुरक्षितेची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे. अक्कलकोट दक्षिण व उत्तर पोलीस ठाण्याकडून दामिनी पथक सुरू करण्याची मागणी, पालकांसह नागरिकांतून केली जात आहे.




### माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या बालवाडी शिक्षिका प्रशिक्षणात मुलींचे घवघवीत यश

**सांगोला, दि. २५ ऑगस्ट-**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या कौशल्य विकसन केंद्रातील बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये रोहिणी होडगे, धनवर्षा क्षीरसागर, पूजा कोरे, किरण बनसोडे, शितल माने, संध्या चव्हाण, किरण राजमाने, अश्विनी पवार, करिश्मा काझी, शिल्पा लवटे, स्मिता गायकवाड, आदिती जवळेकर यांनी घवघवीत यश मिळवले. या विद्यार्थीनीना शिक्षिका सुनीता कुलकर्णी, स्वप्ना कुलकर्णी, शालन गयाळी, धनश्री सोनंदकर, विद्या म्हेत्रे, डॉ. प्रा. शालिनी कुलकर्णी, संजीवनी भोसेकर, विजया खडतरे, सुशिला नांगरे, सुधामती लोंढे, मंगल लाटणे यांचे मार्गदर्शन लाभले. वर्गाचे व्यवस्थापन संध्या शास्त्री यांनी केले. यशस्वी विद्यार्थीनीचे संस्थाध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या वतीने कौशल्यावर आधारित उपक्रम राबविण्यात येतात. याचा फायदा अनेकांना होत आहे.



### होर्टीच्या शास्त्री विद्यालयाचे कुस्तीत यश

**अणदूर, दि. २५ ऑगस्ट-**

होर्टी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तुळजापूर तालुक्यात कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. १४ वयोगटातील मुले प्रतिक भोसले, संग्राम कांबळे, १४ वयोगट मुली ४० किलो वजन गटात कार्तिकी दत्ता भोसले, ४२ किलो वजन गटात मंजिरी घोडके, ५४ किलो वजन गटात राधा बोरगाव तालुक्यात प्रथम आल्याबद्दल तसेच त्यांची जिल्हा कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे, प्रमुख मार्गदर्शक ॲड. लक्ष्मीकांत पाटील, मुख्याध्यापक रवींद्र उपाशे, बी. बी. नवगिरे, एच. एम. गिरी, बी. एस. आलुरे, एम. एस. पांचाळ, कोळी, होर्टी ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अक्कलकोटमध्ये ‘हात’ चलाखी

## ● कमळाईच्या लेकरांच्या भूमिकेकडे लक्ष | काँग्रेसच्या उमेदवारीबाबत तर्क-वितर्क

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट, दि. २५ ऑगस्ट-**

**विधानसभा निवडणुका पुढे गेल्या. याचा फायदा सर्वच राजकीय पक्ष करुन घेत आहेत. त्यात मतदारांच्या मनाच्या मशागतीसाठी अनेक युक्त्या केल्या जात आहेत. त्यात आपला-परका, माझा-तुझा हे सगळे भेद विसरुन पक्षाला चांगले दिवस आणण्यासाठी सगळेजण कसत आहेत. यंदा अक्कलकोट तालुक्यात सगळ्याच पक्षातील नाराज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या ‘हात’चलाखीवरच विजयाचे गणित अवलंबून आहे.**

भाजपामधील गटबाजीची वरिष्ठ पातळीवर तक्रारी होत असताना काँग्रेसमध्येही उमेदवारीबाबत खल सुरु आहे. जि. प. चे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांच्यासह अनेकजण इच्छुक आहेत. रासप, मनसेसह अन्य पक्ष निवडणुका लढविण्याच्या तयारी करत आहेत. माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांचे चिरंजीव रमेश पाटीलही आखाड्यात उतरण्याची भाषा करत उमेदवारी मागत आहेत. कित्येकजण अपक्ष म्हणून पुढे येणार आहेत. मनोज जरांगे-पाटील फॅक्टर, मुस्लीम, दलित समाजाची मते फोडण्यासाठी अनेक चेहरे यंदा नव्याने पुढे येण्याची दाट शक्यता आहे. या सगळ्या गणितामुळे अक्कलकोटची राजकीय भूमी तापत आहे. तापलेल्या राजकीय रणभूमीला कार्यकर्ते आणि मतदार कशा पद्धतीने बघतील, यावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष मल्लिनाथ स्वामी, अक्कलकोटचे माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा उर्फ मुत्तू खेडगी, जिल्हा परिषदेचे माजी पक्षनेता आनंद तानवडे, माजी भाजपा तालुकाध्यक्ष राजशेखर मसुती यांच्यासह तालुक्यातील प्रत्येक गावातील हजारो जुन्या कार्यकर्त्यांना गेल्या लोकसभा निवडणूक प्रचारात सामावून घेतले नाही.

शेवटपर्यंत ते प्रचारापासून अलिप्त राहिल्याने भाजपला फक्त ९ हजारांचे मताधिक्य मिळाले. गेल्या लोकसभा निवणुकीत भाजपला ४७ हजार मताधिक्य मिळाले होते. अक्कलकोट भाजपामध्ये काँग्रेसमधल्या आयारामांना पहिली पसंती देत पायघड्या घालण्याचे कार्यक्रम सध्या सुरु आहे. माजी सभापती महिबूब मुल्ला यांना काँग्रेसमधून भाजपत घेण्यात आले.त्यांना संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष बनविले. मात्र त्यांच्या कडबगाव गावात काँग्रेसने दोनशेपेक्षा जास्त लीड घेतला. याशिवाय काँग्रसचे माजी सभापती जानकर यांना भाजपात घेण्यात आले. त्यांच्या कल्लप्पवाडी गावात काँग्रेसने लीड घेतला. यंदा काँग्रेसमधून तीन माजी सभापतींना भाजपामध्ये प्रवेश दिला. मात्र जुन्या कार्यकर्त्यांना प्रचारात समावून घेतल्या नसल्याने भाजपाला फक्त ९ हजार लीड मिळाला.

माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा उर्फ मुत्तू खेडगी यांचे अक्कलकोट शहरात चांगले वर्चस्व आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अक्कलकोट शहरात जवळपास भाजपला सात-आठ हजार लीड मिळाला होता. मात्र गेल्या लोकसभा निवडणुकीत खेडगी अलिप्त होते की त्यांन प्रचारात समावून घेतले नाही, हा महत्त्वचा मुद्दा आहे. यंदा शहरात फक्त ४०० चे मताधिक्य आहे. २०१९ विधानसभेला काँग्रेस पक्षात राहून भारतीय जनता पक्षाला विरोध केलेल्या आयाराम लोकांना आज भारतीय जनता पक्षात वरचेस्थान, पान-पान मिळत आहे. या उलट जेन्या निष्ठावंतांना किंमत नसल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. यामुळे त्यांच्यात असंतोष खदखदत आहे. कित्येकजण पक्ष नेतृत्वाकडे तक्रारी आहेत. त्यांच्यातील खदखद उफाळून वर आल्यास येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत ते नक्कीच ‘हात’चलाखीद्वारे आपले बळ दाखवतील, याचीही भीती नाकारता येत नाही. मागील साडेचार वर्षांत कोणत्याही प्रकारच्या निवडणुका न झाल्याने ही गटबाजी फारशी दिसून आली नव्हती. मात्र गेल्या लोकसभा निवडणुकीत ही नाराजी वर आल्याचे स्पष्ट झाले. प्रत्येक बुथवरील मतदान वाढीस फटका भाजपाला बसला आहे.

याच संधीचा काँग्रेस फायदा घेत आहे. दुधनीसारख्या शहरात नव्या आणि जुन्या कार्यकर्त्यांनी मिळून काँग्रेसच्या ताब्यातील भाजपाची सत्ता आणण्यात यश मिळविले. मात्र आता त्याही गावात दोन गट पडले आहेत. एकमेकांच्या जिरवण्याच्या नादात पक्षाचे नुकसान होत आहे. या सगळ्या बाबींकडे भाजपातील वरिष्ठ लक्ष देणार का हाही मुद्दा महत्त्वाचा आहे.



**जोडाजोडीत पण तडजोड हवी**

अक्कलकोट मतदारसंघात एकेकाळी भाजपाला कार्यकर्ते मिळणे कठीण होते. त्याप्रसंगी जुने कार्यकर्ते गनिमी काव्याप्रमाणे लढा देत पक्ष न सोडता, गाव सोडून पक्ष मजबूत ठेवले. कालांतराने गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता आली. काँग्रसच्या काळात जुन्या भाजपाच्या कार्यकर्त्यांना त्रास देणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांना भाजपात घेऊन डिवचण्याचे प्रकार झाले. जुन्या कार्यकर्त्यांची मोट बांधण्याऐवजी नवीन गट निर्माण करण्यात आले. आता त्याला जबाबदार कोण? असा सवाल कार्यकर्ते उपस्थित करीत आहेत. नवे जोडत असताना जुन्याकडे दुर्लक्ष न करता त्यांच्यात तडजोड घडवून पक्ष संघटना मजबूत करण्याची गरज आहे.

## मातंग समाजाने न्याय, हक्कासाठी एकत्र यावे : प्रा.कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २५ ऑगस्ट-**

राजकारणात प्रत्येक समाजाचा सहभाग असलेले वेगवेगळे राजकीय पक्ष असून त्या आधारे जो तो समाज स्वतःची प्रगती करून घेत आहे. मात्र असंघटित असलेल्या मातंग समाजाने देवादिक कार्ये, अंधश्रद्धा, व्यसने, अशिक्षितपणा आदी नकारात्मक गोष्टींच्या जोखडातून निघून संघटित होण्याची आणि देशातील एक मजबूत राजकीय घटक होण्याची गरज असून याचा मातंग समाजाने विचार करावा. अन्यथा येणारा काळ माफ करणार नाही, असा धोका डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांनी व्यक्त केला.




अंजनडोह (ता. करमाळा) येथे डॉ. अण्णा भाऊ साठे तरुण मंडळ आणि ए. बी. एस. ग्रुपच्यावतीने लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

प्रा. कांबळे यांनी देशातील बहुसंख्य समाज राजकीय पक्षांकडे केंद्रित झाल्याने त्या-त्या समाजाची प्रगती साधली जाते. मातंग समाजालाही अशाच केंद्रीकृत पक्षाची गरज असल्याने डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची निर्मिती करण्यात आली. यावेळी संविधान सन्मान रॅलीचे जनक नागेश कांबळे, माजी नगराध्यक्ष दीपक ओहोळ, दलित सेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, पत्रकार प्रफुल्ल दामोदरे, अमोल शेळके, माजी सरपंच साधना खरात, शेखर जगताप, संदीप जगताप, डॉ. अशोक शेळके, अंकुश दुरगुळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विमानतळाला आण्णा भाऊंचे नाव द्या**

साहित्यरत्न डॉ. आण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे आणि सोलापूर येथील विमानतळास लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे, असा ठराव या सभेत सर्वानुमते घेण्यात आला. व्याख्यानानंतर रात्री ८ ते ११ या वेळेत कोम लताई पाटोळे-मेंढापूरकर यांच्या लोकशाहीर साहित्य सम्राट डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर आधारित गीतांचा भव्य कार्यक्रम शेकडोंच्या उपस्थितीत पार पडला.

## पंढरपूर एमआयडीसी मनसेमुळे मार्गी

**● दिलीप धोत्रे यांचा दावा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ औगस्ट-**

प्रलंबित पंढरपूर एमआयडीसी कासेगाव येथे उभारण्याला औद्योगिक विकास महामंडळाची मंजुरी मिळाली आहे. यासाठी मनसेने शर्तीचे प्रयत्न केले होते. अखेर याला यश आल्याची माहिती मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी त्यांनी शासन आणि प्रशासनाचे आभार मानले. दिलीप धोत्रे म्हणाले की, आपल्या संस्थेमध्ये कोण कामाला मिळणार नाहीत या भीतीमुळे पंढरपूर येथील नेतेमंडळींनी याला विरोध केला असल्याचा आरोप मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केला. पंढरपूर परिसरात एमआयडीसी व्हावी यासाठी अनेक वर्षांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करून प्रयत्न केल्याने एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लागला आहे. मात्र एमआयडीसी मंजूर झाल्यावर लोकप्रतिनिधी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याची खंत देखील यावेळी त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पदाधिकारी, युवक उपस्थित होते.

## शिवसेनेच्यावतीने महिलांसाठी श्रावणमास यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २५ ऑगस्ट-**

शिवसेना पक्षाच्या वतीने आ. शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरातील महिलांसाठी सांगोला येथील आयोध्या नगरी ते सोमेश्वर करंजे अशा मोफत श्रावणमास यात्रा बुधवार २८ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वा. आयोजित करण्यात आली आहे.



श्रावणमास यात्रेला जाण्यासाठी इच्छुक असलेल्या महिलांनी२ ६ ऑगस्ट स. १० ते मंगळवारी २७ ऑगस्ट सायं. ५ पर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन सांगोला शहर शिवसेना महिला संघटक आशाताई सोमेश यावलकर यांनी केले आहे. या श्रावणमास यात्रेला जाण्यासाठी १५ ते ६० वयोगटातील मुली व महिलांनी नाव नोंदणी करून घ्यावी. सोमेश्वर करंजे येथे दुपारी जेवणाची सोय करण्यात आली आहे. ५ वर्षाखालील लहान मुलांना स्वतःजवळ घेऊन बसण्याची सोय करण्यात आली आहे. येताना सोबत छत्री किंवा रेनकोट घेऊन यावे, असे आवाहन यावलकर यांनी केले आहे.

## बार्शी-सोलापूर रस्त्यावर जनावरांचा ठिय्या | वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना त्रास

**● वैराग नगरपंचायतीकडून उपाययोजनेची गरज**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि, २५ ऑगस्ट-**

वैरागकरांना मोकाट जनावरांचा त्रास आता रोजचाच झाला आहे. मुख्य वर्दळीच्या ठिकाणी बार्शी-सोलापूर रस्त्यावरील चौकात तर कधी बस स्टॅण्ड शेजारील भर रस्त्यात मोकाट जनावरे उभारलेली असतात. यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याने अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

याबाबत वैराग नगरपंचायतीने योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे. वैराग शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. ही जनावरे रस्त्यातच ठाण मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनधारकांना आपली वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः एसटी बस, ट्रक अशी अवजड वाहने चालविताना चालकांना बराच त्रास होतो. दुचाकीस्वारांना तर कधी चुकवत तर, कधी वळसा मारूनच जावे लागते. बऱ्याचवेळा अशा मोकाट जनावरांमुळे वाहतूक विस्कळीत, ठप्प होते. मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारीही वैराग नगरपंचायतीची आहे. कारवाई करायला गेल्यानंतर काहीवेळा जनावरांचे मालक आणि कर्मचारी यांच्यात वादाचे प्रसंगही घडले आहेत. यासाठी पोलीस प्रशासनाची मदत घेणे आवश्यक आहे.



**जनावर मालकांना दंड करावा**

मोकाट जनावरांच्या मालकांची माहिती नगरपंचायतीकडे असते. काही मालकांची माहिती नसल्यास ती घ्यावी व ज्यांच्या मालकीची जनावरे आहेत त्यांच्यावर कारवाई करीत जास्त दंड आकारावा असे केल्यास मोकाट जनावरे रस्त्यावर थांबण्याचे प्रमाण कमी होईल, अशा गोष्टीकडे नगरपंचायतीच्या अधिकारी पदाधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

## प्रभू रामचंद्रांचा पदस्पर्श अन् उपलव्य ऋषींचे वास्तव ठिकाण उपळे दुमाला

**● श्रावण महिन्यात भक्तांसाठी पर्वणी; भोगावती काठावर श्री रामेश्वराचे मंदिर, दर्शनासाठी नेहमीच भाविकांची गर्दी**

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. २५ ऑगस्ट-**

श्री प्रभूरामचंद्र यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले व उपलव्य ऋषीच्या वास्तव्यावरून उत्पतीनगर म्हणून नावारूपास आलेले गाव सध्या उपळे दुमाला नावाने ओळखले जाते. बार्शी तालुक्यातील पौराणिक, धार्मिक वारसा लाभलेले हे गाव श्रावणात भक्तांसाठी पर्वणीच असते.

भोगावती नदीच्या काठावर चिरेबंदी भला मोठा दगडी घाट आहे. घाटालगत श्री रामेश्वराचे संपूर्ण दगडाचे हेमाडपंथी मंदिर आहे. सूर्योदयाच्या वेळी सूर्याची पिवळसर किरणे मंदिरातील पिंडीवर पडतात. मंदिराच्या सभोवतालचा परिसर हिरव्या गर्द चिंचेच्या झाडांनी व्यापला आहे. मंदिराच्या दक्षिणेस ८० ते ९० वर्षापूर्वी अल्लू बुआ नावाचा गोसावी रहात होता. त्याच अल्लू बुआची समाधी सध्या सभामंडपाच्या डाव्या बाजूस आहे. रामेश्वर मंदिराच्या पुढे सकळेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे. या मंदिराचा गाभा खोल व आकर्षक गोल दगडाचे कोरीव काम केलेले आहे. रामेश्वर मंदिराच्या समोर भूई देऊळ आहे. ते भुयारात असून नक्षीदार दगडी गाभारा आहे. अंधारामुळे हा गाभारा, कुणालाही दिसू शकत नाही. गाभाऱ्यात पाच पिंडी आहेत. या भूई देवळाच्या गाभाऱ्यात सोडलेले लिंबू-नारळ भोगावती नदीपात्रात येतो. याचे रहस्य अद्याप उलगडले नाही. नदीपात्रातील पाणी कमी-जास्त झाले की देवळातीलही पाणी कमी-जास्त होते. भोगावती रात्री १२ वाजता स्त्री रूपाने येऊन भगवंत रामेश्वराची पूजा करते याची सत्यता भाविकांनी घेतली असता त्यांना रामेश्वराच्या पिंडीवर ताजी फुले, अक्षता, गंध पहायला मिळाला अशी दंतकथा आहे. हा दंडकारण्याचा भाग असल्याने श्री प्रभू रामचंद्र वनवासात असताना त्यांनी राजा दशरथाचे श्राद्ध येथे घातले असे पुराणात आढळते. त्याप्रसंगी ऋषीमुनींच्या पंगती जेवताना त्यांना पिण्यासाठी पाणी प्रभू रामचंद्रानी जमिनीत बाण मारून उपलब्ध केले अशी अख्यायिका आहे.



**● हेमाडपंथी अन् नवीन मंदिरे :** या गावात अनेक जुनी हेमाडपंथी व नवीन मंदिरे आहेत. यामध्ये प्रामुख्याने महादेवाचे मंदिर असून गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. दरवर्षी चैत्र शुद्ध एकादशीला महादेवाची मोठी यात्रा असते. गावच्या दक्षिण पूर्व भागात महाद बुआचे मदिर आहे. या मंदिरासमोर हेमाडपंथी दगडाचे अंबाबाई देवीचे मंदिर आहे.

**● गावांमध्ये अनेक मंदिरे :** रामेश्वर मंदिराच्या पाठीमागे उपळेश्वराचे मंदिर, नदीकाठी दक्षिणमुखी हनुमान मंदिर, वखारिया विद्यालयाच्या प्रांगणात दत्ताचे मंदिर, हिंगणी तळ्याकाठी गणपतीचे मंदिर, राममंदिर, सकळेश्वर मंदिर अशी अन्य मंदिरे असल्याने जणू हे गाव मंदिराचे गाव आहे असे वाटते.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गणित ऑलिम्पियाड परिक्षेत भोसले हायस्कूलचे विदयार्थी ठरले सुवर्ण पदकाचे मानकरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ ऑगस्ट -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत १३ विद्यार्थी सुवर्ण पदक विजेते ठरले.

सन २०२३-२४ मध्ये झालेल्या या परीक्षेत इ.५ वी मधून शांभवी संदीप जगताप तर सहावीमधून अर्पिता नेताजी मुळे, हेरंब पवार, मनस्वी महेश इंगळे तर सातवीमधून आदिती विजयकुमार काळे व आठवीमधून स्वराज निकम, पृथ्वीराज हुग्गे तर नववीमधून सारंग पोपट बेलदार, श्रेयश लालासाहेब पवार, रणवीर विठ्ठल लोमटे व १० वीतून सागर गांधले, स्वप्नील जाधव, आशिष मोजगे या सर्व विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्राप्त झाले.

विद्यार्थ्यांना प्रशालेच्या वतीने पुष्प गुच्छ व सम्मानचिन्ह, प्रमाणपत्र, सुवर्णपदक देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कारीत करण्यात आले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# मुसळधार पावसाने मांजरा नदीला महापुर

### फक्राबादचा पुलासह रस्ता वाहुन गेला.... पुन्हा गावचा संपर्क तुटला... गावकऱ्यांचा नदीकाठी मुक्काम...





**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्यातील वाशी, कळंब परिसरात शनिवारी मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसाने नदी-नाले तुडुंब भरून वाहु लागले आहेत. त्यातच संगमेश्वर प्रकल्पतील वीसर्ग वाडल्याने मांजरा नदीला अचानक महापुर आला व बीड धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या फक्राबाद (ता. वाशी) च्या मांजरा नदीवरील अरुंद पुलावरील पुरामुळे रस्त्यासह पुल वाहुन गेला असुन गावचा रात्रीचाच संपर्क तुटला. यामुळे गावकऱ्यांना नेहमीप्रमाणेच याचा मोठा फटका बसला असून गावकऱ्यांना नदीकाठीच आसरा घेउन मुक्काम ठोकावा लागला. ही आठवड्यातील गावचा संपर्क तुटण्याची दुसरी वेळ आहे. शेती शिवारात पुराचे पाणी घुसल्याने सोयाबीनची पिके पाण्यात गेली आहेत.

धाराशिव, बीड, लातुर जिल्ह्याची तहान भावगणारा मांजरा प्रकल्प उगम भागातील जोरदार पावसामुळे मांजरा नदिला आलेल्या महापुरामुळे भरण्याच्या प्रतिक्षेत आहे. धाराशिव आणि बीड जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या फक्राबाद (ता. वाशी) गावची लोकसंख्या दोन हजाराच्या आसपास आहे. मांजरा नदी पात्राजवळच हे गाव वसल्याने या गावाला जाण्यासाठी एकच रस्ता आहे.

मांजरा नदिला पुर आला की पावसाळ्यात या गावचा संपर्कच तुटतो. अचानक अतिवृष्टी झाल्याने या गावचा संपर्क तुटुन एक वृद्ध महिलेचा वाहुन जावुन मृत्यु झाला होता. पावसाळ्यात जनावरे वाहुन जाण्याचे पृकार तर नित्याचेच झाले आहेत. मांजरा नदीवरील अरुंद पुलाचा फटका या गावकऱ्यांना बसतो व गावचा संपर्कच तुटतो.

यामुळे आजारी रुग्णांना उपचारासाठी घेउन जाणे दुरापस्त होते. नदी, नाले व अरुंद पुल हे गावच्या जणु मुळावरच उठल्यागत होतात. परंतु शनिवारी झालेल्या जोरदार पावसामुळे मांजरा नदिला महापुर आला असुन याचा फटका फक्राबादला बसला आहे.

नदीवरील पुलावरून पाणी शेती शिवारात घुसले व चक्क पुलासह रस्ताच वाहुन गेल्याने याचा मोठा फटका गावकऱ्यांना बसला आहे. या गावचा संपर्कच तुटला आहे. यामुळे पारगाव, वाशी, कळंब या भागाचा संपर्कच तुटला आहे.

### आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था करतेय काय?

प्रत्येक वर्षी मांजरा नदीला पुर आल्यास मांजरा नदिवर वसलेले फक्राबाद (ता. वाशी) हे गाव संपर्कापासुन तुटते. या मुळे गावकरी अक्षरशा वेतागुन गेले आहेत. पावसाळ्यात आपत्ती व्यवस्थापन पाहणी करते परंतु दुसऱ्या पावसाळयातच याकडे पाहिले जाते. परंतु आता तर गावाशी संपर्क असलेला एकमेव अरुंद पुल रस्त्यासह वाहुन गेल्याने गावचा संपर्कच तुटला आहे. गेल्या अनेक वर्षापासुन गावकरी पुलाची उंची वाढवावी अशी मागणी करत असल्याचे ॲड. दत्तात्रय मुरकुटे यांनी सांगितले. परंतु प्रशासन याकडे लक्ष देत नाही. यामुळे गावकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. पुर आल्यानंतर गावच्या बाहेरच नदीकाठी लोक अडकतात मिळेल त्या ठिकाणी आसरा घेतात. त्यामुळे आता तरी प्रशासनाने याकडे लक्ष घालण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### तेर येथे सामुहिक रूद्र पूजा संपन्न

**तेर, दि.२५ ऑगस्ट -**

आर्ट ऑफ लिविंग परिवार तेर यांच्या वतीने श्रावण मासानिमित्त कोष्टाबिकादेवी मंदिरात २१ ऑगष्टला सामुहिक रुद्र पूजेच्या आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आर्ट ऑफ लिविंग बेंगलोरचे वेदांत स्वाम ीजी यांनी रुद्र पूजा केली. रुद्र पूजेमध्ये साधकांनी पृथ्वीच्या समृद्धतेसाठी संकल्प केला. यावेळी आर्ट ऑफ लिविंग परिवार तेरचे साधक विजयसिंह फंड, नवनाथ पांचाळ,बालाजी भक्ते, बबन कोकरे, सोमनाथ यादव, नेताजी फंड, अर्चना फंड, भाग्यश्री भक्ते, रेश्मा साळुंखे, रमेश गायकवाड, ओमप्रकाश नाईकवाडी यांच्यासह भाविकभक्त उपस्थित होते.



### नारायण साळुंके यांना पुरस्कार प्रदान

**तेर, दि.२५ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील नारायण साळुंके यांना सामाजिक कार्याबद्दल सिन्नर (ता.सिन्नर) येथे शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २१ ऑगष्टला देऊन गौरविण्यात आले. तेर येथील नारायण साळुंके यांना संजिवनी फाऊंडेशन यांच्या वतीने शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ पद्मश्री राहीबाई पोपेरे, खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### प्राजक्ताची पोलिस चालकपदी निवड

**तुळजापूर, दि.२५ ऑगस्ट -**



तालुक्यातील चव्हाणवाडी येथील गरीब मराठा शेतकरी कुंटुंबात जन्मलेल्या प्राजक्ता सुरेश चव्हाण या ग्रामीण भागातील मुलीची धाराशिव जिल्हा पोलिस दलाने चालक पोलिस शिपाईसाठी घेतलेल्या परिक्षेत पास होवुन तीची महिला पोलिस चालक म्हणून निवड झाली. प्राजक्ता चव्हाण हिची यापुर्वी आसाम रायफलमध्ये निवड झाली होती व तिला नागालँड येथे ड्युटीस होती. नंतर तिने रजा घेवुन पोलिस दलातील परिक्षा देवुन त्यात ती पास झाली व आता पोलिस बनली आहे. तिच्या या निवडीचे चव्हाणवाडी ग्रामस्थांकडून अभिनंदन केले जात आहे.

### वागदरीत श्रावणकाला यात्रा संपन्न

**जळकोट, दि.२५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे श्रावण काला यात्रा मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.



या मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे येथील श्री. संत भवानसिंग महाराज भजनी मंडळ व ग्रामस्थांच्यावतीने पवित्र श्रावण महिन्यात श्री ज्ञानेश्वर महाराज पारायण सप्ताह साजरा करुन श्रावण काला यात्रा भरवून लाही फोडून या सप्ताहाची सांगता करण्यात आली. या निमित्ताने वागदरी व परिसरातील टाळ मृदुंगासह वारकरी दिंड्या व भावीकभक्त या यात्रेत सहभागी झाले होते. गावातील हणुमान मंदिरा समोरच्या मुख्य चौकात दिंडीच्या पाऊलाचे सादरीकरण करण्यात आले. दुपारी १.३० वा. दरम्यान दिंडीचे पाऊल खेळत रामकृष्ण हरीचा गजर करत टाळ मृदंगाच्या निनादात वारकरी दिंडीचे व भाविक भक्तांचे प्रस्थान श्री संत भवानसिंग महाराज मंदिर व चोखामेळा समाधीकडे झाले. त्या ठिकाणीही दिंडीचे पाऊल खेळून हरी भजनानंतर लाही फोडून या यात्रेची सांगता करण्यात आली.



### धाराशिव-कोंबडवाडी बस सेवा पुन्हा सुरू

**कसबे तडवळे, दि.२५ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील कोंबडवाडी-धाराशिव बस सेवा गेल्या पाच वर्षापासून बंद होती. गावातील विद्यार्थांना बाहेरगावी तडवळे, येडशी, धाराशिव या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी कोणतेही साधने नव्हते. यामुळे गावकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा करून अखेर बस सर्व गावकऱ्यांच्या प्रयत्नातून पुन्हा सुरू झाली आहे. ही बस पाच वर्षानंतर पुन्हा सुरू झाल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात खुप दिवसांनी बस आल्यामुळे सकाळी गाडीचे पूजन करून चालक, वाहक यांचे हार फेटा घालून स्वागत केले. याप्रसंगी सरपंच मुकुंद सोकांडे उपसरपंच गुणवंत घाडगे, काकासाहेब मिसाळ, बंकट मिसाळ, भागवत घाडगे, बबलू मिसाळ, बाबासाहेब मिसाळ, काकासाहेब जाधव, आकाश सोकांडे, पांडुरंग जाधव, समाधान सोकांडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## खंडीत वीज पुरवठ्याने भाविक, नागरिक त्रस्त!

### तुळजापूरात वीजेचा लंपणडाव सुरूच... व्यापारांच्या व्यवसायावर परिणाम...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ ऑगस्ट -**

श्रावणमासात तिर्थक्षेत्र तुळजापूर येथे देविजीस कुलधर्म कुलाचार करण्यासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत असताना मात्र विजेचा खेळखंडोबा सुरूच याचा त्रास शहरवासीयांसह भाविकांना बसत आहे.

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात विजेचा खेळखंडोबा गेली अनेक महिन्यापासुन सुरु आहे. पाऊस येताच हमखास वीज गायब होते. आता तर चक्क पाऊस वादळवारे नसताना वीज गायब होत आहे. या विजेच्या जाण्याने अनेक सम स्यांना सामोरे जावे लागत आहे. मागील दोन दिवसात सातत्याने वीज ये-जा करीत असल्याने याचा फटका अनेकांचे विद्युत इलेक्ट्रॉनिक उपकारणांनमध्ये बिघाड होवुन बसला आहे. तसेच शहराचा पाणी वितरणावर ही याचा मोठा परिणाम होत आहे.

कृषीसाठी विजेची मागणी नसतानाही वीज गायब होणे ये-जा करण्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. तुळजापूर येथील विद्युत कारभारावर कुण्याही कारभाऱ्यांची लक्ष दिसत नाही. सध्या फक्त विद्युत अधिकारी वर्गाचे फक्त ठेक्यावर लक्ष असल्याची चर्चा वीज ग्राहकांमधुन केली जात आहे. रात्री सात ते नऊ च्या दरम्यान अचानक कधीही वीज पुरवठा गायब होत असल्याने दर्शनार्थ जा-ये करणाऱ्या भाविकांमध्ये वीज गायब होताच असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत आहे.

श्रावण मासात भाविकांची होत असलेल्या गर्दी पार्श्वभूमीवर तर अखंडीत पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्याची मागणी होत आहे.

## पारगाव येथे लखपती दीदी योजनेच्या प्रमाणपत्रांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोन्नती अभियान अंतर्गत पारगाव, पारा, तेरखेडा प्रभागसंघ अंतर्गत लखपती दीदी कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात ज्या महिलांनी बचत गटामध्ये भाग घेऊन आपली आर्थिक स्थिती उंचावली आहे व बचत गटाच्या मदतीने तिचे आर्थिक उत्पन्न हे वार्षिक एक लाखापेक्षा जास्त झालेले आहे. अशा महिलांची निवड या योजनेमध्ये केलेली आहे. तालुक्यातील सहाशे महिलांची निवड या लखपती दीदी योजनेमध्ये केलेली आहे. या सर्व सहाशे महिलांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. अशा लखपती दीदी ना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास पं.स. सदस्य सविता विकास तळेकर, सरपंच महेश कोळी, तालुका अभियान कक्षाचे रवी कुमार ढाकणे, अशोक बांगर या सर्वांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

## आ. पाटील यांच्या हस्ते स्पर्धेच्या किटचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.२५ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील धाराशिव शालेय तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या तसेच विविध मैदानी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आ. कैलास पाटील यांच्यातर्फे खेळाच्या किटचे (टी शर्ट व हाफ पँट) वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. पाटील म्हणाले की, शिक्षणात अभ्यासक्रम ाबरोबर विविध प्रकारच्या खेळामधूनही आपल्याला करिअर करता येऊ शकते हे सांगितले. बदलापूर सारख्या निर्भयावर होणाऱ्या अत्याचार होऊ नये, यासाठी मुलींना 'शास्त्राबरोबर शस्त्राचे ही शिक्षण दिले गेले पाहिजे' अशी भूमिका त्यांनी मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयहिंद विद्यालयाचे प्राचार्य गाढवे आर.डी. हे तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. कैलास पाटील म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी तुळशीदास जमाले, उपसरपंच प्रताप करंजकर, चंदू जमाले, आप्पा मनके यांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवलेली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता बारावीच्या विद्यार्थिनी प्राची कोरे यांनी केले.

## महामार्ग रस्त्याचे काम अर्धवट; शेतकरी संघर्ष समितीकडून दहावा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ ऑगस्ट -**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील नळदुर्ग येथील गोलाई चौकातील पुलाचा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दहावा वाढदिवस साजरा करण्यात आला.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ सोलापुर ते कर्नाटक सिमेपर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याचे काम गेल्या दहा वर्षांपासुन सुरू असुन आजही हे काम अर्धवट अवस्थेतच आहे. त्यामुळे नळदुर्ग बायपास रस्ता सुरु न झाल्याने नळदुर्ग घाटात अनेक अपघात होवुन नेहमीच वाहतुक विस्कळीत होते. त्यामुळे महामार्गावरील प्रवाशाना तासंतास महामार्गावर ताटकळत बसावे लागत आहे. गेल्या दहा वर्षापासुन रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे त्याचबरोबर सध्या झालेले रस्त्याचे काम नित्कृष्ट झालेले आहे.त्यामुळे अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे शेतकरी संघर्ष समिती च्यावतीने नळदुर्ग येथील गोलाई चौकातील पुलाचे काम लवकर पुर्ण व्हावे तसेच नळदुर्ग बायपास रस्त्याचे काम लवकर पुर्ण करण्यात यावे. पुढील २४ सप्टेंबर पर्यंत नळदुर्ग बायपास रस्ता सुरु करण्यात आला नाही तर शेतकरी संघर्ष समिती च्यावतीने फुलवाडी टोल नाक्यावरील अधिकारी व कर्मचारी यांना बेशरमाच्या फुलांचे हार घालुन त्यांची विधिवत पुजा करून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी शेतकरी संघर्ष समिती च्यावतीने देण्यात आला.

यावेळी सरदारसिंग ठाकुर, दिलीप जोशी, व्यंकट पाटील, महादेव बिराजदार, रहीमान शेख, तोलु पाटील, गुलाब शिंदे, आजम ोद्दीन शेख, महेश घोडके, श्रीकांत पोतदार, बालाजी ठाकुर, प्रताप ठाकुर, बाबुसिंग राजपुत, सचिन जवळगे, बंडु दामाजी, पिरपाशा इनामदार यांच्यासह शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

## मुर्षदपुर येथे विविध विकास कामांचे आ. चौगुले यांच्या हस्ते भुमिपूजन व लोकार्पण



### ज्ञानज्योती संस्थेकडून पुस्तकांचे वाटप...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील मुर्षदपुर येथे आ. ज्ञानराज चौगुले यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून महादेव मंदिरासमोर सभामंडप बांधणे १० लक्ष रुपये या कामाचे लोकार्पण व ९५/५ योजनेअंतर्गत गावांतर्गत रस्ता करणे १० लक्ष रूपये या कामाचे आ. ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते व युवासेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन संपन्न झाले.

यावेळी ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था उमरगा यांच्या वतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी शिवसेना लोहारा तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, उमरगा तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, योगेश तपसाळे, सरपंच बळवंत पाटील, उपसरपंच संगीता माने, महादेव बलसुरे, युवराज पाटील, मनीषा चाकुरे, पवन मोरे, अंगद सूर्यवंशी, तुळशीराम पवार, महेश पाटील, संजय मोरे, भागवत आनंदगावकर, फजल कादरी, बालेपीर शेख, गोरखनाथ मुर्टे, दिलीप बेंडगे, काकासाहेब चव्हाण, तुकाराम जाधव, लायक कादरी, बालाजी पवार, श्याम बनसोडे, प्रदीप मोरे, शंकर मोरे, पांडुरंग महाराज, शेखर पाटील, महेश घोडके, रितेश चेंडकाळे, विजयकुमार देशमुख, रोहन माने, समीर घोडके, योगेश घोडके, स्वप्नील घोडके, पृथ्वीराज गोबाडे, रवी बलसुरे, चैतन्य मोरे, श्रीकांत मोरे, रुपेश गोबाडे, करण खरोसे, किरण खरोसे, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बालाजी अमाईन्सकडून संभाजीनगर शाळेला ४० बेंच भेट

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जि.प.प्रा. संभाजीनगर शाळेला तामलवाडी येथील बालाजी अमाईन्स या कंपनीकडून कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी ४० लाकडी बेंच प्रदान करण्यात आले.

या सामाजिक दायित्व निधीतून शाळेला बेंच मि ळण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार यांनी सतत पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला आहे. त्यांच्या माध्यमातून शाळेत अनेक विकासात्मक कामे झाली आहेत. धाराशिव येथे झालेल्या कार्यक्रम ात संभाजीनगर जि.प. शाळेला हे बेंच प्रदान करण्यात आले.

यावेळी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी, कंपनीचे सीएसआर विभाग प्रमुख तथा तांत्रिक सल्लागार म ल्लिनाथ बिराजदार, सांजेकर , मल्लिकार्जुन कुंभार, मुख्याध्यापक धनराज रेणुके , सत्यवान अभिवंत, शाळा व्यवस्थापन कमिटी माजी अध्यक्ष शकील मुलानी आदि उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### घुगी येथे विविध विकास कामाचे सक्षणा सलगर यांच्या हस्ते भूमिपूजन

**धाराशिव, दि.२५ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील घुगी येथील विविध विकासकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी युवती काँग्रेस (शरदचंद्र पवार) च्या प्रदेशाध्यक्ष तथा मा. जि.प. सदस्य सक्षणा सलगर यांच्या हस्ते झाले. कुठल्याही प्रकारची सुविधा नसल्यामुळे सक्षणाताई सलगर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्यसभेच्या खासदार फौजिया खान यांच्या फंडातून १० लाख रुपये निधी मंजूर करून घेतला. या निधीतून घुगी येथील मस्तान शहावली दर्ग्याच्या समोरील चौकामध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन सक्षणाताई सलगरयांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी घुगी गावच्या सरपंच शुभांगी पवार, बळीराम सगर, नवनाथ बनकर, सतीश जावळे, दत्ता जावळे, माणिक जावळे, अर्जुन जावळे, गोविंद पवार, शरद जावळे, राकेश जटाळे तसेच गावातील इतर प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.

### श्री साईनाथ पवार यांची महाराष्ट्र राज्य दिव्यांग सल्लागार मंडळावर निवड

**धाराशिव, दि.२५ ऑगस्ट -**



श्री साईनाथ दत्तात्रेय पवार राज्याध्यक्ष शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना यांची महाराष्ट्र राज्य दिव्यांग सल्लागार मंडळावर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांच्या हातून राज्यातील तमाम दिव्यांग व दिव्यांग कर्मचारी बंधू-भगिनी यांचे कल्याण व्हावे. त्यांची निवड ही भूषणाह आहे. त्यांच्या या निवडीचे स्वागत धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव शिंदे, महादेव विटकर, नागेश कदम ज्ञानेश्वरी शिंदे, रमेश वाघमारे, सुधीर काळे, बाबुराव पवार, भारत देवगुडे, संतोष जगदाळे, रवींद्र पाटील, बापू भंडारे, शहाजी कोकाटे, रमाकांत जगताप, ज्ञानदेव माने, दत्तू दंडगुले, पद्माकर पाटील यांनी केले.



### बदलापूर घटनेच्या शिवसैनिकांचे तोंडावार काळी पट्टी लावुन मुक आंदोलन

**लोहारा, दि.२५ ऑगस्ट -**


बदलापूर येथील एका शाळेमध्ये दोन शाळकरी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेने मोजक्याच कार्यकर्त्यांना घेऊन लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि.२४ ऑगस्ट रोजी तोंडावर काळीपट्टी बांधून मूक आंदोलन केले. अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र, मुंबई हायकोर्टाने बंदला मज्जाव केल्यामुळे उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना स्थानिक पातळीवर मूक आंदोलन करून निषेध करण्याचे आदेश दिले होते. शनिवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसैनिक जमा होऊ लागताच पोलिस प्रशासनाने जमावबंदी लागू असल्याचे सांगून शिवसैनिकांना मूक आंदोलनापासून रोखले. चारपेक्षा अधिकजण एकत्र येण्यास प्रतिबंध केल्यामुळे कांही मोजक्याच शिवसैनिकांनी तोंडाला काळीपट्टी व हातात काळे झेंडे घेऊन मूक आंदोलन करून बदलापूर घटनेचा निषेध केला. शिवसेना तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, शहरप्रमुख सलीम शेख, शिवदूत महेबूब गवंडी, पंचायत समितीचे माजी सभापती विलास भंडारे मूक आंदोलनात सहभागी झाले होते.



### रामतीर्थ येथे विविध मान्यवरांचा सत्कार

**जळकोट, दि.२५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील रामतीर्थ येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृध्दी योजनेच्या सदस्यपदी डॉ. संतोष चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल तर जळकोटचे सरपंच म्हणून गजेंद्र कदम यांची निवड झाल्याबद्दल व बालाघाट शिक्षण संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी सुभाष राठोड यांची निवड झाल्याबद्दल रामतीर्थ ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंचपती लक्ष्मण राठोड, उपसरपंच तारु राठोड, दामाजी राठोड, बालाजी राठोड, शंकर राठोड, नामदेव पवार, धनाजी राठोड, नेमिनाथ चव्हाण, रामराव राठोड, सिताराम चव्हाण, मारुती राठोड, सतिश राठोड, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक ग्रा.प. सदस्य शिवाजी राठोड यांनी केले तर आभार मुख्याध्यापक विनायक राठोड यांनी मानले.



### माणिकराव कदम ट्रस्टच्यावतीने वागदरी शाळेत साहित्यांचे वाटप

**जळकोट, दि.२५ ऑगस्ट -**

स्व. ाणिकराव कदम-पाटील चॅरिटेबल ट्रस्ट तुळजापूरचे संस्थापक अध्यक्ष माजी जि.प. सदस्य ॲड. धिरज पाटील यांच्या संकल्पनेतून चॅरिटेबल ट्रस्ट तुळजापूरच्यावतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वागदरी (ता.तुळजापूर) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे, ग्रा.प. सदस्य अमोल पवार, एस.के.गायकवाड, प्रमोद बिराजदार, भरतसिंग ठाकूर, सुर्यकांत वाघमारे, शाळेच्या मुख्याध्यापिका महादेवी जत्ते, सहशिक्षक तानाजी लोहार, ज्ञानेश्वर बाबर, सहशिक्षका मनिषा चौधरी, रेखा साखरे, संपदा माडजे, विद्यार्थी उपस्थित होते.

# केशेगावच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या शोधनिबंधास देशपातळीवरील प्रथम पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ ऑगस्ट-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्यातर्फे सादर करण्यात आलेल्या IMPCT OF MECHNICLLY HRVESTED CNE ON MILL PERFORM-NCE या शोधनिबंधास डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन (इंडिया) या संस्थेचा देशपातळीवरील प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याने संस्थापक चेअरमन श्री अरविंद गोरे यांचे मार्गदर्शनाखाली नेहमीच नाविण्यपूर्ण प्रयोग साखर कारखान्यात यशस्वीपणे राबविले आहेत.

काळाची गरज ओळखुन मेकॅनिकल हार्वेस्टरद्वारे ऊसाच्या गाळपाचे नियोजन मागील चार वर्षापासून करण्यात येत असून त्याचे प्रमाण ६५ टक्के पर्यंत नेण्यात आले आहे. या शोधनिबंधात पारंपारीक ऊस तोडणी, गाळप आणि मेकॅनिकल हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणी व गाळप याचा मील वर होणारा परिणाम यांच्या तुलनात्मक बाबीचा निरिक्षणासह उहापोह करण्यात आला आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, मांजरी (बु.), पुणे येथील एस.एस. शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली टी. डी. गुंड, जनरल मॅनेजर (टेक्नी.), के. आर. मोरे, मुख्य अभियंता, एस.एस. उमरदंड, चिफ केमिस्ट यांनी या शोधनिबंधाचे लेखन केले आहे.

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन (इंडिया) या साखर उद्योगातील तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, अभियंत्यांच्या प्रमुख संस्थेच्या ६८ व्या वार्षीक अधिवेशनामध्ये दि.२८ सप्टेंबर २०२३ रोजी पुणे येथे या शोधनिबंधाचे सादरीकरण किरण रमाकांत मोरे, मुख्य अभियंता यांचे द्वारे करण्यात आले होते.

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन (इंडिया) यांचे ६९ व्या वार्षीक अधिवेशनामध्ये या शोधनिबंधास प्रथम पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्यातर्फे ॲड. चित्राव अरविंदराव गोरे, संचालक, टी.डी. गुंड, जनरल मॅनेजर (टेक्नी.), के. आर. मोरे, मुख्य अभियंता, श्री एस. एस. उमरदंड, चिफ केमिस्ट यांनी हा पुरस्कार स्विकारला. या पुरस्काराचे वितरण पुणे येथे नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, कुणाल खेमणार, साखर आयुक्त, प्रकाश नाईकनवरे, व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल फेडरेशन, एस.एस.भड, गिरगावकर, बोखारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा पुरस्कार मिळवल्याबद्दल कारखान्याचे संस्थापक चेअरमन अरविंद गोरे, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक एस.पी. डाके यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील संस्थेच्या शोधनिबंधास देशपातळीवरील प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने मृताच्या वारसदारांना विम्याच्या रकमेचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**आलुर, दि.२५ ऑगस्ट-**

आलुर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने मृताच्या वारसदारांना विम्याच्या रकमेचे वाटप करण्यात आले.

गेल्या वर्षी विजेचा धक्का लागुन वरनाळवाडी येथील रविकांत अशोक घुरघुरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेत या तरुणाचे खाते असल्याने बँकेच्या धोरणानुसार प्रधानमंत्री जीवन बिमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना या विमा योजने अंतर्गत चार लाख रुपयांची विमा रक्कम मृताच्या वारसदारांना देण्यात आली.

बँकेत व्यवहार केल्यास बँक खातेदारांना विमा कवच सुद्धा देते त्यामुळे सर्वांनी बँकेतच सुरक्षीत व्यवहार करावा असे शाखा व्यवस्थापकांनी मत मांडले.

यावेळी मृत व्यक्तीचे मोठे भाऊ कल्याणी घुरघुरे, मृताच्या आई श्रीदेवी घुरघुरे व शाखा व्यवस्थापक अतुल भालके, अधिकारी शुभम बोदगिरे, कॅशियर विक्रम कांबळे यांच्या नातेवाई उपस्थित होते.

## बदलापूरच्या घटनेचा नळदुर्गमध्ये महाविकास आघाडीकडून काळ्या फिती लावून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ ऑगस्ट-**

बदलापुर गटनेच्या निषेधार्थ दि.२४ ऑगस्ट रोजी नळदुर्ग येथे महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काळ्या फिती लावुन निषेध केला. त्याचबरोबर बदलापुर घटनेतील नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी मागणीचे निवेदन महाविकास आघाडीच्या वतीने नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले आहे.

बदलापुर येथील शाळेत एका चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार करण्याची निंदनीय घटना घडली आहे. या घटनेचा सर्वस्तरातुन जाहीर निषेध केला आहे.

दि.२४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीच्या वतीने महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती.

मात्र न्यायालयाने हा बंद बेकायदेशीर ठरविल्यानंतर महाविकास आघाडीने पुकारलेला नियोजित बंद मागे घेऊन बदलापुर घटनेच्या निषेधार्थ राज्यातील प्रत्येक शहरात व गावात महाविकास आघाडीच्या वतीने काळ्या फीती लावुन सरकार विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. दि.२४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नळदुर्ग येथील मुख्य चावडी चौकात महाविकास आघाडीच्या वतीने काळ्या फिती लावुन सरकारच्या विरोधात आंदोलन ंकरण्यात आले.

या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटाचे माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण माजी नगरसेवक नितीन कासार, शिवसेना शिंदे गटाचे उपतालुका प्रमुख सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नळदुर्ग शहर अध्यक्ष महेबुब शेख, अजहर जागिरदार, बशीर शेख,शाम कनकधर, दिलिप जोशी, सोमनाथ म्हेत्रे, नेताजी महाबोले, वसीम कुरेशी, चंदु सगरे, अमर कलशेट्टी, सनी सुरवसे, रघुनाथ नागणे, ताजोद्दीन शेख, गुलाब शिंदे, शोएब काझी यांच्यासह शहरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विविध योजनेची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजे : चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२५ ऑगस्ट-**

शासनाच्या विविध योजनांची माहिती भटक्या, विमुक्त जाती, इतर मागास प्रवर्ग बहुजनांच्या वाडी, वस्ती तांडयाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचली पाहिजे, असे मत प्राचार्य संतोष चव्हाण यांनी व्यक्त केले.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याकरता येथील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात तालुकास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे विकास राठोड, मुख्याध्यापक यू.व्ही. जगताप, मुख्याध्यापक विनायक राठोड यांची उपस्थिती होती. यावेळी तालुक्यातील लाभार्थी विविध आश्रम शाळेतील शिक्षक वर्ग जळकोट, यमगरवाडी, मंगरुळ बोरमन तांडा, बोरनदवाडी, होर्टी, मुर्टा, इटकळ आदि गावातील नागरिक उपस्थित होते.

## बदलापूर घटनेचा तुळजापुरात तोंडावर काळ्या पट्या बांधून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ ऑगस्ट-**

बदलापूर येथे दोन चिमुकल्यांवर करण्यात आलेल्या अत्याचार निषेधार्थ महाविकास आघाडीतर्फे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर शनिवार दि.२५ रोजी तोंडावर काळ्या पट्या बांधुन शाषणाचा निषेध करुन आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करीत आंदोलन करण्यात आले.

यावेळी शासन व गृहखात्याच्या अपयशामुळे छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात न शोभणारी निंदणीय घटना घडली असुन याचा आम्ही जाहीर निषेध करतो असे यावेळी बोलताना विविध पक्षाचे पदाधिकारी म्हणाले



या आंदोलनात धैर्यशील पाटील, मुकुंद डोंगरे सुधीर कदम, ऋषी मगर, सुनील जाधव, राहुल खपले, शरद जगदाळे, अमर चोपदार, धनंजय पाटील, गणेश ननवरे, शहाजी ननवरे, समाधान देवगुंडे, संजय जाधव, बापूसाहेब नाईकवाडी, नवनाथ जगताप, अनमोल साळुंके, अमोल जाधव, सागर इंगळे, अर्जुन साळुंके, प्रदीप इंगळे, चेतन बंडगर, कारभारी, बाळासाहे शिंदेसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी यात सहभागी झाले होते.

## जयहिंद विद्यालयात शालेय निवडणूक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.२५ ऑगस्ट-**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील जयहिंद विद्यालयात २२ ऑगस्ट रोजी बाल संसद स्थापनेसाठी शालेय निवडणूक घेण्यात आली.

यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वनमंत्री, शिक्षणमंत्री, आरोग्य व स्वच्छता मंत्री, सांस्कृतिक मंत्री, शालेय पोषण आहार मंत्री, क्रीडामंत्री, शालेय परिपाठ मंत्री, सहल व पर्यटन मंत्री या पदांसाठी विद्यालयात निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीसाठी एकूण ३७ अर्ज आले होते. सर्व उमेदवारांना चिन्हांचे वाटप करून त्यांना प्रचार करण्याची संधी सुद्धा विद्यालयाने दिलेली होती. अतिशय शांत व शिस्तबद्ध वातावरणामध्ये ही निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्ये मतदान अधिकारी म्हणून विद्यालयातील शिक्षक व शिक्षिका यांनी काम केले. या निवडणुकीमुळे विद्यार्थ्यांना मतदान कसे करायचे, मतदान प्रक्रिया कशी चालते, उमेदवारी अर्ज भरणे व माघार घेणे, मतमोजणी कशी होते. मंत्र्यांना शपथ कशी दिली जाते याबद्दल माहिती मिळाली. दि.२३ ऑगस्ट रोजी विद्यालयात शालेय निवडणुकीचा निकाल सांगून नवीन निवडून आलेल्या मंत्र्यांना पदाची शपथ देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाकरे पी.के. व आभार पालके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

## आगामी काळात होणारे सण, उत्सव, शांततेत साजरे करावेत : सदाशिव शेलार



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ ऑगस्ट-**

लोहारा पोलिस ठाण्यात उपविभागीय पोलिस अधिकारी सदाशिव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत पोलिस उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार मार्गदर्शन करताना म्हणाले कि, आगामी काळात सण उत्सव, पोळा, गणेशोत्सव, गौरी पूजन व इतर सण उत्सव साजरे होणार असून हे सर्व सण शांततेत व कोणताही अनुचित प्रकार न घडता तसेच कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना न दुखावता साजरे करावेत, तसेच पोलिस स्टेशन हद्दीतील प्रत्येक गावातील धार्मिक प्रार्थना स्थळे, मंदिर, मस्जिद, दर्गा, बुध्दविहार, महापुरुषांचे पुतळे यांना बीट अंमलदर व दुय्यम अधिकारी यांनी दररोज भेटी द्याव्यात. सर्व पोलीस पाटील यांनी आपापल्या गावातील प्रार्थना स्थळे मंदिर थोर महापुरुषांचे पुतळे यांना भेटी द्यावेत व भेटीचे फोटो ग्रुप वर टाकावेत तसेच गावातील कोणतीही आगाऊ माहिती लागलीच पोलिसांना कळवावे, असे सदाशिव शेलार यांनी सांगीतले.

## अधिकाऱ्यांनी जाण ठेवून नागरीकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यावे : खा. ओम राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ ऑगस्ट-**

भुम तालुक्यातील नागरीकांच्या प्रशासन संदर्भातील १५८ तक्रारी व अनेक निवेदने प्राप्त झाल्या. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी भुम येथील तहसिल कार्यालय येथे जनता दरबाराचे आयोजन करुन संबंधीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जनतेचे सर्व प्रश्न तात्काळ मार्गी लावणेबाबत सुचना करण्यात आल्या.

भुम तालुक्यातून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय भुम व विविध शासकीय कार्यालयाकडील प्रलंबित प्रश्नाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. आगार प्रमुख म.रा.प.म., विविध बँकेचे व्यवस्थापक यांना तात्काळ सुचना देवून सर्व प्रश्न १५ दिवसाचे आत मार्गी लावून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरुपात खासदार संपर्क कार्यालयाकडे सादर करणेबाबत सुचना ही केली.

भुम येथील तहसिल कार्यालयात सोयाबिन पिकावरील येलो मोझॅक, आण्णासाहेब पाटील महामंडळ, अंतरजातीय विवाह अनुदान तसेच खरीप पिक कर्ज वाटप, राज्य परीवहन महामंडळ व अन्य शासकीय कार्यालयातील प्रलंबित कामाच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारीचे निवारण करत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खासदार



संपर्क कार्यालयाकडे सादर करण्याच्या सुचना करण्यात आल्या.

तसेच पुढील जनता दरबाराच्या वेळी याबाबतचा आढावा घेणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी भुम तालुक्यातील शिवसेना जिल्हाप्रमुख रणजित पाटील, तालुका प्रमुख श्रीनिवास जाधवर, समन्वयक दिलीप शाळु महाराज, युवा सेना जिल्हा प्रमुख डॉ. चेतन बोराडे, प्रकाश आखरे, विधानसभा युवा सेना अधिकारी प्रल्हाद आडागळे, माऊली शाळु, महिला आघाडी प्रमुख जिन्नत सय्यद, तालुकाप्रमुख उमादेवी रणदिवे, दिनेश मांगले, कोहीनुर सय्यद, विहीन कदम, बाळासाहेब गुळवे आदीसह सर्व खात्याचे प्रमुख अधिकारी तसेच सर्व बँकेचे व्यवस्थापक व प्रशासनातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

# नांदेड रेल्वे स्टेशन देशातील सर्वोत्कृष्ट स्टेशन बनविणार : रवनीत सिंघ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २५ ऑगस्ट**

नांदेड हे शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंघजी यांचे वास्तव्य असलेली पावन भुमी असून या भुमीत त्यांनी सर्व जगाला मानवतेची शिकवण दिली आहे. अशा या पावनभूमीतील नांदेडचे रेल्वे स्टेशन हे येत्या कालावधीत सर्व सोयीनी सुविधांनी युक्त असलेले देशातील सर्वोत्तम रेल्वे स्टेशन करण्यात येईल,असे प्रतिपादन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंघ यांनी केले.



गुरुद्वारा शहीद बाबा भुजंग सिंघजी चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने २५ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरपर्यंत पंच तख्त साहिबांच्या दर्शनाची विशेष रेल्वे यात्रा आयोजित करण्यात आली आहे. आज हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्टेशन येथून दुपारी १२.३० वाजता या यात्रेचा प्रारंभ झाला. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंघ यांनी या विशेष ट्रेनला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.

यावेळी आमदार मोहन हंबर्डे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड रेल्वे विभागीय व्यवस्थापक निती सरकार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, संत बाबा कुलवंत सिंघजी, समुह पंच प्यारे साहिबान, संत बाबा बलविंदर सिंघजी, आयोजक रविंद्रसिंघ बुंगई, दिलीप कंदकुर्ते, संतुक हंबर्डे आदींची उपस्थिती होती.

नांदेड रेल्वे स्टेशन येथून आज पंच तख्त साहिबांच्या दर्शनाची विशेष रेल्वेला रवाना करण्यात आले. या यात्रेत १ हजार ३०० भाविकांचा समावेश असून ही यात्रा पटना, दिल्ली, अनंतसाहिब फतेहगडसाहिब सरहंद, दमदमासाहिब भटींडा, दरबारसाहिब अमृतसर येथे पोहोचणार आहे. तसेच ही यात्रा ६ सप्टेंबर रोजी नांदेडला वापस पोहोचणार आहे. यात्रेदरम्यान ठिकठिकाणी लंगर, वाहनांची व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था केली आहे.

# मुखेड येथे आज श्रावण सोमवारी भव्य कावड यात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड, २५ ऑगस्ट -**

मुखेड शहरात श्री विरभद्र मंदीर पासुन ते श्रावण कावडी पर्यंत दि. २६ ऑगस्ट रोजी सोमवारी सकाळी ७ वाजता भव्य कावड यात्रेचे आयोजन श्रावणकावडी देवस्थान व विश्व हिंदु परिषदेच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

ही कावड यात्रा मुखेडचे नगरीचे कुलदैवत श्री विरभद्र मंदीर पासुन सकाळी ७ वाजता सुरु होणार असुन शहरातील विविध भागातून ही कावड यात्रा जाणार आहे. शहरापासुन जवळच असलेल्या ऐतिहासिक रामायणकालीन श्रावणकावडी देवस्थान येथे या कावड यात्रेचा समारोप होणार आहे. तत्पुर्वी श्रावण चलम्यातील जल घेऊन श्रावण कावडी येथील महादेवास जलाभिषेक भक्तांच्या कावडने होणार आहे.

श्रावण कावडी येथे मागील एक वर्षापासुन लोकहभागातून श्रावणबाळ व त्यांच्या आई वडीलाच्या मंदीराचे जिर्णोध्दार होत असुन मंदीराचा खुप कायापालट झालेला आहे. श्रावणबाळ,त्यांचे आई वडील, संत गाडगेबाबा व राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पुर्णाकृती मुर्ती सुध्दा आणण्यात आले आहेत. लवकरच श्रावणकावडी येथे भव्य कार्यक्रम घेऊन कळसारोहन होणार असल्याचे देवस्थानने सांगितले.

श्रावण महिण्यात मागील वर्षी सुध्दा भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तर या कावड यात्रेत सहभागी होण्यासाठी प्रत्येकांनी कावडसह हजारो भक्तांनी यावे असे आवाहन श्रावण कावडी देवस्थान व विश्व हिंदु परिषदच्या वतीने करण्यात आले आहे.

## शहा अजिमोद्दीन यांची बदली

**आदमपूर-**

जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे दि.१५ ऑगस्ट रोजी बदलीचे आदेश काढले आहेत.उपविभागीय अधिकारी कार्यालय धर्माबाद येथील कार्यरत महसूल सहाय्यक शहा अजिमोद्दीन अहेमद शहा कासराळीकर यांची बिलोली तहसिल कार्यालयात पदस्थापनेने महसूल सहाय्यक (महसूल)पदी प्रशासकीय बदली करण्यात आली आहे.

# विद्यार्थीनींनी पिंपळाच्या वृक्षाला बांधली राखी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, २५ ऑगस्ट -**

येथील मानव्य विकास विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना विभागाकडून आज शाळेच्या मैदानात असलेल्या ६१ वर्षीय पिंपळाच्या वृक्षाला राखी बांधून वृक्षाबंधन साजरे करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन करण्याची शपथ घेतली.

हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी स्वतः राख्या बनवून आणल्या होत्या. राख्यावर झाडे लावा झाडे जगवा,वृक्ष आपला सोबती ,वृक्ष संवर्धन पर्यावरण रक्षण असे विविध घोषवाक्य लिहिले होते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये या आगळ्या वेगळ्या रक्षाबंधनाची चर्चा होत होती तर सदरील राख्यांचे निरीक्षण सर्वांकडून कौतुकाने केले जात होते. शाळेत मुख्याध्यापक संतोष कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय हरित सेना विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन करण्यात आले आहे . दरवर्षी विद्यार्थ्यांकडून शाळेतील विविध भारतीय वृक्षांना राख्या बांधून वृक्षाबंधन साजरा केला जातो.विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती व्हावी हा या कार्यक्रमा मागचा उद्देश आहे. वृक्षाबंधन कार्यक्रमात मुख्याध्यापक संतोष कोल्हे,पर्यवेक्षक शरद हान्द्रे,श्याम कोल्हे,शिक्षक प्रतिनिधी संजय कल्याणी, राजेश चौडेकर ,मनोज मोरे, बालाजी भांगे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय हरित सेनेचे अध्यक्ष शिवानंद स्वामी ,उपाध्यक्ष अर्जुन सुंकेवार आदींनी परिश्रम केले.



## संक्षिप्त वृत्त



### उमरी तालुक्यातील वाघाळा येथिल गँगमॅन बाबुराव खंदारे सेवानिवृत .

**उमरी**-तालुक्यातील मौजे वाघाळा येथील भुमीपुत्र गँगमॅन बाबुराव कोंडीबा खंदारे यांनी ३५ वर्ष सेवानिवृत्त झाल्याने १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून बिलोली येथे सेवानिवृत झाले .बाबुराव खंदारे उमरी तालुक्यात वाघळा येथिल रहिवाशी आहेत गरीब कुंटुबातील राहून अल्पशा पगारावर कार्य करून अनेक अडचणीवर मात करून गेली ३५ वर्षापासुन सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत ग्यांगमॅन या पदावर कार्यरत होते अनेक तालुक्यातील ते काम केले आहे ३१ जानेवारी ते सेवा निवृत्त झाले असून बिलोली येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात खंदारे बाबुराव यांचाही सामावेश होता. उप अभियंता ए.आर. चितळे व उप अभियंता रायभोगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र,शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले आहे.सर्व उमरी व वाघाळा येथील ग्रामस्थांनी खंदारे यांच अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### सिडकोतील सक्सेस अकॅमीच्या विद्यार्थ्यांचे नोकरीत सुयश

**नवीन नांदेड**-सिडको येथील सक्सेस अकॅडमी व अभ्यासिका यांचे संचालक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व अथक प्रयत्नाने सलम भागातील विद्यार्थयासहित अनेक विद्यार्थ्यांनी ही आपली उद्दिष्टे समोर ठेवून अहोरात्र अभ्यास करून विविध प्रकारच्या शासकीय नोकरीमध्ये यश मिळाले आहे. या यशाबद्दल अकॅडमी चे संचालक गजानन मोरे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. सिडको नवीन नांदेड येथील सक्सेस अकॅडमी व अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांनी आपले मार्गदर्शक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र प्रयत्न करून जिद्दीने बौद्धिक व शारीरिक परिश्रम घेऊन आपले उद्दिष्टे गाठण्यास यशस्वी ठरले आहे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस भरतीसह विविध शासकीय सेवेत शासकीय नोकरीत सक्सेस अकॅडमीच्या बहुतांश विद्यार्थ्यांनी आपले नाव व अकॅडमी चे नाव मिळवले आहे . सध्या पार पडलेल्या पोलीस व एस आर पी एफ भरतीमध्ये सिडकोतील विकास सोनकांबळे व मनोज मिसाळे या दोघांची एसआरपी एफ (SRPF) हिंगोली येथे व नितीन काळे यांची नागपूर पोलीस पदी निवडआणि प्रदीप गोरे,श्याम धंदे यांची नांदेड पोलीस पदी निवड व मनीषा आढाव यांची मुंबई लोहमार्ग पोलीस पदी निवड व संतोष खटके आरोग्य सेवक पदी निवड झाली. झाल्याबद्दल सत्कार करून अभिनंदन करताना सक्सेस अकॅडमी चे संचालक प्रा. गजानन मोरे सर प्रा. पाटील सर , प्रा.भद्रे सर ,प्रा. चव्हाण सर, व मस्के मॅडम व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे. सक्सेस अकॅडमी व अभ्यास केंद्र हे इसवी सन २०१५ पासून सतत विद्यार्थ्यांच्या सेवेत कार्य करत असते तेव्हापासून आजपर्यंत विविध शासकीय सेवेतील पदावर जवळपास २०० ते २५० विद्यार्थी घडवण्याचे काम केले आसल्याचे अकॅडमी चे संचालक प्रा. गजानन मोरे सर यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी सदरील यशाचे श्रेय प्रा. गजानन मोरे सर यांना दिले.



### विठ्ठलराव सूर्यवंशी विस्तार अधिकारीपदी रुजू

**नायगाव** -नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कुष्णुर केंद्राचे केंद्रप्रमुख विठ्ठलराव देविदासराव सूर्यवंशी यांची अतिरिक्त प्रभारी विस्तार अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून जिल्हा परिषद अंतर्गत घुंगराळा केंद्राचा पदभार त्यांनी नुकताच स्वीकारला आहे. जिल्हा परिषद शाळेच्या नर्सी व कुष्णूर गट समावेश असलेल्या घुंगराळा केंद्राचे विस्तार अधिकारी पद रिक्त होते. कार्यालयीन कामकाज सुरळीत होऊन केंद्रांतर्गत शाळेची गुणवत्ता वाढावी म्हणून पंचायत समिती नायगावचे गटशिक्षणाधिकारी संग्राम कांबळे यांनी कुष्णुर केंद्राचे केंद्रप्रमुख विठ्ठलराव सूर्यवंशी यांचेकडे अति. प्र. विस्तार अधिकारी म्हणून पदभार सोपविला आहे. विठ्ठलराव सूर्यवंशी यांच्या कर्तव्याची दखल घेऊन शिक्षण विभागाने त्यांची शिक्षका पासून मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख ते अति. प्र. विस्तार अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवली आहे. शिक्षण क्षेत्रात विठ्ठलराव सूर्यवंशी हे एक कर्तव्यदक्ष व आदर्श शिक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांच्या निवडीबद्दल नायगावचे केंद्रप्रमुख शिवराज साधू, जि.प. प्रा. शा. कृष्णुर चे मुख्याध्यापक हौसाजी वारघडे, जि.प.प्रा. शा. सावरखेडचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कानोले, जि. प. हायस्कूल घुंगराळा चे मुख्याध्यापक अनकाडे सर, एसबीआय बँकेचे सेवानिवृत्त शाखाधिकारी रमेश पाटील उमाटे, गोविंदराव सुंडगे सर, ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर जोगदंड, सहशिक्षक देविदास सुडके, सहशिक्षक मल्लिकार्जुन पाटील, पत्रकार दत्तात्रय तिपणे, सहशिक्षक शिवाजी पांचाळ, सहशिक्षक केशवराव सूर्यवंशी, सहशिक्षक गुणवंतराव वडजे, पंढरीनाथ खंडागळे, सुभाष पाटील सुभेदार, गंगाधर पाटील भिसे यांच्यासह अनेकांनी विठ्ठलराव सूर्यवंशी यांचे अभिनंदन केले.

# उमरज येथे आज आरोग्य व रक्तदान शिबिर; भाविकांसह ग्रामस्थांनी लाभ घ्यावा: मठाधिपती

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, २५ ऑगस्ट**

मिनी पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या तालुक्यातील उमरज येथील संत नामदेव महाराज मठ संस्थान च्यावतीने सोमवारी (ता.२६) मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून भाविकांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिपती संत एकनाथ गुरू नामदेव महाराज यांनी केले आहे.



श्रीक्षेत्र उमरज येथील संत नामदेव महाराज मठ संस्थानच्यावतीने दरवर्षी श्रीकृष्ण जन्मोत्सव व श्री संत नामदेव महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येतो. २० ऑगस्ट पासून या सोहळ्याला सुरुवात झाली आहे. अखंड हरिनाम सप्ताह सह विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडत आहेत. हा सोहळा २७ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे. सोमवारी (ता.२६) संस्थानच्यावतीने आरोग्य शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात

वेगवेगळ्या आजारावर तज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करुन त्यांच्यावर मोफत औषधोपचार केले जाणार आहेत. तसेच रक्तदान शिबिर सुद्धा घेण्यात येणार आहे. भाविक भक्तांनी शिबिरात सहभागी होऊन आरोग्य सुदृढ ठेवण्या बरोबरच राष्ट्रीय कार्यात हातभर लावावा, असे आवाहनही श्री संत नामदेव महाराज मठ संस्थानचे मठाधिपती संत एकनाथ गुरू नामदेव महाराज यांनी केले आहे.

## शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तुपासुन बनविल्या कचरा पेट्या

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २५ ऑगस्ट -**

मारतळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक कचरा पेट्या तयार करून एक उत्तम उदाहरण घालून दिले आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना बालवयातच ओला आणि सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व समजावून देणे हा होता.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या आवाहनानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील उपलब्ध टाकाऊ वस्तूंपासून दोन कचरापेट्या तयार केल्या. एकात ओला कचरा तर दुसऱ्यात सुका कचरा टाकण्यासाठी या पेट्या वापरण्यात येणार आहेत. शाळेच्या आवारात या कचरापेट्यांची प्रदर्शनी भरवण्यात आली होती.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या कचरा पेट्या केवळ शाळेपुरत्या मर्यादित न राहता त्यांनी आपल्या घरांमध्ये आणि परिसरातही या पेट्यांचा वापर करण्याचे ठरवले आहे. या उपक्रमामुळे केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांनीही ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करून टाकण्याचे महत्त्व जाणून घेतले.

# बिलोलीत बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचे काळी फीत बांधून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, २५ ऑगस्ट -**

बिलोली-बदलापूर शाळेतील लहान मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ बिलोली महाविकास आघाडीच्या वतीने तोंडाला काळी फीत बांधून तहसील समोर निषेध व्यक्त करून तहसीलदार व पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील महिला व मुली सुरक्षित नसल्यामुळे राज्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, त्यात महाराष्ट्रातील बदलापूर, अंबरनाथ, नागपूर, अकोला, कोल्हापूर, लातूर, आदी ठिकाणी चिमुकल्या मुलीसह महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत,सदरील घटना पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारे आहेत. या घटनेच्या निषेधार्थ दिनांक २४ रोजी बिलोली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष सुभाष गायकवाड, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिपलीकर, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख शिवकुमार पाटील बामणे, माजी नगराध्यक्ष भिमराव जेठे,अल्पसखयाकचे तालुकाधयक्ष वलिओद्दीन फारुखी यांच्या नेतृत्वाखाली तोंडाला काळी फीत बांधून तहसील समोर एक तास बसून निषेध व्यक्त करण्यात आले असून तहसीलदार व पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सुभाष गायकवाड,शिवसेना तालुकाप्रमुख शिवकुमार पाटील बामणे, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष भिमराव जेठे, मिनाक्षी भोसीकर, वलिओद्दीन फारुखी आनंद गुडमलवार, अमरनाथ कांबळे, प्रकाश पोवाडे, इमरान पटेल, श्रीनिवास शिंदे, साजिद कुरेशी, अजमद चाऊस, नरेश जिठ्ठावार, शंकर पाटील कुरे,शेख मुख्यार,शेख सुलेमान, सय्यद महेबुब, सरफराज फारुकी,शेख अन्सार,शेख दाऊद,सय्याराम निदाने, व्यंकट गुजरवार, सादिक पटेल, शेख सलीम, हनमंत पाटील कदम, सयाराम नामतेश,अशोक पाटील वानोळे, शंकर कोणेरवार, बाबुराव पाटील टोम्पे,शेख रशीद, केशव रानवळकर, प्रभाकर रेडी, बाबुराव सोनकांबळे,राजू सोनकांबळे, बंटी साठे, साईनाथ भोरे, रमेश गवते, दिगंबर लाडे, शेषराव वाघमारे, युसुफ खान आदीसह मोठ्या प्रमाणात महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.





# तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंघ यांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २५ ऑगस्ट -**

केंद्रीय रेल्वे आणि अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंघ यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध श्री हजूर साहेब सचखंड गुरुद्वारास भेट देवून दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वाराचे पुजारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत त्यांच्या आई जसबीर कौर यांचीही उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, सचखंड गुरूद्वाराचे मुख्य पुजारी संत बाबा कुलवंत सिंघजी जथेदार, संत बाबा रामसिंघजी सहायक जथेदार, अधीक्षक सरदार राज देवेंद्र सिंघजी, सहायक अधिक्षक स. रविंद्रसिंघ कपूर, जयमलसिंघ ढिलो, रविंद्रसिंघ बुंगई, राजेंद्रसिंघ पुजारी, रेल्वेचे प्रधान मुख्य संचालन व्यवस्थापक बी नागया, बांधकाम मुख्य प्रशासकीय अधिकारी अग्रवाल, विभागीय क्षेत्रिय व्यवस्थापक निती सरकार, उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, दिलीप कुंदकुर्ते, संतुक हंबर्डे, आदींची उपस्थिती होती.

## तुफानातले दिवे पत्रकारिता पुरस्काराने पत्रकार महेंद्र गायकवाड सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २५ ऑगस्ट -**

युगकवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोदडे यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना तुफानातले दिवे हा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. या पुरस्काराचा वितरण सोहळा शनिवारी कुसुम सभागृहात पार पडला असून तुफानातले दिवे हा पत्रकारितेतील पुरस्कार पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष, पत्रकार महेंद्र गायकवाड यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

शहरातील कुसुम सभागृहात आयोजित एका भव्य कार्यक्रम सोहळ्यात तुफानातले दिवे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उदघाटक एम. सायलूअण्णा म्हैसेकर,अध्यक्ष फारूक अहेमद, स्वागताध्यक्ष प्रशांत इंगोले, प्रा. रविचंद्र हडसनकर आयोजक संजय निवडंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार महेंद्र गायकवाड यांना तुफानातले दिवे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



.पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातून त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून दिला आहे.त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते संजय निवडंगे व संयोजन समितीने गायकवाड यांना तुफानातले दिवे पुरस्कार जाहीर केला होता.

# रामचंद्र येईलवाड यांनी मागितली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, २५ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांच्याशी एकनिष्ठ असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र येईलवाड यांनी

जनतेच्या आग्रहास्तव आगामी लोहा -कंधार विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी लोहा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर हे पक्षाच्या आढावा बैठकीसाठी आले असता त्यावेळी भगवानराव आलेगावकर यांच्याकडे जनतेच्या अग्रासत्व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे आगामी लोहा विधानसभेसाठी उमेदवारी मागितली असुन त्यांनी या संदर्भात जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्याकडे अर्ज सादर केला आहे.



गेल्या ४० वर्षांपासून सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेले रामचंद्र येईलवाड हे लोहा - कंधार मतदार संघातील चळवळीतील ज्येष्ठ अभ्यासू नेते आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांच्या सोबत ही कामे केली आहेत पण माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी बीआरएस मध्ये प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडला पण रामचंद्र येईलवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सोडला नाही. त्यांनी देशांचे माजी कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार यांच्याशी व पक्षांशी निष्ठा राखत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे काम सुरूच ठेवले आहे आज लोहा -कंधार मध्ये रामचंद्र येईलवाड यांच्याएवढे जेष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये कुणीही नाही .

त्यामुळे त्यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आगामी लोहा -कंधार विधानसभा निवडणूक लढवावी अशी जनतेतून मागणी बरेच दिवसांपासून होत असल्याने त्यांनी जनतेच्या अग्रासत्व दि.२२ रोजी लोहा येथील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली यावेळी रामचंद्र येईलवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून लोहा -कंधार विधानसभेसाठी उमेदवारी द्यावी म्हणून त्यांनी जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्याकडे जनतेच्या अग्रासत्व उमेदवारीसाठी अर्ज सादर केला आहे.

**टी. सी हरवली**

कु. इंद्रजीत सायबु वाघमारे रा. रामपूर या नावाची इयत्ता Diploma in civil Engineering पास ची देगलूर ते बिलोली बस प्रवासादरम्यान हरवली आहे तरी कोणास सापडल्यास कळवावे.

**संपर्क**
श्री.सायबू शंकर वाघमारे
मो. न : ९८९०४७८४८२

**कागदपत्र हरवले**

राजाबाई शेट्टीबा हिप्परगेकर नावाचा दहावी पास मार्क मेमो सन २०००, बारावी पास मार्क मेमो सन २००२ मूळ कागदपत्र बिलोली-नांदेड प्रवासात हरवले आहे.

**संपर्क**
रा हिप्परगा, ता. बिलोली
मो. न : ९८९०४७८४८२

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## पीक स्पर्धेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगामामध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र असून सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये व आदिवासी गटासाठी १५० रुपये राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला किंवा संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त




### विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना प्रभावीपणे पोहचवा : शिक्षणाधिकारी

**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयांतर्गत असलेल्या विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवाव्यात, असे आवाहन शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी केले. लातूर जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, सहाय्यक योजना अधिकारी व विषय साधनव्यक्ती यांची आढावा बैठक दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीमध्ये उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार करणे, असाक्षर व स्वयंसेवक यांची नोंदणी करणे, एन. एम. एम. एस. शिष्यवृत्ती योजना, राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना यासारख्या विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांचा तालुका स्तरावर सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय लातूरचे सहायक शिक्षण संचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षण उपनिरीक्षक धनंजय सराफ उपस्थित होते. बैठक यशस्वी होण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयातील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सचिन मुंडे, दत्तात्रय थेटे, सतीश भापकर, सिद्धेश्वर आलमले, रवी कुलकर्णी, सुनीलकुमार सातपुते, दीपक चव्हाण, मकरंद कुदळे यांनी प्रयत्न केले.



### शेळगी येथे आ. पाटील-निलंगेकरांच्या पदयात्रेचे उत्साहात स्वागत

**निलंगा, दि. २५ ऑगस्ट-**

तालुक्यातील शेळगी येथे आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेचे संततधार पावसात ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले. जनसन्मान पदयात्रेचा पहिला मुक्काम शेळगी येथे झाला. यावेळी आमदार निलंगेकर यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, तानाजी बिरादार, अरविंद पाटील जाजनुरकर, संजय दोरवे, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, संगायो अध्यक्ष शेषेराव मंमाळे, सरपंच संगीता बिरादार, रावजी बिरादार, छाया बिरादार, कृ.उ.बा. समितीचे संचालक बंकट बिरादार, पोलीस पाटील अनिल पाटील, लक्ष्मण जाधव, प्रकाश रोडे, साधुराम ढेबे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनाच्या लाभार्थींना लाभाचे प्रमाणपत्र देण्यात आले.



### महाविकास आघाडीच्या वतीने शिरुर अनंतपाळ येथे काळ्या फिती लावून सरकारचा निषेध

**शिरूर अनंतपाळ, दि. २५ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र बंदचे आवाहन, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीनस्त राहून महिलांच्या सुरक्षिततेसाठी महाविकास आघाडी तर्फे काळ्या फिती लाऊन निषेध करण्यात आला. महाविकास आघाडीच्या वतीने बसवेश्वर चौक, शिरुर अनंतपाळ येथे बालक-महिला भगिनींवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात असून त्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. महाविकास आघाडी शिरुर अनंतपाळ येथील पदाधिकारी, यांच्या सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून, शांततेच्या मार्गाने हा विरोध दर्शवला आहे. महिलांच्या आणि बालकांच्या सुरक्षेसाठी शासनाने तात्काळ उपाययोजना करावी, अशी महाविकास आघाडीची आग्रही मागणी आहे. यावेळी भागवतराव वंगे, शिवराज धुमाळे, नगरसेवक सुधीर लखनगावे, मिना बंडले, महादेव आवाळे, करुणा पारशेट्टे, सतीश शिवणे, व्यंकट हंद्राळे, संदीप धुमाळे, गुरुनाथ आचवले, चंद्रकांत हात्ते, विश्वनाथ हंद्राळे, भिडे गुरुजी, तानाजी वलांडे, काशिनाथ धुमाळे, शिवसांब पारशेट्टे, आसिफ उजेडे, शैलेश वलांडे, ललिता शिवणे, सरोजा गायकवाड, व्यंकटराव कल्ले उपस्थित होते.

### नामदेव बिरादार यांचे निधन

**वलांडी, दि. २५ ऑगस्ट-**



टाकळी (ता.देवणी) येथील रहीवाशी नामदेव रामराव बिरादार वय ७४ यांचे २५ ऑगस्ट, रविवारी सायंकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी दि. २६ ऑगष्ट २४ सोमवारी दुपारी ११ वाजता टाकळी येथील स्मशानभूमीत होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले एक मुलगी असा परिवार असून पत्रकार नरेश बिरादार यांचे ते काका होते.

# रेणा प्रकल्पात ६७ टक्के पाणीसाठा

## शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. २५ ऑगस्ट-**

रेणापूर तालुक्यातील भंडारवाडी येथील रेणा मध्यम प्रकल्पात ६७.४४ टक्के पाणीसाठा झाल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाण्याबाबत आशा पल्लवीत झाल्या आहेत.

भंडारवाडी येथील रेणा प्रकल्प हा पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या सिंचनासाठी महत्त्वाचा मानला जातो. रेणा प्रकल्पातून रेणापूर,पानगाव, खरोळा या मोठ्या गावासह तालुक्यातील अनेक गावांना पाणीपुरवठा केला जातो. गेल्यावर्षी या प्रकल्पात केवळ २५ टक्केच पाणीसाठा झाला होता. त्यामुळे सर्व पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले. शेतीच्या सिंचनासाठी पाणी मिळाले नाही यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे



मोठे नुकसान झाले. यावर्षी तरी हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरावा, अशी अपेक्षा या परिसरातील शेतकऱ्यांची आहे. दरम्यान, प्रकल्पात ६७.४४ टक्के पाणीसाठा आहे, अशी माहिती प्रकल्पाचे शाखा अभियंता श्रीनाथ कुलकर्णी यांनी सांगितले.

### प्रकल्प भरल्यास उसाचे क्षेत्रात वाढ

रेणा मध्यम प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला तर या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या पानगाव, भंडारवाडी, कामखेडा, रामवाडी, फावडेवाडी, वाला, वालेवाडी आदी गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणात उसाची लागवड करतात. या तालुक्यात रेणा व पन्नगेश्वर हे दोन साखर कारखाने आहेत.पन्नगेश्वर कारखाना बंद आहे. रेणा कारखान्याने गाळप क्षमता वाढवल्यामुळे व प्रकल्प पूर्णपणे भरल्यास शेतकरी मोठ्या प्रमाणात ऊस लागवड करण्यासाठी सरसावतील, त्यामुळे उसाचे क्षेत्र वाढण्यास मदतही होऊ शकते.

### रेणापूर मध्यम प्रकल्प सद्यस्थिती

| | |
|---|---|
| उपयुक्त पाणीसाठा - | १२.४२८दलघमी |
| मृत पाणीसाठा - | १.१३ दलघमी |
| एकूण पाणीसाठा - | १३.५५७ दलघमी |
| **पाण्याची टक्केवारी =** | **६७.४४ टक्के** |

## बदलापूर घटनेच्या निषेधार्थ लातूरमध्ये आंदोलन

### काळ्या पट्ट्या बांधून सरकारचा केला निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

बदलापूर येथे झालेल्या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ तसेच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने शनिवारी लातुर मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक या ठिकाणी काळ्या फिती बांधून आंदोलन करण्यात आले.

यावेळी राज्यातील निष्क्रिय महायुती सरकार विरोधात मविआ कडून निषेध व्यक्त करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थिनींच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आंदोलनात प्रामुख्याने महिलेच्या सुरक्षेसाठी ठोस योजना आखावी, महिला अत्याचार गुन्ह्यातील नराधम आरोपींना कठोर व तात्काळ शासन व्हावे आशा मागण्या करीत आंदोलकांनी राज्य व केंद्र शासनाच्या विरोधात घोषणा देत निषेध नोंदवला.

यावेळीमहाविकासआघाडीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय शेटे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लातूर प्रमुख सुनिल बसपुरे, ॲड. उदय गवारे, महिला अध्यक्ष स्मिता खानापुरे, विष्णूपंत साठे, रविशंकर जाधव, इम्रान सय्यद, प्रवीण सूर्यवंशी, गोविंद देशमुख, अनिल चव्हाण, ॲड. देविदास बोरूळे पाटील, प्रा. प्रवीण कांबळे, अय्युब मणियार, पुनीत पाटील,आसिफ बागवान, तबरेज तांबोळी, शेख कलीम, प्रा. एम. पी. देशमुख, ॲड.राहुल मातोळकर, शंकर रांजनकर, इब्राहिम शेख, ॲड. शेखर हविले, इरांना पावले, प्रवीण साळुंके, मुन्ना तळेकर, रघुनाथ मदने, जाकेर सय्यद, कल्पना फरकांडे, मनीषा कोकणे, चंद्रलेखाताई गोजमगुंडे, आदित्य कांबळे, अजहर शेख, शताब्द शेख, तोसीब शेख, निशांत वाघमारे, उमाकांत डी,बागवान, नागरगोजे, बरकत शेख, यशपाल कांबळे, युसुफ बाटलीवाला, अजीज बागवान, ॲड. अंगदराव गायकवाड, सुलेखा कारेपूरकर, शीतल मोरे उपस्थित होते.

## ज्यांना आई-बडिलांची सेवा करण्याचे भाग्य लाभले तेच भाग्यवंत : हभप ढोक महाराज

### हजारो हरिभक्तांच्या उपस्थितीत सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२५ ऑगस्ट-**

भक्त पुंडलिकाने आई वडीलांच्या सेवेमध्ये जगाचा बाप असणाऱ्या पांडूरंगाला दोन्ही हात कटेवर ठेऊन विटेवर उभा केले. युगे अठ्ठावीस झाली तरी विठ्ठल अजुनही तेथेच उभा आहे. एवढे सामर्थ्य आई वडिलांच्या सेवेत असते .म्हणुन तिन्ही लोकांचा स्वामी भेटायला आला .ज्यांना आई वडिलांची सेवा करण्याचे भाग्य लाभले तेच खरे भाग्यवंत असतात, असे प्रतिपादन प्रसिद्ध रामायणाचार्य हभप रामराव ढोक महाराज यांनी केले.

औसा येथील उंबडगा रोडवरील मुक्तेश्वर मंदिराच्या बाजुच्या मैदानावर आमदार अभिमन्यु पवार यांचे वडील हभप. दत्तात्रय पवार गुरुजी यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा रविवारी झाला.



यानिमित्त झालेल्या किर्तनात ते बोलत होते. व्यासपिठावर पंढरपुरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे अध्यक्ष यांच्यासह औसा मतदारसंघातील एकोणीस संस्थानचे पिठाधिपती उपस्थित होते. यावेळी ढोक महाराज यांच्या हस्ते हभप दत्तात्रय पवार लिखीत' अध्यात्माचे विचारधन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याचबरोबर मतदारसंघातील सर्व भजन मंडळाला टाळ, विना, पखवाज, हार्मोनियम आदी भजन साहित्याचे वाटप करण्यात आले.

जिवंतपणी आई-वडीलांशी भांडणारी लोकं मेल्यावर त्यांच्या अस्थी गंगेत विसर्जित करण्यासाठी धावाधाव करतात. मात्र कांही लोक वडिलांना जिवंतपणी समाधान देतात. आई-वडिलांच्या चेहऱ्यावरचे समाधान हा जगातला सर्वात पवित्र प्रसाद आहे .आणि हे भाग्य आ. अभिमन्यू पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांना मिळाले आहे. कारण त्यांनी वडील दत्तात्रय पवार गुरुजी यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा वारकरी सांप्रदाया प्रमाणे साजरा केला. असे मत रामाणयाचार्य हभप ढोक महाराज यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ॲड. परिक्षीत पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला. पार्वती पवार, शोभा पवार, भिमराव पवार उपस्थित होते. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना साखर उद्योग गौरव पुरस्कार

### पुणे येथे पुरस्कार सोहळा राज्यभरातून मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोसिएशन इंडिया पुणे या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठेचा, मानाचा २०२४ चा साखर उद्योग गौरव पुरस्कार राज्याचे माजी मंत्री, मांजरा साखर परिवारातील संस्थांचे मार्गदर्शक मांजरा साखर कारखान्याचे अध्यक्ष, जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष, रेणा साखर कारखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांना पुणे येथील सोहळ्यात राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्ष, राज्याचे माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते पुरस्कार, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी राज्याचे साखर आयुक्त कुणाल खेमनर, द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टचे अध्यक्ष एस बी भड, व्हॉईस चेअरमन शिरगावकर, एम के पटेल व्हॉईस चेअरमन (गुजरात) एस डी बोकारे व्हॉईस चेअरमन ( टेक्निकल) गौरी पवार एकझिक्युटिव्ह सेक्रेटी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी माजी आमदार अँड त्रिंबक भिसे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष यशवंतराव पाटील रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष सर्जेराव मोरे, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्रीशैल्य उटगे,विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, मारुती महाराज साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील,मांजरा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, रेणा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक बी व्ही मोरे, जागृती शुगर चे सरव्यवस्थापक गणेश येवले, विलास साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक जीवन देसाई, विलास साखर कारखान्याचे उदगीर चे कार्यकारी संचालक पवार, मारुती महाराज साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे यांच्यासह लातूर येथील मांजरा परिवारातील विविध संस्थांचे पदाधिकारी संचालक उपस्थित होते

### डीएसडीचे अध्यक्ष भड यांच्याकडून मांजरा परिवाराची प्रशंसा

डीएसडी चे अध्यक्ष भड यांनी अवर्षनग्रस्त भागात मराठवाड्यात लातूर जिल्ह्यात मांजरा साखर परिवारातील १० साखर कारखाने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे चालत आहेत त्याबद्दल दिलीपराव देशमुख साहेब यांचे मनापासुन कौतुक केले

# आधार सीडिंगला गती द्यावी : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

- लाडकी बहिण योजनेच्या अर्जातील त्रुटींची पूर्तता
- अर्ज न केलेल्या महिलांनी पोर्टलवर अर्ज करण्याचे केले आवाहन

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त काही अर्जामध्ये त्रुटी असल्याने, असे अर्ज ऑनलाईन स्वरुपात परत पाठविण्यात आले आहेत. या अर्जांमधील त्रुटींची पूर्तता करून अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे पाठवावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. ज्या महिलांनी अद्याप बँक खात्यांना आधार क्रमांक संलग्न केलेला नाही, अशा महिलांनी आपले खाते असलेल्या बँकेत जावून बँक खात्यांना आधार क्रमांक जोडण्याची कार्यवाही करवी. तसेच आतापर्यंत अर्ज न केलेल्या पात्र महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी




बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगिता टकले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे, नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक प्रमोद शिंदे, महावितरणचे अधिक्षक अभियंता श्री. सांगळे यांनी यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना प्रशिक्षणाची संधी देण्यासाठी प्रत्येक शासकीय विभागाने प्रयत्न करावेत. तसेच जिल्हा आणि तालुकास्तरीय अधिकारी यांनी उद्योग, व्यवसायामध्येही युवकांना प्रशिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजनेचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## रेणापूर शिवारातून बैलजोडी चोरीला

**रेणापूर, दि. २५ ऑगस्ट-**

रेणापूर शिवारातून अज्ञात चोरट्यांनी बैलजोडी चोरुन नेल्याची घटना घडली असून यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. दयानंद अकुंश इगे वय (४५ ) यांचे रेणापूर - घनसरगाव रस्त्यावर गट नंबर १३७९ मध्ये शेत आहे.शेतात आकडा बांधलेला आहे.शेतात दिवसभर काम करुन बैलजोडीला आकड्यात बांधून ते घरी आले. रविवारी (ता.१८) सकाळी त्यांचे वडील शेतात गेले.त्यावेळेस त्यांना बैलजोडी चोरुन नेल्याचे लक्षात आले. यानंतर इगे यांनी आजुबाजुच्या गावात फिरुन शोध घेतला परंतु बैलजोडी मिळाली नाही याबाबत त्यांनी रेणापूर पोलीसात फिर्याद दिली असून अज्ञात चोरट्यां विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे तालूक्यातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा घटना तालुक्यात यापुर्वीही झाल्या आहेत. शेतातील बैल, म्हैस, गाय चोरुन नेणारी टोळी तयार झाली असल्याचा शेतक-यांना संशय येत आहे. याबाबत पोलिसांनी या टोळीचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

### प्रकाश पाठक यांचे भ्रष्टाचाराविरोधात एक वर्षभर चालणार धरणे आंदोलन

**लातूर, दि. २५ ऑगस्ट-**

लातूर शहर महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या विरोधात महानगरपालिकेचे माजी पालिका सदस्य प्रकाश पाठक यांचे महानगरपालिकेच्या गेट जवळ एक वर्षभर धरणे आंदोलन आणि जनजागृती चळवळ करीत आहेत. त्यांच्या या आंदोलनाला रत्नाकर औसेकर, प्रदिप पाटील खंडापुरकर,सारथी समाचारचे संपादक संगम कोटलवार, दैनिक सोलापूर तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी, मनोकामनाचे कार्यकारी संपादक वामन पाठक यांनी प्रत्यक्ष भेट शुभेच्छा व पाठिंबा दिला.